

ज्ञानज्योती तपोयोगिनी

प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले – राजाज्ञे

ज्ञानज्योती तपोयोगिनी



प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी उर्फ
वीणा शहाजीराव राजेभोंसले
(राजाज्ञे)

संपादिका
श्रीमती मयूरा राजेभोंसले - घाटगे

॥ग्रन्थ एव गुरुः॥
eBook Publication Pvt. Ltd.®

ज्ञानज्योती तपोयोगिनी

संपादिका- श्रीमती मयूरा राजेभोंसले-घाटगे
संकल्पना – डॉ.नीलेश जोशी, श्रीमती मयूरा सुभाष घाटगे
मुखपृष्ठ कल्पना - श्रीमती मयूरा राजेभोंसले-घाटगे, श्रीमती रेशमा राजेभोंसले-दानी
छायाचित्र संकलन- श्री. राजदीपराजे भोंसले-राजाज्ञे, श्री. सुभाष घाटगे

प्रकाशक:
eBook Publication Pvt. Ltd.®
4/47, उदय को. हौ. सोसायटी,
आरे रोड, गोरेगाव पश्चिम,
मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००६२
Telephone: +91 7038164022
Email: publicationebook@gmail.com
Website: https://archive.org/details/@ebook_publcation

प्रथमावृत्ती: 2020

मुखपृष्ठ:

Orange Design Studio
ghatge.subhash@gmail.com
9035169223

Terms & Conditions

1.This Book* may be

a. Distributed without modification or sale.
b. Copied for personal and educational use.
c. Printed for personal and educational use.

1. This Book* may NOT be

a. Sold individually or as part of package.
b. Modified in any way.
c. Reversed-engineered.

***Book refers to this PDF and any of its content including pages and images in either electronic or printed form.**



प्रौढप्रतापपुरंदर सिंहासनाधिश्वर क्षत्रियकुलावतंस श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज




अवतार मेहेरबाबा


॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥
प.पू.सद्गुरू नारायण महाराज
श्री क्षेत्र नारायणपूर




श्री गुरूदेव दत्त, श्री क्षेत्र नारायणपूर



परमपूज्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



कै. श्री. दादासाहेब उर्फ विष्णु ज्ञानेश्वर चौहाण
कै. श्रीमती चतुरादेवी दादासाहेब चौहाण



कै.श्रीमंत दादासाहेब उर्फ
शंकरराव यशवंतराव राजेभोंसले-राजाज्ञे
कै. श्रीमती विजयादेवी शंकरराव राजेभोंसले



रुबाबदार कै. श्री. शहाजीराव शंकरराव राजेभोंसले राजाज्ञे



प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी उर्फ
वीणा शहाजीराव राजेभोंसले-राजाज्ञे

अनुक्रमणिका

अनु.	शीर्षक	लेखक	पृ.क्र
अ	प्रकाशकाचे मनोगत	प्रकाशक	i
ब	संपादकीय	श्रीमती मयूरा राजेभोंसले-घाटगे	ii
1	शिवमय - शुभेच्छा	मा.श्रीमंत छ.शिवाजीराजे भोंसले	1
2	डॉ.सुहासिनीदेवी राजेभोंसले अत्यंत सुसंस्कृत,शालीन आणि घरंदाज व्यक्तिमत्त्व	मा.मधुराजी जसराज	2
3	शुभ - संदेश	मा.प्राचार्य अभयकुमारजी बापूजी साळुंखे	4
4	मृत्युंजयसुहासिनी	मा.डॉ.शरदजी बापूजी साळुंखे	6
5	डॉ.सुहासिनी राजेभोंसले - विनयी विद्यार्थिनी,सुसंस्कृत सहकारी	मा.डॉ.आ.ह.साळुंखे	9
6	लाल बहादूर शास्त्री कॉलेजच्या मानबिंदू - डॉ.सुहासिनीदेवी राजेंभोसले	मा.प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ	12
7	सुसंस्कृत ज्ञानमाऊली	मा.प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे	17
8	अध्ययन,चिंतन,संशोधन आणि वात्सल्याचे प्रतीक म्हणजे डॉ.श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम	प्रा.डॉ.भरत सगरे	21
9	ज्ञानज्योती - प्रा.डॉ.सुहासिनी राजेभोंसले राजाज्ञे	प्रा. डॉ.सुरेश गायकवाड	26
10	डॉ.सुहासिनीदेवी राजाज्ञे -राजेभोंसले - एक कर्तबगार महिला	प्रा.डॉ.शैलजा माने	30
11	संस्कृतभाषा व संस्कृतीचा जिवंत कोश-प्रा.डॉ.सुहासिनी राजेभोंसले	प्रा.शिवराम मेस्त्री	32
12	अत्यंत अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या आक्कासाहेब- डॉ.सुहासिनीदेवी राजेभोंसले	श्री.मालोजीराव शिरोळे	34
13	वहिनीसाहेब - एक वीरांगणा	सौ.पद्मजा ढमाले-देशमुख	36
14	विनम्र आदरणीय व्यक्तिमत्व- डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम	प्रा.मंदाकिनी चौकवाले-भोरे	39
15	माझी आक्का	सौ.हिमगौरी कदम	42

16	या डोळ्यांची दोन पाखरे ...	प्रा.डॉ.माधवी म्हसवडे-जोशी	46
17	अमृताचा अक्षय झरा - माझ्या गुरूवर्या..	सौ.प्रतिष्ठा कुलकर्णी -सोनटक्के	49
18	स्वयंसिध्दा - माझी आक्का	सौ.रूपाली येवले	52
19	माझी बहीण - ताईसाहेब	श्री.विकास धुळेकर	55
20	गुरुभक्ती,सेवा,त्याग,प्रेम,तेज म्हणजे माझ्या वीणा आत्या...!	सौ. दीप्ती नकुल राजेतौर (तंवर रजपूत)	57
21	सातारमधील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील संस्कृत विभागाच्या मुकुटमणी सन्माननीय प्रा.डॉ.एस.एस.राजेभोंसले मॅडम	प्रा. झीनत मुलानी	59
22	माझ्या आठवणीतल्या वीणा आत्या	श्री.सुधीर सस्ते	63
23	माझ्या वंदनीय संस्कृत गुरु श्रीमती सुहासिनी राजेभोंसले मॅडम	सौ.स्वप्नाली कारंडे	65
24	स्थितप्रज्ञ – डॉ.सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम	डॉ.नीलेश जोशी	66
25	फिरूनी नवी जन्मेन मी	सौ.रेशमा दानी-काळे देशमुख	69
26	ज्ञान,कर्म आणि भक्तिचा संगम आई - माझं दैवत	श्री राजदीपराजे भोंसले-राजाज्ञे	74
27	Aai	श्री सुभाष घाटगे (सरकार)	80
28	ज्ञानज्योती तपोयोगिनी - आईसाहेब	कु.मयूरा राजेभोंसले-राजाज्ञे (लेख)	82
29	माझ्या आई !	सौ.मयूरा घाटगे (सरकार) [कविता]	89
30	सचित्र स्मृतिपट	श्री राजदीपराजे भोंसले-राजाज्ञे, श्री सुभाष घाटगे (सरकार)	92
31	परिचय	डॉ.सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले - राजाज्ञे	120

प्रकाशकाचे मनोगत

आजचे युग हे संगणक युग आहे. सर्व गोष्टी इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या जात आहेत. आता संगणक केवळ घर व ऑफिसमध्ये न राहता प्रत्येकाच्या खिशात स्मार्ट फोनच्या रूपात आहे. सर्वकाही एका क्षणात हातात मिळत आहे. अशा परिस्थितीत पुस्तक प्रकाशन हे देखील डिजिटल स्वरूपात होणे ही काळाची गरज ! प्रौद्योगिकीकरण हे अत्यंत वेगाने प्रगत होत चालले आहेत paper to paperless, डिजिटल, मुक्त व्यासपीठ.

या नव युगाची गरज लक्षात घेऊन **eBook Publication** साहित्य हे कागदावरून उचलून शाश्वत डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देत आहे. कागदावरील कितीही महत्त्वाचा मजकूर काही दिवसात तो कागद वा त्यांचा समुच्चय अर्थात पुस्तक रद्दी होते आणि पोहोचते रद्दीच्या दुकानात. आपले साहित्य कधीच रद्दी होऊ नये, या प्रयासाने आम्ही **eBook Publication** द्वारे online प्रकाशन सादर करीत आहोत.

डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे यांची **"ज्ञानज्योती तपोयोगिनी"** स्मरणिका प्रकाशित करणे खूप अभिमानास्पद असून त्यांच्या स्मृतींना डिजिटल स्वरूप देऊन चिरंतन बनविताना कृतकृत्यता वाटत आहे. यासाठी संपादिका सौ. मयूरा राजेभोंसले – घाटगे आणि डॉ. नीलेश जोशी यांनी जो आमच्यावर विशास दाखवला त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

निश्चितच या डिजिटल आवृत्तीचे वाचक स्वागत करतील आणि लेखन, वाचन आणि प्रकाशन डिजिटल करून कागदनिर्मितीसाठी होणारी वृक्षतोड टाळून डिजिटल भारत अभियानाचे भाग बनतील.

प्रकाशक

eBook Publication Pvt. Ltd. Mumbai, India

" Write Digital Read Digital and Be Digital "



संपादकीय

|| श्रीकृष्णपरमात्मने नमः ||

श्री कुलस्वामिनी आईतुळजाभवानीला श्रद्धापूर्वक नमन करते. आई जगदंबेच्या आशीर्वादाने निर्विघ्नपणे ग्रंथपूर्ती होत आहे.

ॐ यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ गी.॥

(जो मनुष्य ! आत्म्यामध्ये रमणारा, आत्म्यामध्येच तृप्त आणि संतुष्ट असतो. त्यांच्यासाठी कोणतेही कर्तव्य उरत नाही.) या उक्तीला अनुसरून चालणाऱ्या व्यक्ती इतरांना प्रेरणास्थान असतात. आदर्श असतात. म्हणून महनीय, वंदनीय, पूजनीय आणि आदरणीय अशा विभूतींना प्रणिपात !!!

श्री श्री गजाश्वपती भूपती प्रजापती सुवर्णरत्नश्रीपती अष्टावधानजागृत अष्टप्रधानवेष्टित न्यायालंकारमंडित शस्त्रशास्त्रपारंगत राजनीतिधुरंधर गडपती प्रौढप्रतापपुरंदर सिंहासनाधिश्वर राजाधिराज क्षत्रियकुलावतंस श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो !!! हिंदू हृदयावर विराजमान शिवप्रभूंना त्रिवार मानाचा मुजरा !!! ज्यांचे नाव उच्चारताच धमन्यांमधील रक्त अधिक वेगाने उसळते त्या श्रीमंतयोगी राजेंना शत शत नमन !!

आद्यदैवत परमप्रिय वंदनीय आई- वडिलांना (पितरौ) आदरपूर्वक साष्टांग दंडवत !

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहङ्कारः सः शान्तिमधिगच्छति । ।

ज्याने सर्व कामनांचा, इच्छांचा त्याग केलेला असतो अशी व्यक्ती अहंकार , ममताविहिन राहणारी परम शांतीला प्राप्त करुन घेते, असे भगवान श्री कृष्णांनी श्रीमद्भगवतगीतेत सांगून ठेवलेले आहे. या उक्तिला अनुसरून आमच्या आईंनी अखंडपणे आपले आयुष्य व्यतित केले.

गीतागंगोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते।
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनम्। ।

'श्रीमद्भगवतगीता' आणि ज्यांनी आपल्या पवित्र मुखारविंदातून हा पावन उपदेश समस्त विश्वाला ज्ञानदीपरुपात दिला ते 'भगवान नारायण' यांची भक्ती करणाऱ्या आमच्या आईसाहेबांच्यासाठी खरतरं कशाचीच गरज उरली नव्हती. मात्र त्यांच्या पवित्र स्मृतीला नमन करण्यासाठी ही "भावशब्दांजली" अर्पण करण्याचा एक धाकटा प्रयत्न केला आहे. तो सहृदयी जनांना आवडेल, भावेल अशी मनाला खात्री आहे.

"हृदयरूपी मंदिरातील 'आई' नावाच्या आराध्य दैवताला आळवण्यासाठी अक्षरब्रह्मरुपी न सुकणा-या फुलांपेक्षा आणखी दुसरे काय बरे वहावे !!"

ही पूजा त्या मातृदैवतेपर्यंत नक्कीच पोहचेल असे वाटते. आईच्यावरती ही 'स्मरणिका 'काढण्यामागचे हेच कारण आहे. खरतरं कारणाची आवश्यकताच का असावी ? जी व्यक्ती विनाकारण सतत आपल्यासाठी आयुष्याचा एक - एक क्षण आणि कण कारणी लावत असते त्या व्यक्तीवर बोलण्यासाठी, लिहिण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी कोणत्याही कारणाची गरज काय ना !

"लेकरांची सेवा केलीस तू आई। कसं पांग फेडू ,कसं होऊ उतराई ।। ओवाळीन जीव माझा....."

समदुःख सुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः।।

जो निरंतर आत्मभावामध्ये स्थित असतो. सुख-दुःख, सोने-दगड आणि माती हे सर्व समान मानतो. जो ज्ञानी असतो. तो प्रिय - अप्रिय वा स्तुती- निंदा यांच्या ठायी समान भाव बाळगतो.

'ज्ञानज्योती तपोयोगिनी'असे आईंवरील स्मरणिकेस अर्थपूर्ण शीर्षक देत असताना डोळ्यांसमोर आईंचे संपूर्ण आयुष्य उभे राहते. किंबहुना या शीर्षकातून ते स्पष्ट होते. एखाद्या चित्रपटाप्रमाणे सरकन एकामागून एक चित्रफिती सरकत जातात. आईंच्या ठिकाणी प्रचंड ज्ञानाचे भांडार होते. असे ज्ञान जे माणसाला माणूस म्हणून घडवते. ते ज्ञान केवळ पांडित्य प्रकट करण्यासाठी किंवा दंभ उत्पन्न करणारे वा मिरवण्यासाठी, वाह वाह मिळविण्यासाठी किंवा कुणालाही हिणवण्यासाठी, कमी लेखण्यासाठी मुळीच नव्हते. फुटकळ वादविवाद निर्माण करण्यासाठी प्राप्त केलेले नव्हते. उलट अंधारातून प्रकाशाकडे नेणारे, अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारे, तेजोमय विचार आणि आचरण शिकवणारे असे दैदिप्यमान होते. जे फक्त स्वत:साठी जगा असे शिकवणारे नसून स्वतःच्या ज्ञानाच्या प्रकाशाने अंधकारात चाचपडणा-यासाठी मार्गदर्शक, पथप्रदर्शन करणारे, दिपवून टाकणारे होते. ज्ञान तेच जे संतोष, समाधान, समृद्धी आणि प्रगती करते, हीच शिकवण त्यांच्या तेजोमय - जीवन चरित्रातून मिळते. ज्यांचे आयुष्य अखंडपणे तेवत राहणाऱ्या दीपमाळेप्रमाणे स्वतः

जळत राहून इतरांना प्रकाशाचा, भरभराटीचा आनंद देत राहिले. जीवनातील कर्मयोगाच्या भट्टीत तापून सुलाखून निघून प्रत्येक कसोटीला खरे उतरून सोन्यासारखी झळाळी येऊन तळपत राहिले. आपल्या लढवय्या घराण्याला साजेसा असा पराक्रम करित आयुष्याच्या समरांगणात मर्दानी लक्ष्मीबाईच्याप्रमाणे स्वाभिमानाने शेवटपर्यंत लढा देत राहिल्या. एखाद्या व्रतस्थ स्थितप्रज्ञसाध्वीप्रमाणे कंठत सर्वसंग परित्याग करून योगिनीवत् मार्गक्रमण करत राहिल्या. त्या अशा कर्मयोगिणी लढवय्या आईंच्या जीवनपटाला '**ज्ञानज्योती तपोयोगिनी**' याहून सार्थक नामाभिधान कोणते असू शकेल ! म्हणूनच ही स्मरणिका प्रस्तुत करत असताना एखादे यज्ञसत्रच आरंभ केल्यासारखे मला वाटत आहे. ज्यामध्ये अनेक मान्यवरांनी, आप्तेष्टांनी आणि स्नेही जनांनी आपल्या-आपल्या आठवणींची आहुती समर्पित केली आहे.

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं,भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥

आत्मा कधी जन्मत नाही, ना कधी मरतो. तो जन्मरहित, नित्य, शाश्वत असा पुरातन शरीर मेले तरी तो मरतही नाही आणि मारला ही जात नाही.

आई गेल्यापासून किंबहुना त्या इहलोकात होत्या तेव्हापासूनच आईंच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. त्या गेल्या आणि मन सैरभैर झाले होते. सतत अस्वस्थ असायचे. कधी कविता लिही कधी चारोळ्या लिही म्हणजे मनातल्या भावना, वेदना तोडक्या- मोडक्या शब्दांत बाहेर डोकावयाच्या प्रयत्न करत होत्या. पण अचानक आईंचे पीएच.डी. चे विद्यार्थी नीलेश जोशी यांनी जवळजवळ पाच/सहा वर्षांनी सप्टेंबर २०१९ ला अचानक फोन केला. आईंना जाऊन आता जवळपास पावने दोन वर्ष होत आली होती. त्यांनी पीएच.डी पदवी मिळाल्यानंतर एकदाही आईंना भेटू शकलो नाही याविषयीची खंत व्यक्त केली. आईंच्या जाण्याविषयी दुःख व्यक्त केले.आपण आईंवरती काही काम करुयात असा विचार मांडला आणि मी लगेचच वेळ न दवडता होकार दिला. आईंवरती स्मरणिका आणि पोस्ट-तिकिट काढण्याचे आमचे ठरले. आमचे ज्या क्षणी ह्या उपक्रमाविषयी बोलणे झाले त्याक्षणी माझ्या मनात काय-काय करायचे याविषयीची पूर्ण कार्यक्रमाची रुपरेषाच तयार झाली आणि कामाचा श्रीगणेशा झाला.

आईंच्या या स्मरणिकेस मा. श्रीमंत छ. शिवाजीराजे भोंसले (काकासाहेब) आणि मा. श्रीमंत छ. चंद्रलेखाराजे भोंसले (काकीसाहेबांचा)सातारा, यांचा बहूमुल्य आशीर्वाद लाभला. यासाठी मी जेव्हा त्यांना भेटले तेव्हा खूप आस्थेने त्यांनी चौकशी केली. आपला अनमोल वेळ दिला. सदिच्छा दिल्या. त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छिते.

मला खूप आनंद वाटत होता आणि पक्की खात्री पण होती की हे काम चांगल्या प्रकारे पूर्णत्वाला जाणारच. कारण ते आईं विषयी होते. त्या भले इहलोकात देहरुपात नसतील पण मनात

,हृदयात, श्वासात त्यांच्या शिवाय काहीच नाही. त्या माझ्या बरोबर कायमच होत्या, आहेत आणि असणार आणि आता या अक्षरब्रह्मरुपात शाश्वत राहणार. लेख मागवण्याची पूर्ण जबाबदारी मी माझ्या अंगावर आनंदाने घेतली. डॉ.जोशींनी **eBook Publication Pvt. Ltd.** मुंबई येथील प्रकाशकांशी जोडून दिले. यासाठी मी जोशी सरांचे आणि प्रकाशकांचे मनापासून आभार मानते.

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार " या ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षणाची ज्ञानगंगा अज्ञानाच्या, अंधकाराच्या पापात बुडालेल्यांपर्यंत नेऊन ज्यांनी उद्धार केला ते संकल्पक, संस्थापक, शिक्षणमहर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करते. कोल्हापूर येथील श्री स्वामी विवेकानंद ही शिक्षणसंस्था ख-या अर्थाने आमची मातृसंस्था होय. ज्या संस्थेशी आमचे आमच्या आबासाहेबांपासून कै. दादासाहेब राजेभोंसले-राजाज्ञे आणि कै. दादासाहेब चव्हाण यांचे संबंध होते. जिथे अध्ययन, अध्यापन आणि उद्धरणांचे काम केले. म्हणून प्रथम अशा ज्येष्ठ-श्रेष्ठ विभूतींना अभिवादन करते.

यानंतर मी लेख मागवण्याच्या कामाची नांदी आमचे आदरणीय प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ सरांपासून केली. या उपक्रमाविषयी माहिती दिली. त्यांनी तत्काळ होकार देऊन प्रोत्साहन दिले. अत्यंत सकारात्मक विचारांचे आणि विचारांना कृतीची जोड देणारे मातृहृदयी असे,आमच्या साताराच्या लाल बहादूर शास्त्री आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाचे गतिमान नेतृत्व म्हणजे आमचे प्राचार्य ! त्यांनी स्वतःचे विचार तर लेखरुपात मांडून दिले शिवाय मला मार्गदर्शन केले. महत्त्वाचे म्हणजे श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर मा. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे सरांचा शुभ-संदेश ही मिळवून देण्यात मोलाचे सहकार्य केले. मी ,मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे सरांचे आभार मानते की, त्यांनीही सहजपणे हा संदेशरूप आशीर्वाद दिला.

आदरणीय मधुराजी पंडित जसराज, मुंबई यांच्या शुभाशीर्वादाबद्दल त्यांचे ही आभार व्यक्त करते.

मा. शेजवळसर आणि शेजवळ मॅडम दोघांच्या प्रेम आणि आपुलकीपूर्ण व्यवहाराबद्दल आभार व्यक्त करते. मी त्यांची खूप ऋणी आहे. त्यांचे खूप अनमोल सहकार्य लाभले. खरतरं त्यासाठी आभार शब्दही फार छोटा वाटतो. मी फक्त कृतज्ञता व्यक्त करू शकते.

मा. डॉ. शरदजी बापूजी साळुंखेसर यांनी व्यक्त केलेल्या स्नेहाबद्दल, आपलेपणाबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. यासाठी त्यांच्या कन्या प्रा. गीतांजली साळुंखे मॅडमनी फार मोठे सहाय्य दिले. सरांशी मी स्वतःतर बोललेच शिवाय मॅडमनी फार जातीने लक्ष देऊन मला मदत केली.

अभ्यासकांच्या मांदियाळीत अग्रक्रमाने ज्यांचे नाव घेतले पाहिजे ते म्हणजे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विद्वान संस्कृतचे अभ्यासक, संशोधक आणि मार्गदर्शक क्रांतिकारी विचारांचे प्रणेते आदरणीय गुरूवर्य मा. डॉ. आ. ह. साळुंखे सर होय. जे आमच्या आईचे, माझ्या थोरल्या बहिणींचे आणि माझेही

गुरू आहेत. आमच्या पिताश्रींना सुद्धा सर शिकवायला होते. यांच्या विचारांशिवाय पूर्णत्वच येऊ शकत नाही असे आमचे सर ! जे आता जरी वयपरत्वे थकले असले तरी विचारांनी सजग असणारे असेच आहेत. यांना मी जेव्हा जाऊन भेटले, तेव्हा सरांनी खूप आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षे एकत्रितपणे काम करत असताना एक सहकारी म्हणून आईंचे चांगले सहकार्य लाभले,असे सर म्हणाले. त्यांनी एक अभ्यासू, सुसंस्कृत, नम्र असे व्यक्तिमत्त्व असणाऱ्या राजेभोंसले मॅडम, अशा शब्दांत आईंचे कौतुक केले आणि फार लवकर गेल्याबद्दल हळहळ व्यक्त केली. त्यांनी आपले अनमोल विचार शब्दबद्ध केलेच शिवाय चित्रफीत (video-bite) ही पाठवून दिली. मी अत्यंत आदरपूर्वक त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करून त्यांची शतशः आभारी आहे.

हे काम करताना ज्यांना या कामाचा खूप मोठा अनुभव आहे ते म्हणजे हिंदी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि मार्गदर्शक डॉ. सगरे सर होय. त्यांनी आईंविषयीचा आदर, त्यांच्या भावना व्यक्त करीत आपला लेख तत्काळ पाठवून दिला. शिवाय मला महत्त्वपूर्ण गोष्टींवर मोलाचे असे मार्गदर्शन केले. त्यांनाही धन्यवाद देऊ इच्छिते. मानसशास्त्राचे प्रा. मेस्त्री सर यांनी स्वतःहून या उपक्रमाला पाठिंबा देत आपला लेख पाठविला. समाजशास्त्राच्या प्राध्यापिका, संशोधिका, मार्गदर्शिका डॉ. शैलजा माने मॅडमनी ही नेहमीप्रमाणे पाठिंबा देत सकारात्मक प्रतिसाद दिला. ज्येष्ठ प्रा. डॉ. सुरेश गायकवाड सर ज्यांचे आमच्या घराण्याशी फार जुने ऋणानुबंधाचे संबंध चालत आले आहेत . त्यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यासाठी मी त्यांची आभारी आहे.

प्रसिद्धवक्ते शब्दप्रभू म्हणजे कला, वाणिज्य महाविद्यालय, सातारा मा. प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे सर होय. मी यांना हा विचार बोलून दाखविला तेव्हा त्यांनी खूपच सकारात्मक प्रतिसाद दिला. मला आपला अमूल्य वेळ देऊन प्रेमाने संभाषण केले आणि माझ्याशी चर्चा करुन एक अभ्यासपूर्ण लेख देण्याची कबुली दिली.आमच्या घराण्याशी त्यांचे असणारे संबंध,आईंसाहेबांशी विद्यार्थीदशेपासून सहकार्यापर्यंत, एक मार्गदर्शकाची भूमिका अशा अनेक अंगांनी जोडलेले ऋणानुबंधाचे संबंध या सर्वच घटनांना या निमित्ताने उजाळा मिळाला. या सर्वांची मी खूप आभारी आहे.

यावरील मान्यवरांशी केवळ दूरध्वनीवरून संभाषण करून त्यांचे जे अमूल्य सहकार्य लाभले ते शब्दांत मांडणे अशक्य आहे. यांनी कसलीही आडकाठी न करता महत्त्वपूर्ण असे सहकार्य दिले ते माझ्यासाठी प्रशंसनीय, अभिनंदनीय आणि अमौलिक आहे.

तसे पाहता हे स्मरणिकेचे काम करणे अवघड होते कारण मी बेंगलोरला, काम चालू मुंबईला आणि सर्व लेखनसाहित्य मुख्यत्वे सातारा, पुणे, मुंबई येथून उपलब्ध करायचे. पण या सर्वांची सांगड घालणे शक्य झाले ते आजच्या जगाच्या (' टेक्नोलोजी') विज्ञानाच्या प्रगतीमुळेच. केवळ दूरध्वनीवर संवाद साधून हे काम पूर्णत्वाला जात असेल तर त्यामागे आईंचा आशीर्वाद आणि पुण्याईच आहे. म्हणून हे सहजसाध्य झाले.

या लेखनप्रपंचात म्हणा किंवा महत्त्वपूर्ण कामात साथ देणारा परिवार महत्त्वाची भूमिका पार पाडतो. माझ्या मामेबहिण सौ. हिमगौरी कदम आणि थोरले दाजीसाहेब श्री. संजीव कदम यांनी शब्दातीत साथ दिली. माझ्यासाठी परिवारासाठी नेहमी पाठिशी उभे राहिले. त्यांना मी विसरूच शकत नाही. माझ्या धाकट्या आत्या सौ. पद्मजा ढमाले - देशमुख ज्या नेहमीच सर्व मुलांना प्रोत्साहन देतात, मार्गदर्शन करतात. त्यांचेही खूप महत्त्वपूर्ण सहाय्य मिळाले. परिवाराच्या वतीने त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच मा. मालोजीराव शिरोळे मामा यांनी माझ्याशी संवाद साधून आपल्या आठवणींना उजाळा देत आशीर्वाद दिला. मामे बहिण सौ.रुपाली येवले यांचेही आभार.

श्री विष्णूपंत खोपडे आजोबा, आणि श्रीमती ज्योत्स्ना निगडे मावशी ज्यांचा प्रेमाचा आशीर्वाद लाभला. या कामी भक्कम पाठिंबा मिळाला. काही नाती ही रक्ताची नसली तरी स्नेहाने जोडलेली असतात. जी आपलेपणाने निर्माण होतात. तिथे काही विशेष सांगावे लागत नाही. यापैकी सुधीर सस्ते, दिप्ती राजेतौर होत. जिथे खरे प्रेम, आपलेपणा, आदर असतो तिथे लीलया गोष्टी घडतात. आईंच्या काही प्रिय विद्यार्थीनी ज्यांना आईंविषयी जिव्हाळा, प्रेम आणि आदर वाटतो. घरातील सदस्यच जणू कु. झीनत, स्वप्नाली, प्रतिष्ठा आणि माधवीताई यांच्याविषयीही प्रेम व्यक्त करते. प्रा.चौकवाले, पत्रकार श्री. धुळेकर यांचेही आभार !

मी जर हे काम करू शकले असेन तर ते फक्त आणि फक्त माझ्या सासरच्या माणसांमुळेच ! माझ्या प्रेमळ, समजूतदार सासूबाई सौ यशोदा घाटगे आणि भारतीय सेना - शूर सैनिक सासरे श्री. रामचंद्र घाटगे-सरकार (रा.गदग) यांच्या आशीर्वादाने आणि वेळोवेळी केलेल्या सहकार्याने मी निर्धास्तपणे हे काम करु शकले. मी अत्यंत हृदयासून त्यांची आभारी आहे.

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही।

येथे जाता-जाता महत्त्वाचे म्हणजे मुखपृष्ठाविषयी मनोभूमिका विदित करावी वाटते. आईंनी, "छत्रपती शिवप्रभूंच्या" दैदिप्यमान चरित्राला आर्ष देवभाषेच्या माध्यमातून संशोधित करून राजस्नुषा असलेल्या आपल्या राजघराण्याचा नावलौकिक आपल्या कार्यकर्तुत्त्वाने वाढविला. त्यांनी श्रीमद्भगवतगीतेतील कर्मयोगाला अनुसरून जीवन जगण्याचे कौशल्य मिळविले. राजयोगी श्री स्वामी विवेकानंदांच्या विश्वविख्यात उपदेशाला वेद, उपनिषदे, श्रीज्ञानेश्वरी, श्रीसार्थ तुकाराम गाथा या अभंगविद्यांच्या अध्ययनातून आपल्या अभ्यासपूर्ण ओघवती वाणीने अनेक व्याख्यानांच्या, अध्यापनाच्या माध्यमातून प्रसारित केले. शस्त्र आणि शास्त्र जपून वापरण्याचे ज्ञान ज्यांना होते. त्या देवासमोरील समईप्रमाणे अखंड तेवत राहणाऱ्या **ज्योतिर्मयी, 'तूच जगदंबा, तूच सरस्वती आणि**

तूच महालक्ष्मी' या त्रिमूर्ती मातांचा संगम ज्यांच्या जीवनामध्ये दिसतो. त्या ज्ञानाने संपृक्त झालेल्या गृहलक्ष्मीने अनेक हातांनी आपल्या जवळील संपत्तीची अत्यंत वात्सल्याने, आपुलकीने आणि प्रेमाने विशाल अंतःकरणाने लयलूट केली. त्याग, भक्ती, निष्ठा, वात्सल्य, शौर्य-पराक्रम या गुणांनी युक्त साध्वी-वीरांगणा त्या आमच्या पूज्य मातोश्रींच्या जीवन- चरित्राला या मुखपृष्ठांत प्रतिबिंबीत करण्याचा प्रयत्न केला आहे .

हे तयार करता असताना थोरल्या बहिण रेशमा दिदि याचेही मार्गदर्शन लाभले आणि छायाचित्रे संकलनासाठी धाकटे प्रिय बंधु राजदीपराजे यांनी पूर्ण सहकार्य, पाठिंबा दिला. ज्याशिवाय हे कार्य अशक्यप्राय होते. माझे भाऊ-बहिण खंबीरपणे माझ्या पाठिशी उभे राहिले. आभारी आहे.

ज्ञात, अज्ञात समविचारी आपल्या सर्व परिवाराला, स्नेहीजनांना मनापासून धन्यवाद देते. **'ज्ञानज्योती तपोयोगिनी'** या स्मरणिकेच्या प्रकाशनासाठी मुंबई येथील प्रकाशन संस्था **eBook publication Pvt. Ltd.** यांचे फार मोलाचे सहकार्य लाभले.

सर्वान् भूती परमेश्वर
जे जे भेटे भूत ते ते भगवंत

कोणत्याही प्रवासात जसे नयनरम्य सुंदर मनोहर मार्ग असतात तशा काही गतिरोधक, काटेरी वाटाही असतात. त्याशिवाय प्रवास सुखाचा होतच नाही. कडवे विरोधक तिखट टिकाकार नसतील जीवनातील गोडव्याचा आनंद तरी कसा मिळणार ! रूचकर पदार्थाची चव जिभेवर रेंगाळण्यासाठी षड्रस तर हवे ! अशा काही लोकांनी मला एक जिद्द दिली. त्यांची प्रशंसा महत्त्वाची. विरोधी - भक्ती ही उद्धारक असते, असे म्हणतात आणि म्हणूनच अंतिमतः पण महत्त्वपूर्ण अशा व्यक्तींना सानंद धन्यवाद देते.

सर्वात महत्त्वाचे या एकूण सर्व भावनिक, तांत्रिक प्रक्रियेत मोलाची साथ लाभली ती म्हणजे माझे पति श्री. सुभाष घाटगे सरकारांची ! आर्यपुत्रांशिवाय (पति) हे कार्य होऊच शकले नसते ,असे मला वाटते. मुखपृष्ठाचे संपूर्ण आणि सुंदर डिझाईन केले. त्यांच्या सकारात्मक विचारांमुळे एक उमेद मिळते. त्यांचा पाठिंबा, प्रोत्साहन आणि कौतुक यामुळे कार्य करण्याची ऊर्जा सतत मला मिळत राहिली. लोकांना भेटण्यासाठी त्यांनी मानसिक, सामाजिक, नैतिक असे सर्वतोपरी मला बळ दिले. अवर्णनीय अशी अनमोल साथ दिली. पूर्ण विश्वास, निस्सीम प्रेम आणि अखंड साथ देणारा असा आयुष्याचा जोडीदार लाभला. मी संपूर्ण परिवाराची अत्यंत मनापासून आभारी आहे.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।

त्याप्रमाणे माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर. असे केले असता तू मला येऊन मिळशील आणि प्रतिज्ञापूर्वक हे सत्य मी तुला सांगतो कारण तू माझा अत्यंत आवडता आहेस..... निश्चितच आईसाहेब गोलोकात असतील....

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकी परमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥

वन्दे मातरम् । वन्दे जगद्गुरूम् । वन्दे यशोदानंदनम्।।

|| श्रीकृष्णार्पणमस्तु ||

सौ. मयूरा सुभाष घाटगे
संपादिका





शिवमय – शुभेच्छा

कै. प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले-राजाज्ञे या आमच्या कै. श्रीमंत दादासाहेब राजाज्ञे यांच्या राजस्नुषा होत्या. कै. शहाजीराजे आमचे धाकटे प्रिय बंधू होते. 'संस्कृत' या अत्यंत प्राचीन आर्ष भाषेमध्ये त्यांनी छ. शिवाजी महाराजांवर अत्यंत महत्त्वपूर्ण असे संशोधन केले, याचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. राजघराण्याला साजेसे असे कर्तुत्त्व त्यांच्या हातून घडले. आपल्या कर्तुत्त्वाने राजघराण्याचा नावलौकिक त्यांनी वाढविला. अत्यंत शांत, संयमी, विद्वान, विनम्र आणि सुसंस्कृत असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. सुरुवातीच्या काळात त्यांची कधी-कधी भेट होत असे. परंतु अचानक त्यांच्या जाण्याने दुःख झाले. त्यांच्यावरील **स्मरणिकेच्या** निमित्ताने त्यांच्या कार्य-कर्तुत्त्वाला उजाळा मिळेल.या शब्दआठवणींच्या रुपाने कायम त्या स्मरणात राहतील.

कुटूंब-प्रमुख या नात्याने मी **ज्ञानज्योती तपोयोगिनी** स्मरणिकेस शिवमय – शुभेच्छा देतो.

त्यांच्या मुलांना अनेक शुभाशीर्वाद देतो.

मा. श्रीमंत छ. शिवाजीराजे भोसले
अदालतवाडा, सातारा.





डॉ.सुहासिनीदेवी राजेभोंसले अत्यंत सुसंस्कृत, शालीन आणि घरंदाज व्यक्तिमत्त्व

मा. मधुराजी जसराज, मुंबई

डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले अत्यंत सुसंस्कृत, शालीन आणि घरंदाज असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा संस्कृतचा व्यासंग दांडगा होता. शिवछत्रपतींवरील त्यांनी केलेले संशोधन अतुलनीय आहे. हे संशोधन खूप महत्त्वाचे आणि इतर नवागंतुक संशोधकासाठी संदर्भणीयही आहे. एका मोठ्या घराण्याचा वारसा त्यांना लाभलेला होता आणि त्यांच्या कर्तुत्त्वाने त्यांनी घराण्याचा नावलौकिक जपला आणि वाढविला.

डॉ. सुहासिनीदेवींच्या देवाज्ञेची दुःखद बातमी समजली. खूप वाईट वाटले. मनाला फार दुःख झाले. तेव्हा डोळ्यांसमोर त्यांच्या भेटीच्या प्रसंगाची आठवण उभी राहिली. त्यांची – माझी भेट आमच्या निकटवर्ती पद्मजांनी करवून दिली होती. सौ. पद्मजा ढमाले-देशमुख यांच्या सुहासिनीदेवी वहिनीसाहेब आहेत, असे समजले. सौ. पद्मजांशी आमचा अत्यंत जवळचा संबंध ! त्यावेळी आमचा **"राजमाता जिजाऊ आईसाहेबांच्या"**वर चित्रपट काढण्याचा मानस होता. मात्र त्यासाठी काही महत्त्वाच्या नोंदी, संदर्भांची माहिती हवी होती. त्यावेळेला चर्चा करत असताना हे सर्व कोण उपलब्ध करुन देऊ शकेल आणि तेही खात्रीशीररित्या असा विषय चालू होता. तेव्हा पद्मजांनी वेळ न दवडता आमच्या वहिनीसाहेब हे देतील, असे आत्मविश्वासाने सांगितले. आपल्या वहिनीसाहेबांविषयी त्यांना अतीव अभिमान वाटत होता, हे जाणवले. त्यांचा या विषयावर अभ्यास आहे, असे त्यांनी सांगितले आणि आमची भेट घडवून आणली.

सुहासिनीदेवी दिसायला लहान वाटत असल्या तरी त्यांच्याशी संवाद झाल्यावर माझ्या लक्षात यायला वेळ लागला नाही की, यांचा अभ्यास मोठा आहे. त्या अत्यंत बुद्धिमान स्त्री होत्या. संस्कृत, इतिहास आणि मराठी यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या ठिकाणी अनुभवास आला. भाषेवरची पकड, ओघवती वाणी आणि अफाट शब्दभांडार त्यांच्या ठायी होते. स्वयंप्रज्ञा त्यांना लाभलेली होती. मेधावी होत्या. त्यांच्या बुद्धीचे तेज अफाट होते. नंतर काही संदर्भ, माहिती त्यांनी पाठवून दिली.



एक'अभ्यासु संशोधिका' म्हणून त्या कायम स्मरणात राहतील. त्यांच्या वरील स्मरणिके विषयी कळले आनंद वाटला. **'मरावे परि कीर्तीरूपी उरावे..'** लौकिक अर्थाने कोणच कायम राहत नाही परंतु अलौकिक कर्तृत्त्वाने काही व्यक्ती चिरंजीव होतात. त्यापैकी 'सुहासिनीदेवी' हे एक नाव चमकत राहील. प्रतिकूल परिस्थितीत माणूस योग्य विचारांनी, संस्कारांनी आणि सकारात्मक प्रयत्नांनी चमकतो, हे डॉ. सुहासिनीदेवींनी खरे करून दाखविले. प्रत्येक स्त्रीने आपल्याला सिद्ध करावे. कारण जन्मजातच त्या सक्षम असतात. संघर्षाने पेटून उठावे. आपल्याबरोबर इतरांचा ही उद्धार करावा. जसे यांनी केले.

त्यांच्या वरील **ज्ञानज्योती तपोयोगिनी** स्मरणिकेस खूप शुभेच्छा !
त्यांच्या पश्चात त्यांना तीन अपत्ये आहेत. त्यांना माझा शुभाशीर्वाद !!







॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥ - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे


स्थापना : जून, १९५५ रजि. नं. : के.ई.९५

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३ (महाराष्ट्र राज्य)
फोन : (०२३१) - २६५४६५३, २६५२७२०, २६५०८७१
email:vivekanandsanstha@yahoo.com web : www.vivekanandshikshansanstha.edu.in

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे बी.ए.बी.टी.डी.लिट्. संकल्पक संस्थापक	मा. ना. चंद्रकांत (दादा) पाटील अध्यक्ष महसूल, मदत आणि पुनर्वसन सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई	प्राचार्य अभयकुमार साळुंखे एम. ए. कार्याध्यक्ष	प्राचार्या सौ. शुभांगी गावडे एम.एस्सी, बी.एड्. सेक्रेटरी

जावक क्रमांक : रामध्य दिनांक : १३/१०/२०१९



शुभ - संदेश

परमपूज्य शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्या ज्ञानयज्ञाची नांदी केली. त्याने अज्ञानी वंचित अशा बहुजन समाजाचे कल्याण झाले. या आपल्या शिक्षण संस्थेची महत्त्वाची ज्ञानशाखा म्हणजे प्रसिद्ध ऐतिहासिक सातारानगरीतील 'लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय , याची 'स्थापना १९६७ साली झाली. एका महान पावन चारित्र्याच्या व्यक्तिच्या नावाने सूरु केलेल्या या महाविद्यालयाचे उद्‌घाटन मा. ललितादेवी शास्त्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याच महाविद्यालयाचा 'मानबिंदू' म्हणजे देववाणी संस्कृत- भाषा विभाग होय. संस्थेचे संकल्पक, संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा आवडीचा विषय 'संस्कृत' होता आणि ते स्वत: संस्कृतचे अभ्यासक होते. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संस्कृत विषयाचे M.Phil, Ph.D.पदवी ज्ञानप्रदान एकमेव करणारे केंद्र म्हणजे शास्त्री महाविद्यालय होय. याचे श्रेय महाराष्ट्राचे ज्येष्ठ विचारवंत मा. डॉ. आ. ह. साळुंखे आणि संस्कृतच्या अभ्यासिका विदुषी कै. मा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे यांना जाते.

मा. बापूजींच्या प्रेरणेने राजेभोंसले यांनी संस्कृत विषयाचे अध्ययन आणि अध्यापनाचे पवित्र कार्य हाती घेतले आणि ४० वर्षे प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे कार्य केले. शिवाजी विद्यापीठातील संस्कृत विषयाच्या पहिल्या विद्यावाचस्पती पदवी घेणाऱ्या ठरल्या. आपल्या ज्ञानाने महाविद्यालयाच्या नावलौकिकात मानाचा तुरा रोवला. त्यामुळे अनेक बहुजन वर्गातील मुलांना संस्कृत हा विषय शिकता आला. त्यांच्या हाताखाली चार विद्यार्थी विद्यावाचस्पती (Ph.D.)



आणि सात विद्यार्थ्यांनी एम. फिल. पदवी मिळविली. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना चांगला माणूस म्हणूनही घडविले. बापूजींच्या इच्छेनुसार संस्कृत विषय टिकवून ठेवला.

आज डॉ. राजेभोंसले यांच्या जाण्याने पोकळी निर्माण झालेली आहे. परंतु एक अत्यंत नम्र विद्वान आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व म्हणून त्या नेहमी स्मरणात राहतील. महाविद्यालयासाठी, संस्कृत विभागासाठी पर्यायाने संस्थेसाठी त्यांनी दिलेले योगदान आणि खऱ्या अर्थाने केलेली सेवा प्रशंसनीय आहे. संस्था नेहमीच अशा गुरुदेव कार्यकर्त्यांची आठवण ठेवत आली आहे आणि पुढेही ठेवत राहतील.

त्यांच्यावरील या 'स्मरणिकेच्या' निमित्ताने पुन्हा एकदा अशाच गुरुदेव कार्यकर्त्यांची संस्थेस गरज आहे, असे वाटते.

मी संस्थेचा कुटूंबप्रमुख म्हणून **ज्ञानज्योती तपोयोगिनी** या स्मरणिकेस शुभेच्छा देतो !

त्यांच्या मुलांना शुभाशीर्वाद !!

प्राचार्य, अभयकुमार साळुंखे
कार्याध्यक्ष
श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था





मृत्युंजयसुहासिनी



मा. डॉ. शरदजी बापूजी साळुंखे
निवृत्त वैद्यकीय अधिकारी, कोल्हापूर

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार ! सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणूकीस आळा, या तत्त्वांचे अधिष्ठान घेऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शिक्षण प्रसाराच्या घोडदौडीचा त्यांचा जुना मित्र, वीणाचे वडील श्री. विष्णूपंत चौहाण यांना मोठे कौतुक आणि अभिमान होता. त्यांचे एक छोटेसे घर समर्थ मंदिराजवळ होते. बापूजी साताऱ्यात आले की, त्यांना आवर्जून भेटायचे.

मी सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयात शिकत होतो. एका रविवारी बापूजी मला घेऊन चौहाण यांचेकडे आले. दोघांचे बोलणे चालू झाले. थोड्या वेळाने वीणाने आपल्या नाजूक हाताने चहा आणून दिला. बापूजी व वीणाच्या वडिलांचा गंभीर सुसंवाद चालू होता. तो माझ्या डोक्यावरून जात होता. तोपर्यंत वीणाचा भाऊ विजय येऊन बसला. मी पहिल्यांदाच त्यांचे घरी आल्याने माझी कोणाशीच ओळख नव्हती. विजयाची ओळख करून घेतली आणि आमच्या गप्पा सुरु झाल्या. विजयच्या बहिणी वीणा आणि पुष्पा हसत, बागडत आतून बाहेर आल्या. त्यांचा खेळ चालू झाला. आम्ही कौतुकाने बघत राहिलो. विजयचा व त्याच्या छोट्या बहिणींचा निरोप घेऊन बापूजींच्या बरोबर परत आलो.

बापूजींच्या बरोबर अधूनमधून चौहाणांच्या घरी जात होतो. विजयची तसेच वीणा व तिची धाकटी बहीण पुष्पा यांचे बरोबर गट्टी जमली. आता बापूजींच्या गैरहजेरीत सुद्धा कंटाळा आला की, मी कधीतरी रविवारी चौहाण कुटुंबीयांच्या प्रेमळ सहवासात उत्साह व ऊर्जा मिळविण्यासाठी जात होतो.

विजय, त्याच्या बहिणी वीणा, पुष्पा व मी कलेकलेने वाढत होतो. अभ्यासाला आता जास्त वेळ द्यावा लागत होता. विजय पदवीधर झाला. लगेच बापूजींनी त्याला आपल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत नोकरीसाठी नेमणूक दिली. तो शिकतच राहिला. प्राध्यापक झाला आणि प्राचार्य म्हणून निवृत्त झाला.



वीणा, पुष्पा या दोघीही मोठ्या होत होत्या. माध्यामिक शिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात आली. एकदा बापूजींनी वीणाचे उत्कृष्ट वाचन ऐकले आणि तिला मॅट्रिकला संस्कृत विषय घेणेस सांगितले. त्याप्रमाणे तिने तो विषय घेऊन चांगले गुण मिळवले. बापूजींनी आनंद झाला. त्यांनी वीणास महाविद्यालयातही संस्कृत विषय चालू ठेवण्यास सांगितले. तिने ही सूचना शिरसावंद्य मानली.

आता वीणा वयाने मोठी झाली होती. बापूजी आणि माझे स्वागत करताना संकोच करू लागली. तरीपण स्वतःच्या हाताने तयार केलेला चहा आम्हांस देत असे. तिच्या बरोबर तिची लहान बहीण पुष्पा तिची शेपूट धरून वावरायची. विजय नोकरीला असल्याने त्याची गैरहजेरी मला प्रकर्षाने जाणवायची. तो आता तरुण झाला होता. या तारुण्यात वडिलांनी एका सुस्वरूप मुलीबरोबर विवाह करून दिला. घरी वीणा आणि पुष्पा यांना हक्काची वहिनी आल्याने खूप आंनद वाटला. वीणाची चूल सुटली. दोघींना गोडधोड खावयास मिळू लागले. वहिनी दोघींना प्रेमाच्या धाकाने अभ्यासाला बसवू लागली. त्यामुळे दोघी यशाच्या पायऱ्या आक्रमू लागल्या. वीणा संस्कृतचा अभ्यास गोडीने करू लागली. संस्कृतसारखा कठीण विषय स्वतःच्या परिश्रमाने तिने सोपा करून घेतला. उच्च श्रेणीत ती पास होऊन पदवीधर झाली.

आता तिला घरच्यांनी दुसरी कौटुंबिक पदवी म्हणजे तिच्या विवाहाची देण्याचे ठरविले. राजाज्ञे राजेभोंसले यांच्या खानदानी घरातील सर्वगुणसंपन्न मुलाशी हा विवाह संपन्न झाला. दोन्ही कुटुंबांना विशेषतः पुष्पाला खूप आंनद झाला. सासरच्या लोकांनी नाव बदलून तिच्या घराण्याला शोभेल असे **सुहासिनी** हे ठेवले. आपल्या हास्य वदनाने आणि सेवाभावाने सासरच्या माणसांना जिंकले. इकडे संस्कृतचा अभ्यास चालू होता. कामातून वेळ मिळेल तेव्हा ती अभ्यास करू लागली. बी. ए. झालीच होती आता एम. ए. चा अभ्यास जोमाने सुरु केला. प्राध्यापक म्हणून नोकरी सुरु होती. प्राध्यापक, पदवी असून तिने स्वतःचे शिक्षण चालू ठेवले. सर्व जबाबदाऱ्या स्वीकारून आता तिला वेध लागले ते पीएच. डी. होण्याचे ! संस्कृत विषय घेऊन पीएच. डी. होणे महाकठीण ! तरीपण सुहासिनीने कठोर परिश्रमाने ही पदवी प्राप्त करून घेतली. सगळीकडे तिचे कौतुक होऊ लागले. ती पूर्वीपासून विद्यार्थी-प्रिय होतीच. संसार आणि शिक्षण या दोन्ही आघाड्यांना यशस्वी तोंड दिले. तीन देखण्या मुलांना तिने जन्म दिला. अशा सुहासिनीस ग्रहण लागले. तिचे पती अचानक देवाघरी गेले. सर्व नातेवाईक दुःखात न्हाऊन निघाले.



आता वीणाच्या खांद्यावर शिक्षण, नोकरी आणि लहान मुलांची जबाबदारी होत्या. या तीन आघाड्यांवर ती लढू लागली. लवकरच पतीचे दुःख विसरून मुलांना घडवू लागली. मुलांना वडील गेल्याच्या दुःखाची करू न देता त्यांना आपल्या पंखाखाली घेतले. तिन्ही मुलांना उच्चशिक्षा विभूषित केले. आता पीएच. डी. करणारे विद्यार्थी तिचे मार्गदर्शन घ्यावयास येऊ लागले. त्या सर्वांना सस्मित प्रतिसाद दिला. तिची विद्वता सर्वांना खेचून घेऊ लागली. अशा शिक्षण-दानाची **सरस्वतीची** उपासना चालूच ठेवली. मोठ्या प्रयासाने तिने आपल्या मुलांना पायावर उभे केले. आता सर्व कुटुंब आनंदी झाले आणि परत सुहासिनीला मधुमेहासारख्या आजाराचे ग्रहण लागले तरी तिने आपले हास्य मालवू दिले नाही. सतत हसतमुख राहून सर्वांना आपल्या आजाराचा पत्ता लागू दिला नाही. हळूहळू आजाराची लक्षणे वाढू लागली तरी तिने धीराने तोंड दिले. पण आजाराचा दृष्टीवर परिणाम झाला, नंतर मूत्रपिंडावर परिणाम झाला. डायलिसीस करावे लागले.

अखेरीस **मृत्युंजय सुहासिनी सर्वांना दुःखी करून अनंतात विलीन झाली.**





डॉ. सुहासिनी राजेभोंसले : विनयी विद्यार्थिनी, सुसंस्कृत सहकारी



डॉ. आ. ह. साळुंखे, सातारा
संशोधक, अभ्यासक, मार्गदर्शक,
ज्येष्ठविद्वान,महाराष्ट्र

डॉ. सुहासिनी राजेभोंसले यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची कन्या मयूरा आणि काही विद्यार्थी त्यांच्या आठवणी सांगणारी स्मरणिका प्रसिद्ध करीत आहेत, ही समाधानकारक गोष्ट आहे. या निमित्ताने मी ही डॉ. राजेभोंसले यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करतो.

कोल्हापूरची श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही आमची मातृसंस्था. या संस्थेनेच लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाची स्थापना केली. भारताचे अगदी अल्पकाळात मोठी कर्तबगारी करून गेलेले "माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री" यांच्या नावाने हे महाविद्यालय सुरू झाले. डॉ. बापूजी साळुंखे हे आमच्या संस्थेचे आणि महाविद्यालयाचेही संस्थापक होते. संस्कृत ही त्यांच्या अत्यंत आवडीची आणि अभ्यासाची भाषा होती. त्यामुळेच त्यांनी आमच्या महाविद्यालयात आग्रहाने संस्कृत विषयाच्या अध्यापनाची सोय केलेली होती. त्यांच्या प्रेरणेमुळेच आणि मार्गदर्शनामुळेच मी काय किंवा डॉ. राजेभोंसले काय या महाविद्यालयात संस्कृत अध्यापनासाठी रूजू झालो आणि आम्हांला अध्यापनाच्या आणि संशोधनाच्या मुक्त संधी मिळाल्या. स्वाभाविकच, आम्हां दोघांच्याही मनात डॉ. बापूजी साळुंखे यांच्याविषयी नितान्त कृतज्ञता आहे.

डॉ. राजेभोंसले या प्री-डिग्री ते तृतीय वर्ष बी. ए. अशी चार वर्षे माझ्या संस्कृतच्या विद्यार्थिनी होत्या. एक नम्र, शालीन, जिज्ञासू आणि अभ्यासू विद्यार्थिनी म्हणून त्या माझ्या स्मरणात आहेत. त्यांची आकलनशक्ती अगदी उत्तम होती. शिवाय, त्यांचे वर्गातील वागणेही यथोचित होते. त्यांनी वर्गात कधी उद्धटपणा वा उर्मटपणा केल्याचे मला आठवत नाही. पुढे त्यांनी अनेक पदव्या प्राप्त केल्या आणि आपल्या जिज्ञासूवृत्तीचा परिचय करून दिला.

त्यानंतरच्या काळात त्यांनी संस्कृतमध्ये एम. ए. केल्यानंतर त्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातच संस्कृत विभागात माझ्या सहकारी म्हणून रूजू झाल्या. सुमारे २५ वर्षे आम्ही



एकाच विभागात सहकारी म्हणून काम केले. त्या जशा एक उत्तम विद्यार्थिनी होत्या, तशाच त्या सहकारी म्हणूनही अतिशय सुसंस्कृत आणि सहकार्यशील प्रवृत्तीच्या होत्या.' सौजन्य ' हा एक प्रकारे त्यांचा स्थायी भाव होता. त्यामुळेच या २५ वर्षांत अभ्यासक्रमाच्या विभागणीमध्ये आम्हां दोघांमध्ये कधीही मतभेद, तणाव वा संघर्ष झाला नाही. आपापल्या आवडीप्रमाणे आणि अभ्यासाच्या खास ग्रंथावरून आम्ही आपापल्या आणि एकमेकांच्या सोयीने ही विभागणी अगदी समंजसपणे करीत असू. याचा परिणाम म्हणूनच आमच्या महाविद्यालयातील आमचा संस्कृत विभाग दूरदूरपर्यंत ख्याती पावलेला होता. त्यामुळेच सांगली, मिरज, कराड, वाई अशा ठिकाणांहूनही विद्यार्थी - विद्यार्थिनी संस्कृत विषयाच्या अध्ययनासाठी आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेत असत. या ख्यातीमुळेच आमच्या महाविद्यालयात संस्कृत विषयात एम. फिल. चे वर्ग चालू राहिले.

डॉ. राजेभोंसले यांनी अध्यापन करीत असताना एका आगळ्या विषयावर संशोधन करून शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली. **'छत्रपती शिवाजी महाराज' हे** आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान आहे. त्यांनी स्वराज्य प्राप्तीसाठी जो संघर्ष केला, जे धोके पत्करले आणि तरीही मानवी मूल्यांची अगदी काळजीपूर्वक जपणूक केली. स्वातंत्र्याची उत्कट आकांक्षा हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. त्यांनी आपले सगळे आयुष्य त्यासाठी समर्पित केले.

याविषयावर मराठी, हिंदी इत्यादी भारतीय भाषांबरोबरच इंग्रजी, डच, फ्रेंच, पोर्तुगीज इ. युरोपीय भाषांमध्येही अगदी विपुल लेखन झालेले आहे. उर्दू, फार्सी, राजस्थानी, तमीळ इत्यादी भाषांतूनही खूप साहित्य आहे. या सगळ्या साहित्याची अनेक अभ्यासकांनी चर्चा केलेली आहे. परंतु संस्कृत भाषेमध्येही शिवचरित्राचे असंख्य तपशील मिळतात, या गोष्टीची मात्र फारशी चर्चा होत नाही. संस्कृतमध्ये शिवचरित्राविषयी काही माहिती असेल, याची फारशी कल्पनाही अनेक जणांना नसते. डॉ. राजेभोंसले यांनी आपल्या संस्कृत ज्ञानाचा उपयोग **'संस्कृतमधील शिवचरित्र'** लोकांपुढे आणण्यासाठी करण्याचे ठरविले आणि त्याच विषयावर संशोधन करून पीएच. डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी आपल्या या अभ्यासाद्वारे शिवचरित्राचे संस्कृतमधील अनेक पुरावे जनतेसमोर आणण्याचे मोठे काम केले. एकप्रकारे शिवचरित्राला उत्तम न्याय देण्याचेच हे काम होते. या विषयावर फारसे काम झालेले नसल्यामुळे त्यांच्या या अभ्यासात एक नावीन्यही होते. एक प्रकारे त्यांनी 'शिवरायांच्या युगप्रवर्तक' कार्याला आपल्या संशोधनाद्वारे विनम्र अभिवादनच केले आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

त्यांच्या या प्रबंधाचे पुढे सातारा येथील 'दैनिक ऐक्य 'मधील लेखमालेच्या स्वरूपात प्रकाशनही झाले आणि त्यामुळे ते व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोचले. मी त्यांच्या या संशोधनाबद्दल त्यांना संपूर्ण समाजाच्या वतीनेच अंत:करणपूर्वक धन्यवाद देतो.

निवृत्तीनंतर अगदी अल्पकाळातच अलीकडे त्यांचे निधन झाले. हे एक प्रकारे अकाली निधनच होते. निवृत्तीनंतर त्यांना अधिक संशोधनासाठी भरपूर वेळ मिळाला असता आणि त्यांच्याकडून उत्तमोत्तम संशोधन झाले असते. त्यामुळे त्यांचे निधन हा एक प्रकारे मोठा धक्काच होता. परंतु 'कालाय तस्मै नमः' असे म्हणण्याखेरीज आपल्या हाती काहीच नाही.

मी त्यांच्या स्मृतीला पुन्हा एकदा विनम्र अभिवाद करतो.





लाल बहादूर शास्त्री कॉलेजच्या मानबिंदू - डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ
अध्यक्ष, विद्यासमिती. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

लाल बहादूर शास्त्री कॉलेज, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील नामांकित व गुणवत्ता संपन्न महाविद्यालय आहे. कोणतेही संस्कार केंद्र भौतिक सुविधामुळे संपन्न, वैभवशाली होते असे नाही तर तेथील गुणवान अभ्यासू शिक्षक वर्गामुळे संस्कार केंद्रास जनमान्यता मिळते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था व सर्व पदाधिकारी याबाबतीत नेहमीच आग्रही राहिलेत की, आमचा गुरुदेव कार्यकर्ते अध्यापन संशोधन विद्यार्थी केंद्रित उपक्रम यात सक्रिय असावा. या महाविद्यालयातील अनेक गुरुदवे कार्यकर्ते यादृष्टीने सतत कार्यरत आहेत. म्हणूनच राष्ट्रीय पुर्नमूल्यांकन (नॅक) समिती A मानांकन दिले व नवीन पध्दतीने झालेल्या मूल्यांकनात महाराष्ट्रात हे महाविद्यालय पहिले महाविद्यालय ठरले. ३.१५ मानांकन मिळवण्यात ज्या अनेक गुरुदेव कार्यकर्तेचे योगदान आहेत त्यात संस्कृत विभाग व संस्कृत विभागाच्या तत्कालीन प्रमुख प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनी राजेभोंसले एक होय.

महाविद्यालयाचा संस्कृत विभाग- एक दीपस्तंभ-

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक प. पू. डॉ. बापूजी साळुंखे संस्कृतचे गाढे विद्वान व व्यासंगी होते. ते संस्कृतचे शिक्षक होते. 'श्रीमद्भगवतगीतेवर' त्यांचे अपार प्रेम व श्रद्धा होती. संस्थेची प्रार्थना त्याचेच उदाहरण होय. तर प्रार्थनेच्या शेवटचा श्लोक वेदामधून घेतला आहे. संस्कृत प्राचीन पुरातन व देवभाषा म्हणून मान्यता प्राप्त भाषा आहे. तिचा संस्थेचा आणि महाविद्यालयाचा गाढ ऋणानुबंध आहे. अशी सुसंस्कारी आदर्श, तत्त्वज्ञान संपन्न भाषेचा ग्रामीण भागात विकास, प्रचार-प्रसार करण्याचे कार्य याच महाविद्यालयातून अखंडपणे चालू आहे. या ज्ञानयज्ञातील एक समीधा, अभ्यासू व्यक्तिमत्त्व चिंतक व संशोधन डॉ. राजेभोंसले मॅडम होय.

मी १९९३ साली प्राध्यापक म्हणून तासगावहून एल. बी. एस. कॉलेज येथे बदलून आलो. नंतर मॅडमबरोबर सहकारी म्हणून ११ वर्षे एकत्रित काम केले. महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविणेसाठी त्यांचे संस्कृत विभागाचे योगदान इतर विभागांना आदर्शवत् होते.

त्यानंतर या महाविद्यालयात दि. २१/०६/२०११ रोजी प्राचार्य म्हणून हजर झालो. तेव्हा पासून ते मॅडमची सेवानिवृत्ती व त्यानंतरच्या काळातही त्यांचा सहवास, संपर्क राहिला. एक मृदू भाषी, संस्कृतचे प्रचंड ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व, विद्यार्थ्यांच्या प्रती ममताभरी दृष्टी, संशोधनातून सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये रुजवण्याची मनोवृत्ती मला नेहमीच भावली.

संस्कृत पदवी पदव्युत्तर संशोधनाचे केंद्र-

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय ग्रामीण भागातील व सातारा शहरातील अल्पसंख्यांक वर्गातील मुलींच्या शैक्षणिक वाढीसाठी सुरु करण्यात आली. या महाविद्यालयात संस्कृतचे पदवी व एम. फिल., पीएच. डी. मार्गदर्शन व अध्यापनाचे कार्य सुरु आहे. डॉ. आ. ह. साळुंखे व डॉ. श्रीमती राजेभोंसले मॅडम यांनी या विभागाची धुरा समर्थपणे संभाळली. १९८७ पासून पीएच.डी. (संस्कृत) च्या मौखिक-परीक्षा याच महाविद्यालयात घेण्यात सुरवात केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यासाठी संस्कृतमधील संशोधन व मार्गदर्शन करण्याची संधी या महाविद्यालयाने उचलली.

शिवाजी विद्यापीठातील हे कार्य करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे. याचा संस्थेस सार्थ अभिमान आहे. गुणवंता वाढीसाठी संस्था प्रशासन व मी नेहमीच आग्रही राहिलो आहे. संस्कृत भाषेची मुलांना गोडी लागावी त्यात चांगले संशोधन व्हावे. संदर्भ ग्रंथ मुलांना उपलब्ध व्हावेत यांसाठी संस्कृत विभाग व महाविद्यालय सदैव कार्यरत राहिले. मॅडमच्या प्रयत्नातून सरल संस्कृत- संभाषण- कोर्स सुरु केला. त्यासाठी युजीसीने एक लाख रुपायाचे अनुदान दिले. याचा आम्हांस अभिमान आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये येण्याचा मान संस्कृत विभागातील कु. माया कुलकर्णी, कु. दिपाली साठे, कु. सुजाता दीक्षीत, कु. स्वाती पेंडसे, कु. माधवी म्हसवडे, कु. प्रतिष्ठा कुलकर्णी व मयूरा राजेभोंसले यांनी मिळविला. बहुजन समाजातील मुले-मुली संस्कृत भाषेत उच्चविदया विभूषित होऊन, संशोधन करुन अनेक उच्च पदावर कार्यरत आहेत. विशेषत: मुस्लिम, दलित अल्पसंख्याक समाजातील मुली संस्कृत विषय घेऊन पदवी संपादन करीत आहेत. याचे सर्व श्रेय या विभागास देताना मला मनस्वी आनंद व समाधान प्राप्त होत आहे आणि या कामी मॅडमचे योगदान सर्वश्रूत आहेत.

भारत सरकारची मेरीट शिष्यवृती प्राप्त करणारे विद्यार्थी या महाविद्यालयाचे या विभागाचे वैभव होय. कु. विरश्री वैदय, कु. शितल काटकर, कु. अनिता शिंदे, कु. मयूरा राजेभोंसले या संस्कृतच्या विद्यार्थीनी हे यश प्राप्त करुन महाविद्यालयाच्या लौकिकात वाढ केली. यामध्ये संस्कृत विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शक महत्त्वाचे आहे.

चिंतक व अध्ययनशील मार्गदर्शक डॉ. राजेभोंसले मॅडम -

डॉ. राजेभोंसले मॅडम या महाविद्यालयात १९७९ साली हजर झाल्या आणि ऑगस्ट २०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्या. आपली संपूर्ण सेवा याच महाविद्यालयात करण्याचे भाग्य त्यांना लाभले. विशेष म्हणजे मॅडम याच कॉलेजच्या विद्यार्थीनी होय आणि येथेच त्या प्राध्यापिका झाल्या. असे भाग्य कमी लोकांना लाभले. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून १९८६ साली संस्कृत विषयात पीएच. डी. संपादन केली.

संस्कृत विषयात पहिली पीएच. डी. मिळविणा-या मॅडम प्रथम पहिल्या महिला होय. याचा आम्हांस अभिमान आहे. १९८३पासून अध्यापनाबरोबरच संशोधनाचे व्रत सुरु केले ते शेवटच्या श्वासापासून चालू ठेवले. रामायण, महाभारत, वेद, गीता, उपनिषंदावरील त्यांचे संशोधन महत्त्वाचे ठरले. मी प्राचार्य असल्याने तीन विद्यार्थ्यांच्या पीएच. डी. मौखिकी-परीक्षाचा लाभ मिळाला. त्यातूनच त्यांची चिकाटी, चिंतनशीलता संशोधन दृष्टीचा मला अनुभव आला. विद्यार्थी-प्रिय अध्यापक, संशोधक मला दिसून आले.

शिवाजी विद्यापीठातील कार्य-

मॅडम यांचा शिवाजी विद्यापीठ व इतर विद्यापीठाशी संस्कृत अभ्यासक्रमामुळे नेहमीच संबध आला. आपल्या अभ्यासू वृत्तीचा त्यांनी परिचय करुन दिला. अभ्यासमंडळ सदस्य फॅकल्टी मेंबर, एम. फिल.,पीएच. डी. संशोधन कमिटी , विषयतज्ज्ञ -निवड समिती, एम. फिल, पीएच. डी. मार्गदर्शक, पेपर सेटींग अशा अनेक कमिटींवर सेवा निवृत्तीपर्यंत कार्यरत राहिलेल्या मॅडम होय.

आंतरराष्ट्रीय मान्यता-

मॅडमच्या कार्यांची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. त्यांना विविध सन्मानाने गौरवांकित केले आहे.

1. Selection for the Asia's who's who of men and women of achievement in Reference Asia- who's who **vol- 6-1991**
2. Member of ABI Research Association, U.S.A.
3. Member of board of advisor, selected by the American Biographical Institute.
4. Non-Government member of Sanskrit standing Committee, Maharashtra State.
5. Non-Government member of Maharashtra State, Mahakavi, Kalidas Sanskrit sadhana Puraskar.

संस्था विकासात राजेभोंसले परिवाराचे योगदान-

डॉ. राजेभोंसले मॅडमची मुलाखत डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वत: घेतली होती. त्यांनी पीएच. डी. प्राप्त केल्यानंतर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. शरद साळुंखे यांनी त्यांचे अभिनंदन केले. मॅडमच्या सेवानिवृत्ती समारंभास ही त्यांची उपस्थिती महत्त्वपूर्ण होती. राजेभोंसले परिवार व श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था याचा ऋणानुबंध आहे. श्री भवानी विद्यामंदीर सातारा, सौ. सुशिलादेवी गर्ल्स हायस्कूल, सातारा न्यु इंग्लिश स्कूल कोंडवे, राजेरामराव महाविद्यालय जत व काकासाहेब महाविद्यालय तळमावले स्थापनेत त्यांचा मोठा सहभाग आहे.

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय नॅकसाठी योगदान-

नॅक म्हणजे गुणवत्ता मूल्यांकन या महाविद्यालयाचे नॅक ने तीन वेळा मूल्यांकन केले. त्यावेळी त्यांनी संस्कृत विभागाचा गौरवाने उल्लेख केला आहे. थर्ड नॅक मूल्यांकनाच्या वेळी पीअर-टिम चेअरमन डॉ. सुधा रानी पाण्डेय, माजी कुलपती उत्तराखंड संस्कृत विद्यापीठ यांनी या महाविद्यालयात पदवी ते एम. फिल. पीएच. डी पर्यतचे संस्कृतचे अध्यापन होत असल्याने भेट दिली. विभागाच्या कार्यांचा नॅक समितीने गौरव केला.

राजेभोंसले परिवाराने महाविद्यालयाच्या गुणवत्तेच्या वाढीसाठी नेहमीच योगदान दिले. मॅडम विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका होत्या. त्यांना कु. मयुरा राजेभोसले हिने साथ दिली. कु.मयूराने या महाविद्यालयात काही काळ अध्यापन करुन संस्कृतची सेवा केली संस्थेत त्या कार्याची नोंद आहे.

काही तांत्रिक आडचणीमुळे ही सेवा खंडीत झाली. मी व संस्था राजेभोंसले परिवाराच्या ऋणानुबंधात आहोत. जर कु. मयूराची इच्छा व तयारी असेल तर तिला पुन्हा सेवेची संधी दिली जाईल. डॉ. राजेभोंसले मॅडमचे संपन्न समृद्ध संस्कृत विभाग हे स्वप्न साकार होईल. हीच डॉ. श्रीमती राजेभोंसले मॅडमना श्रद्धांजली ठरेल.

प्राचार्य म्हणून कार्य करताना एक आदर्श सहकारी म्हणून डॉ. राजेभोंसले मॅडम यांची आठवण येते.

शेवटच्या श्वासापर्यंत संस्कृतची सेवा करणा-या सुसंस्कृत विदुषीला संस्थेमार्फत भावपूर्ण श्रद्धांजली....!





सुसंस्कृत ज्ञानमाऊली

प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे
कला-वाणिज्य महाविद्यालय, सातारा



परिस्थिती माणसाला घडवित असते. प्रचंड दुःखात दोनच गोष्टी घडू शकतात, एकतरं माणूस कोसळून पडतो किंवा उसळून उठतो. जे उसळून उठतात त्यांचा आदर्श समाज घेत असतो. शिक्षण क्षेत्रातील पीएच. डी. सारखी शिखर पदवी आणि अत्युच्च सन्मान संपादन करणाऱ्या प्रा. डॉ. सुहासिनी राजेभोंसले राजाज्ञे हे प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत प्रगतीच्या आणि प्रकाशाच्या वाटेने जाणारे प्रसन्न आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व आहे.

राजेभोंसले मॅडम यांना आम्ही विद्यार्थी दशेत पाहिले आणि त्यानंतर लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात त्यांचा सहकारी प्राध्यापक म्हणून काम करता आले. त्यांची स्टाफरूम मधील उपस्थिती मला **देवघरातील समई** सारखी वाटायची. मॅडमचे जीवनही असेच. त्या वाती सारख्या जळाल्या आणि ज्योती सारख्या उजळल्या. एक शांत, प्रगल्भ आणि सात्विक व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी ज्ञानाच्या प्रांतात आपली प्रतिमा उंचावली आहे.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि राजाज्ञे कुटुंबाचे जिव्हाळयाचे नाते होते. आपला कोंडव्यातील आणि साताऱ्यातील जागा त्यांनी विवेकानंद संस्थेच्या शाळेसाठी दिली होती. त्या राजाज्ञे कुटूंबाची विनम्र, विद्वान अशी सून म्हणजे प्रा. डॉ. सुहासिनी. बापूजींचा संस्कृत आणि मराठी विषयाचा व्यासंग मोठा होता. मॅडमचाही संस्कृत विषय. तो केवळ शिकविण्याचा विषय नव्हता. तो त्यांचा जगण्याचा व्यासंग होता. छंद होता. महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे हे त्यांचे गुरू आणि विभाग-प्रमुख होते. त्या दोघातले संभाषण हे संस्कृत आणि सम्यक विचारांचे विलोभणीय दर्शन घडविणारे असायचे. आपल्या अवतीभवतीचे वातावरण हे माणसाचे वैचारिक भरण-पोषण करत असते आणि त्या दृष्टीने आम्ही तरूण प्राध्यापक अशा संपन्न व्यक्तिमत्त्वांमुळे प्रकाश वाटेवर चालण्यासाठी प्रेरित झालो.

आ. ह. नेहमी म्हणायचे, 'तुम्ही योग्य टप्प्यात आणि वयात पीएच. डी. झाले पाहिजे. तुम्हांला संधी आहे.. अभ्यासाची सोय.. संगतीला समृद्ध ग्रंथालय आहेच. तरूण वयात पीएच. डी. सारखी संशोधनातील पदवी मिळविली की, पुढील आयुष्यात त्या विषयाला अधिक न्याय देता येतो'



राजेभोंसले मॅडम १९८६ ला पीएच.डी. झाल्या. विशेष म्हणजे त्या संस्कृत बरोबर मराठीच्याही एम. ए. होत्या. त्यांनी बी. एड. ही केले होते. संसाराची जबाबदारी शिरावार घेऊन शिक्षणातील शिखर पदव्या संपादन करण्यासाठी त्यांना जो संघर्ष करावा लागला, तो मोठा रोमहर्षक भाग आहे.. त्यांचा जीवन प्रवासच हाच मुळात एका जिद्दीचा, चिकाटीचा आणि ज्ञाननिष्ठेचा आहे.

राजाज्ञे-राजेभोंसले मॅडम यांचे माहेर कुंभारगाव. घरी उदंड धनधान्य अशा संपन्न हिमंत बहादूर चौहाण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडिलांचा पुण्याला व्यापार होता. घरात श्रीमंती नांदत होती. पण अचानक पानशेत धरण फुटले.. कुटुंब विस्कटले.. वडिलांची ताटातूट झाली आणि अशा परिस्थितीत उंब्रजच्या मामांनी आसरा दिला.. धरण फुटणे आणि मायेच्या माणसांची ताटातूट होणे ह्या दृष्टचक्रातून त्यांना बऱ्याच वेळा जावे लागले. लग्नानंतर अवघी नऊ-दहा वर्षे त्यांना पतीची साथ लाभली.. पती निधनापूर्वी त्यांनी मोठया चिकाटीने पीएच. डी. चे संशोधन लेखन पूर्ण करून प्रबंध विद्यापीठात सादर केला होता. पीएच. डी. साठी सासऱ्यांचा भक्कम आधार होता. संशोधनात सर्वदूर संचार करावा लागे. त्यांनी सासऱ्यांना घेवून प्रवास केला.. सुनेलाच आपला तिसरा मुलगा मानणारे दिलदार व श्रीमंत मनाचे सासरे मॅडमला लाभले होते.

सुनेच्या 'सुहासिनी' नावामागे डॉक्टर पदवी लागवी, ही त्यांची आर्त इच्छा होती. पण नियतीपुढे माणूस दुबळा असतो. मॅडमनी मोठया हिमतीने 'पीएच. डी.' पदवी प्राप्त केली पण त्यावेळी पती हयात नव्हते आणि सासरेही परलोकवासी झाले होते. ही घटना १९८६ची. त्यावेळी पासून राजाज्ञे राजेभोंसले मॅडमचा एकाकी प्रवास सुरू झाला.. परिस्थितीने त्यांना घायाळ केले.. पण त्या हरल्या नाहीत.. नमल्या नाहीत.. झाड खच्ची केल्यावर जसे वाढते.. सावली देते.. फळे देते.. मॅडमही त्याच तत्वाने वाढल्या. अन्यायाविरूद्ध त्यांनी आवाज उठविला. त्या निर्भय आणि सत्यप्रिय पत्रकार होत्या. स्त्रियांच्या शोषणविरूद्ध त्यांनी संघर्ष तर केलाच शिवाय पोलीस संघटनेला मदत केली. एका बाजूला न्यायासाठी लढा तर दुसऱ्या बाजूला ज्ञानाचा लळा हे त्यांचे वैशिष्ट होते. त्यांनी पतीच्या माघारी आपल्या लेकरांना शिकविले. घडविले. त्याच त्यांच्या वडील झाल्या. खंबीरपणे लेकरांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. स्त्रीही पुरूषार्थ दाखवू शकते, याची सार्थ प्रचिती दिली..

मॅडमच्या ज्येष्ठ कन्या रेश्मा ह्या मॅडमच्याच पावलावर पाऊल टाकत एम.ए., बी. एड. झाल्या. त्यांनी संस्कृत विषयात उच्च पदवी संपादन केलीच शिवाय त्याही पुण्यनगरीत 'शिक्षिका' म्हणून अध्यापन कार्य करत आहेत. चि. राजदीप हे व्यापारक्षेत्र निवडून मातोश्रींच्या पिताजींचा वारसा जपला आहे. चि. मयूरा ह्या सुद्धा एम्. ए., एम. फिल., नेट असून त्यांनी साताऱ्याच्या लाल

बहादूर शास्त्री महाविद्यालयात जवळ जवळ १२ वर्षे प्राध्यापक म्हणून अध्यापन कार्य केले आपल्या आईसमवेत... मातोश्रींच्या वक्तृत्त्वाचा आणि कर्तृत्त्वाचा वसा त्यांनी जपला. जपत आहेत. एकूण मॅडमनी पतीच्या माघारी आपल्या मुलांना ताकदीने उभे केले. त्यांना सन्मानाने जगण्यासाठी 'स्वाभिमानी आणि स्वावलंबी' केले.

आपल्या पोटच्या मुलांबरोबरच मॅडमनी अनेक अनाथ जीवांना ळळा लावला. त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेतली. अनेक संस्कार शिबीरातून अशा मुलांना जगण्याचे सामर्थ्य दिले. जगायचे कशासाठी हे ज्याला कळते त्याला सारे काही सहन करता येते. मॅडमनी हे सारे सहन करीत स्वतःला सिद्ध केले. चार दशके श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत प्राध्यापिका म्हणून सेवाकार्य केले. मुलांच्या मनात संस्कृत विषयाची गोडी निर्माण केली. त्यांच्या कुशल आणि वत्सल मार्गदर्शनाखाली ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. आणि एम्.फिल. पदव्या संपादन केल्या.. नामांकित ग्रंथ जर्नल्स, वृत्तपत्रातून मॅडमचे संशोधनपर लिखाण प्रकाशित झाले आहे.. त्यांच्या ह्या अक्षर कार्याचा गौरव म्हणूनच महाराष्ट्र शासनाने 'महाकविकालिदास संस्कृतसाधना पुरस्कार' देवून सन्मान केला.

आयुष्याची सार्थकता ही बँकेत जमा असलेल्या संपत्तीवर मोजली जात नाही तर ती आयुष्याभर जपलेल्या मूल्यांवर मोजली जाते. अत्यंत साधेपणाने, सात्विकतेने आणि ज्ञाननिष्ठेने आयुष्याला वैभव प्राप्त करून देता येते, हे मॅडमनी दाखवून दिले. आपल्या ध्येयाशी स्वतःला बांधून घेवून अथकपणे वाटचाल करणाऱ्या मॅडम सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर आल्या तेव्हा थकल्या होत्या. जिन्याच्या पायऱ्या चढताना त्यांना धाप लागायची. त्याही परिस्थितीत त्या जिने चढून वर्गात जायच्या. तास घ्यायच्या. एखादी गोष्ट मनावर घेतली तर ती पूर्णत्वाला नेण्यासाठी त्या कोणाचे ऐकायच्या नाहीत, स्वतःला प्रचंड त्रास करून घ्यायच्या. नारायणपूरच्या श्री दत्तरायांचे दर्शन आणि परमपूज्य आण्णामहाराजांचे आशीर्वाद घेण्यासाठी त्या ज्या व्रतस्थ पद्धतीने प्रवास करायच्या तोही मन थक्क करणारा होता.

मॅडमचे सारे आयुष्य हा ऊन-सावलीचा खेळ होता. त्यात उन्हाची तीव्रता अधिक होती. सावलीची शीतलता थोडी होती. पण आपल्या वाटयाला फारशी सावली आली नसली तरी अनाथांच्या वाटयाला ती यावी. आपल्याला शिक्षणाचे धडे गिरवताना त्रास झाला तो गोरगरीब लेकरांच्या वाटयाला तो येवू नये. यासाठी सारे आयुष्य समर्पित करणारी **सुसंस्कृत ज्ञानमाऊली** त्यांच्या मध्ये वसली होती. त्यांचे वात्सल्य कृतीतून डोकावायचे. त्यांचे कर्म सेवामय झाल्यामुळे जीवन सात्विक सुगंधाने सुवासित झाले होते.

पुण्यातील डॉ. देव यांच्या दवाखान्यात ऐन दिवाळीत त्या जन्माला आल्या. अनेकांच्या आयुष्याला प्रकाशित करून त्या दिवाळीतच देवाघरी गेल्या.

'मी अविवेकाची काजळी ।
फेडुनि विवेक दीप उजळी।
तें योगिया पाहे । दिवाळी ।।'

ह्या संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या विचारांचे मूतिमंत रूप असणाऱ्या ह्या ज्ञानमाऊलीने अनेक लेकरांच्या मनात देवघर निर्माण केले.. विद्यार्थ्यांच्या रुपाने अनेक विवेकदीप प्रज्वलित केले.

त्यांच्या चिरंतन चैतन्यदायी स्मृतीस विनम्र प्रणाम !!





अध्ययन,चिंतन,संशोधन आणि वात्सल्याचे प्रतीक म्हणजे डॉ.श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम

डॉ. बी. डी. सगरे, सातारा
हिंदी विभाग-प्रमुख, सातारा.



आज विज्ञान, तंत्रज्ञान, मोबाईल, कम्प्युटर, ॲपचे युग आहे. पुस्तक, संदर्भग्रंथ, वाचन-लेखन, श्रवण यांपासून नवीन पिढी दूर जात आहे. अशावेळी चिंतनशील अध्यापक, गुरु म्हणून ज्यांच्या चरणावर नतमस्तक व्हावे अशी पाऊले काळाच्या पडद्याआड जात आहेत. अशावेळी मॅडमचे जाणे मनाला चटका लावून जाते. आज शरीराने मॅडम जगात नाहीत परंतु त्यांच्या गुणांच्या जोरावर सर्वांच्या मनात स्थान मिळवणाऱ्या मॅडम आज ही माझ्या मनात जिवंत आहेत. त्या फक्त राजेभोंसले घराण्याच्या नव्हत्या तर असंख्य प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक होत्या. अशा मॅडमना माझी भावपूर्ण श्रद्धांजली, आदरांजली !

माझा विषय हिंदी, मॅडमचा विषय संस्कृत. खरे तर संस्कृत सर्व भाषांची जननी. देवभाषा, ज्येष्ठ व श्रेष्ठ भाषा होय. त्यामुळे श्रद्धेय मॅडम माझ्या ज्येष्ठ भगिनी होय. त्या भाषेच्या मार्गदर्शिका नेहमीच राहिल्या आहेत. मी ऑगस्ट १९९६ रोजी एल. बी. एस. कॉलेज, सातारा येथे हजर झालो तेंव्हापासून शेवटपर्यंत सेवानिवृत्तीनंतर ही इहलोकीची यात्रा संपेपर्यंत आणि आज ही मॅडमचे माझ्या जीवनात ज्येष्ठ भगिनी हेच स्थान राहिले.

एल. बी. एस. कॅालेजचे संस्कृतचे ज्ञानपीठ मॅडम –

एल. बी. एस. कॉलेजमध्ये पदवी व एम. फील.,पीएच. डी. संस्कृतचा अभ्यासक्रम, मार्गदर्शन होत आहे. त्याचे कारण डॉ. आ. ह. साळुंखे व डॉ. राजेभोंसले मॅडम होय. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात संस्कृत या विषयावर संशोधन करणारे हे एकमेव महाविद्यालय होय. याचे सर्व श्रेय डॉ. साळुंखे सर व डॉ. राजेभोंसले मॅडम यांनाच जाते. संस्कृत अवघड भाषा परंतु सहज, सोप्या भाषेत मुलांना समजावून सांगणाऱ्या मॅडम होय. सन १९८७ पासून सातारा येथे संस्कृत विषयावर संशोधनाचे कार्य चालू होते. विद्यापीठात ही सुविधा नाही परंतु सातारा शहरात ही संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळाली. आज अखेर मॅडमच्या मार्गदर्शनाखाली ०७ विद्यार्थी एम. फील. व ०४ विद्यार्थी पीएच. डी. झाले. UGC चा सरल संस्कृत-संभाषण-वर्ग त्यांच्यामुळे येथे सुरु झाला.



आदर्श संशोधक-

संस्कृत भाषा अभ्यासने व त्यावर चिंतन करून संशोधन करणे म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखे होय. परंतु मृदुभाषी, चिंतनशील मॅडमनी हे शिवधनुष्य उचलले. संस्कृत, व्याकरण, शब्दार्थ, भाषिक, सामाजिक संदर्भ यांचा समन्वय म्हणजे मॅडमचे संशोधन कार्य होय. संशोधनवृत्ती अभ्यासाने, चिंतनाने प्राप्त होते ती मॅडमनी प्राप्त केली. स्वत: विषयाचा अभ्यास करून संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मॅडम होत्या. भगवतगीता, रामायण, महाभारत, वेद, पुराण यांचा अभ्यास असणाऱ्या मॅडम. त्यांच्या हाताखालून, मार्गदर्शनातून घडवलेला संस्कृतचा संशोधक हा खऱ्या अर्थाने परिपूर्ण संशोधक ठरला.

संस्कृत पीएच. डी. मौखिकीचे केंद्र-एल. बी. एस. कॉलेज-

संस्कृत भाषा व त्यामधील विचार, उच्चार, संशोधन, संदर्भ ऐकण्याचे भाग्य मला सातारा येथे लाभले. संस्कृत पीएच. डी. चा व्हायवा ह्या एल. बी. एस. कॉलेज मध्येच होत असे. अशावेळी मॅडम मला आवर्जून बोलावत. मीही त्या सुवर्ण संधीचा फायदा घेत असे. मॅडममुळे मार्गदर्शक कसा असावा, विद्यार्थी व मार्गदर्शकांचे संबंध कसे असावेत, हे मी त्यांच्याकडून शिकलो. मी हिंदीचा मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. परंतु संशोधन क्षेत्रात मॅडम माझ्या गुरु व आदर्श राहिल्या.

मॅडम सेवानिवृत्त झाल्या, त्यांचे शरीर थकले, व्हीलचेअर वरून त्यांचा प्रवास सुरु होता. इहलोकीची यात्रा संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर त्यांचा शेवटचा पीएच.डी.च्या विद्यार्थ्याचा व्हायवा झाला. शरीर थकले परंतु मन खंबीर व कणखर होते. विद्यार्थ्यांच्या हितासाठीच देह झिजवणाऱ्या मॅडमनी व्हायवा पूर्ण केला. विधिलिखित होते की काय पण त्यानंतर मॅडम गेल्या. असा मार्गदर्शक होणे नाही.

संस्था विकासात राजेभोंसले परिवाराचे योगदान-

संस्थेत प्रवेश करताना मुलाखत घेतली जाते. मॅडमची मुलाखत स्वत: शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी घेतली. हे भाग्य मॅडमना लाभले. संस्था, महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास करणे हेच राजेभोंसले परिवाराचे ध्येय होते. मॅडमचे सासरे कै. श्रीमंत दादासाहेब राजाज्ञे यांनी भवानी हायस्कूल व सुशिलादेवी गर्ल्स हायस्कूलला सातारा येथे विनामूल्य जागा संस्थेस दिली. न्यू इंग्लिश स्कूल, कोंडवेसाठी ४७ खणाचा वाडा दिला. मॅडमचे वडील दादाजी चौहाण यांनी जतचे डफळे सरकार यांच्याशी चर्चा करून त्यांना जतचे महाविद्यालय श्री स्वामी विवेकानंद

शिक्षण संस्थेकडे देण्यास प्रवृत्त केले. काकासाहेब चव्हाण व आनंदराव चव्हाण हे मॅडमच्या वडिलांचे चुलत बंधू यांनी डॉ. बापूजींना सहकार्य करून तळमावले येथे कॉलेज उभे केले. मॅडमच्या माहेर व सासरचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था व डॉ. बापूजी साळुंखे परिवार यांचेशी आपुलकीचे नाते होते. आपली मातृसंस्था वृद्धिंगत व्हावी, महाविद्यालयाचा लौकिक वाढावा हीच राजेभोंसले परिवाराची इच्छा होती. त्यांनी फक्त महाविद्यालये सुरु केली नाहीत तर आपल्या मुली याच संस्थेत शिकविल्या. मॅडमचे दीर आप्पासाहेब राजाज्ञे, बंधु विजयसिंह चौहाण, स्वत: मॅडम व मयूरा राजेभोंसले यांनी आपल्या परीने संस्थेची सेवा केली. ऋणानुबंधाच्या गाठी जपणारा हा परिवार. संस्था समर्पित या परिवाराच्या एक घटक मॅडम होय.

संस्कृतचा जाणता-जागता विश्वकोश-मॅडम-

संस्कृत अवघड भाषा पण समजावून सांगण्याची हातोटी मॅडमची होती. त्यांचा भाषेतील कोणताही शब्द, वाक्यप्रचार, म्हणी, एखादी अवघड संकल्पना, अलंकार, रस यांचा अभ्यास प्रचंड होता. मी ज्यावेळी एखादी भाषिक समस्या त्यांना विचारीत असे. त्यावेळी लगेच त्याचे उत्तर देऊन समाधान करणे हा त्यांचा स्वभाव होता. मी ज्येष्ठ आहे असा अहंभाव त्यांनी कधीच केला नाही. स्मित हास्य, निगर्वी व्यक्तिमत्त्व मधुर वाणीतून भाषिक समस्या सोडविणाऱ्या मॅडम. त्याच्या वाणीत सरस्वती वास करत असे, असे म्हटले तर आश्चर्य वाटू नये. संशोधनात सातत्य असावे, अभ्यासाची चिकाटी असावी हे आपल्या चरित्रातून सिद्ध करणाऱ्या मॅडम होत्या. आईची ममता देवून त्यांनी विद्यार्थी घडविले व आदर्श गुरु बनल्या. धार्मिक ग्रंथातील संदर्भांना आधुनिक जीवनाची जोड देवून भावार्थ-व्यंग्यार्थ, मतितार्थ सांगणाऱ्या मॅडम अशीच त्यांची ख्याती आज ही आहे हे वैशिष्ट्य होय.

संस्कृत अभ्यास मंडळ – शिवाजी विद्यापीठात योगदान-

मॅडमनी फक्त महाविद्यालय स्तरावरच काम केले असे नाही तर शिवाजी विद्यापीठ व अन्य विद्यापीठांत विविध समित्यांवर काम करून आपले स्थान निश्चित केले. संस्कृत अभ्यासमंडळ, संशोधन समिती,एम.फील.,पीएच.डी. मान्यता, विद्या परिषद, faculty सदस्य, पुस्तक-लेखन समिती, पेपर सेटिंग, परीक्षक नियुक्ती समिती विषयतज्ज्ञ, प्राध्यापक नियुक्ती समिती अशा अनेक विभागात कार्य केले. विद्यापीठ व महाविद्यालयातील संस्कृत विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सोप्या भाषेत संस्कृतची पाठ्यक्रम सम्बन्धी पुस्तके लिहिण्याचे कार्य सुद्धा केले. शेवट पर्यंत विद्यापीठाच्या सर्व समित्यांवर कार्यरत राहिलेल्या मॅडम होय. त्यांचे हे योगदान

अविस्मरणीय आहे. मला सुद्धा त्यांच्या बरोबर faculty सदस्य, विद्या परिषद सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

वात्सल्यमयी, कर्तव्यदक्ष कणखर आई-

आपल्याबरोबरच आपला परिवार, सुसंस्कारी, सुशिक्षित, चारित्र्यसंपन्न व्हावा हीच आईची इच्छा असते. मॅडम खऱ्या अर्थाने आदर्श आई ठरल्या. पतीचे अर्ध्या वाटेवरून जाण्याने खचलेल्या मॅडमनी आपले कर्तव्य जबाबदारीने पूर्ण केले. त्याचे उदाहरण म्हणजे आजचा राजेभोंसले परिवार. मुलांची आई, वडील, गुरु, मार्गदर्शक, पालक अशा भूमिका त्यांनी पार पाडल्या. आपल्या मुलांनी आपला वसा व वारसा पुढे चालवावा म्हणून मयूरास संस्कृत विषयात एम. फील. नेट पर्यंत शिक्षण दिले. त्यांनी संस्कृत अध्यापन-अध्ययन संशोधनाचा वसा, वारसा मयूराकडे सोपवला, तीनेही यथाशक्ती हा विडा उचलला.

मयूरा व तिची बहीण सासरी सुखात आहेत. चि. राजदीप आपल्या व्यवसायात कार्यमग्न आहे. सर्वांचा सुखी संसार व विवाह पाहण्याचे भाग्य मॅडमना लाभले. मराठीत म्हणतात **"घार उडे आकाशी नजर तिची पिलांपाशी"** त्यानुसार मॅडमचे लौकिक, नश्वर शरीर नष्ट झाले परंतु आईची कृपादृष्टी, शुभाशीर्वाद राजेभोंसले परिवारावर आहेच.

शासकीय पुरस्काराने सन्मानित मॅडम –

मॅडमनी आयुष्यभर संस्कृत भाषेची सेवा केली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र सरकारने 'महाकविकालिदास संस्कृतसाधना' हा सर्वोच्च संस्कृत भाषेतील पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. तसेच 'महाकविकालिदास संस्कृतसाधना' पुरस्कार निवड समितीवर त्यांची निवड/नियुक्ती झाली हा त्यांचा सन्मान होय. परंतु विनम्र होऊन हा सन्मान त्यांनी स्वीकारला हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होय. महाराष्ट्रात संस्कृत पाठशाला तपासणी करून त्या सुरु करण्यास मार्गदर्शन करून त्यांनी संस्कृत भाषेची महान सेवा केली.

विद्या विनयेन शोभते

मॅडम संस्कृतच्या अभ्यासक, संशोधक, मार्गदर्शक, अध्यापक, लेखक, चिंतक होत्या परंतु त्यांनी त्याचा कधीच दिंडोरा पिटला नाही. अहंभाव दाखवला नाही. नम्रता, विनय हा त्यांचा स्वभाव होता. ती त्यांची देहबोली होती. त्यामुळे संस्कृतच्या अध्यापिका सुसंस्कृत राहिल्या. आमच्या पुढे एक आदर्श बनल्या. त्यांच्या सहवासात शिकण्याचे मला भाग्य लाभले. एक ज्ञानाचा परीस स्पर्श अनुभवला.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्|
इन्द्रियार्थन्विमूढात्मा मिथ्याचार: स उच्चते ||

या उक्तीनुसार आपण केलेल्या कार्याचा, सेवेचा देखावा त्यांनी केला नाही. त्या प्रसिद्धीच्या मागे कधीच लागल्या नाहीत. संस्कृतची सेवा ज्ञानदानाचा वसा घेत आपले आयुष्य सफल केले.

कृतार्थ मी-परिपूर्ण मी –

मृत्यू अटळ सत्य, शाश्वत-सत्य, माणसाचे येणे-जाणे कोणाच्याही हातात नाही. परंतु प्राप्त आयुष्यात सत्कर्म कार्य करून जीवन कृतार्थ, परिपूर्ण करता येते. मॅडमचे जीवन असेच कृतार्थ जीवन होय.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन |
मा कर्म फलहेतुभूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि || गीता अध्याय-२

यानुसार मॅडम जीवन जगल्या. त्यांनी आदर्श जीवन मार्ग दाखविला. शब्द संपत्ती माझी तोकडी आहे. जे मी अनुभवले ते थोडेसेच सांगितले आहे.

शेवटी म्हणावेसे वाटते मॅडमचे व्यक्तिमत्त्व **'संथ वाहते कृष्णामाई'** ! असेच शांत, धीर-गंभीर, स्वच्छ राहिले.

त्यांच्या चरणी हीच भावांजली, विनम्र श्रद्धांजली !





ज्ञानज्योती : प्रा. डॉ. सुहासिनी राजेभोंसले राजाज्ञे

प्रा. डॉ. सुरेश गायकवाड
निवृत्त - प्राध्यापक, सातारा.

सातारच्या इतिहास प्रसिद्ध अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी राजवाडा व जलमंदिर यांच्या मधोमध काशी विश्वेश्वराच्या मंदिराजवळ पश्चिमाभिमुख असणारा एक टुमदार वाडा जाणा - येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतो. तो वाडा इतिहास प्रसिद्ध राजेभोंसले-राजाज्ञे यांचा वाडा. ५१ यादोगोपाळ, पेठ येथे असणारा पिंगळ्यांच्या वंशजांचा वाडा कालांतराने सातारा मराठा विद्याप्रसारक समाजाचे महाराणी जमनाबाई बोर्डिंग म्हणून नावारूपाला आला. त्या वाड्यापासून हाकेच्या अंतरावर हा राजाज्ञे वाडा. १९०७ साली कोल्हापूरचे राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या प्रेरणेने श्रीमंत रुद्राजी राजेमहाडिक (तारळेकर) रावबहादूर संभाजीराव दुदुस्कर व पुढे जाऊन सातारचे छत्रपती शाहू महाराज आणि त्याच परंपरेत यशवंतराव राजेभोंसले-राजाज्ञे यांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले. कोंडवे- शेंद्रे या गावीच्या इनामी जमिनी राजेभोंसले-राजाज्ञे घराण्याकडे वंशपरंपरेने चालत आलेल्या आहेत. या दोन्ही गावचे 'इनामदार' म्हणून त्यांना मानसन्मान आहे. गणेश चतुर्थीला कोंडव्याहून त्यांच्या वाड्यावर मानाचा गणपती पालखीतून वाजात-गाजत मिरवणुकीने येत असे. त्याच्या आगमनाचा थाट-माट सातारकरांना अभिमानाचा व आनंदाचा सोहळा वाटत असे. यशवंतराव राजेभोंसले यांचे ज्येष्ठ सुपुत्र शंकरराव राजेभोंसले उर्फ दादासाहेब पुढे जाऊन **सातारा मराठा विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष** झाले.

सन १९७२ साली सातारा मराठा विद्याप्रसारक समाजाने कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. प्राध्यापक म्हणून या महविद्यालयात मी १९७२ साली रुजू झालो. दरम्यान राजबिंडे व्यक्तिमत्त्व असणाऱ्या दादासाहेबांशी माझा परिचय झाला. यथावकाश १९७६-७७ च्या सुमारास स्नेहलता, पद्माराजे, राजू या त्यांच्या कन्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. स्नेहलता, पद्माराजे या हिंदी विषयाच्या विद्यार्थिनी. माझ्या विषयाच्या माझ्या विद्यार्थिनी. त्यामुळे प्रसंगोपात सणां-समारंभाच्या निमित्ताने माझे त्यांच्या घरी जाणे होत असे. दादासाहेबांचे आग्रहाचे निमंत्रण असायचे. (सरांनी आपल्या घरी यावे ही त्यावेळच्या विद्यार्थ्यांना मोठी अपूर्वाई वाटत असे.)



सन १९७७-७८ च्या दरम्यान दादासाहेबांच्या सर्वतोपरी सहकार्याने आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबीर, कोंडवे येथे घेण्याचे ठरले. सातारच्या पश्चिमेला ७/८ किलोमीटर अंतरावर लागणारा एक ओढा ओलांडल्यानंतर कोंडवे गावात प्रवेश होत असे. रस्त्याच्या उजव्या बाजूला ओढ्याकाठी एक तिच्या उजव्या बाजूला जवळ तोडीने (घडलेल्या दगडांची) बांधलेली सुंदर सुबक अशी एक विहीर होती. त्या विहिरीच्या चोहोबाजूंनी त्यांची विपुल काळीभोर शेती पसरलेली होती. रस्त्याच्या कडेला उजव्या बाजूला राजाझेंचा वाडा होता. येथे श्री स्वामी विवेकांनद शिक्षणसंस्थेचे हायस्कूल भरत असे. ह्या शाळेचा एक हॉल आमच्या महविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थी स्वयंसेवकांना राहण्यासाठी दिला होता. श्रमसंस्कार शिबिरामध्ये नियोजित कार्यक्रम उत्तमप्रकारे संपन्न झाले. या बरोबरच या दहा दिवसाच्या कालावधीत मी ५ विद्यार्थ्यांना पोहायला शिकवले. दादासाहेबांनी हे पहिले होते. या माझ्या वेगळ्या उपक्रमाचे त्यांना कौतुक वाटले. दहा दिवस त्यांच्या सहवासात गेल्याने माझ्या मनात त्यांच्या विषयी असणारा आदरभाव वृद्धिंगत झाला. जिव्हाळ्याचे, आपुलकीचे नाते दृढ झाले.

दादासाहेबांचे ज्येष्ठ पुत्र जयवंतराव उर्फ आप्पासाहेब श्री स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेच्या हायस्कूलवर शिक्षक होते. दोन नंबरचे चिरंजीव शहाजीराजे लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात शिक्षण घेत होते. येथेच वीणा चौहाण या विद्यार्थिनीशी त्यांचा परिचय झाला. पुढे त्यांचा थाटामाटात शुभविवाह झाला. सुहासिनीदेवी म्हणून राजाझेंच्या घरात लक्ष्मीच्या पावलांनी त्यांचे आगमन झाले. बुद्धीची देवता सरस्वतीची त्यांनी आराधना केली. घरंदाज वैभव संपन्न स्थितीत असूनही त्यांनी आपली शिक्षणाची आवड जोपासली. संस्कृत विषयात पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केले आणि लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात त्या संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका झाल्या. पुढे त्यांनी संस्कृत विषयात पीएच. डी. ही अत्युच्च पदवी प्राप्त केली. दादासाहेबांना आपल्या या सुतेविषयी खूप अभिमान वाटायचा. पीएच. डी. प्राप्त केल्याबद्दल समर्थ सदन सातारा येथे दै. लोकसत्ताचे तत्कालीन संपादक माधव गडकरी यांच्या हस्ते सर्व कुटुंबियांनी, आप्तेष्टांनी त्यांचा भव्य सत्कार समारंभ साजरा केला.

डॉ. सुहासिनींचा विद्यार्थी-प्रिय प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात लौकिक झाला. अभ्यासुवृत्ती त्यांनी सचोटीने जोपासली. यथावकाश त्यांच्या संसारवेलीवर सुंदर अशी तीन फुले उमलली. थोरल्या रेशमा, त्यांच्या पाठोपाठ मयूरा व राजदीप हे सर्वजण सुसंस्कारित व उच्च शिक्षित झाले. मयूरांनी संस्कृत विषयात पदवी परीक्षेत शिवाजी विद्यापीठाचे सुवर्णपदक प्राप्त केले. पदव्युत्तर शिक्षण घेऊन लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात संस्कृत विषयाच्या

प्राध्यापिका झाल्या. वक्तृत्व, विविध गुण दर्शन, सूत्रसंचालन यामध्ये त्यांनी विशेष नैपुण्य प्राप्त केले.

मध्येच एक दुर्दैवी घटना घडली. राजाज्ञे कुटुंबीयांवर काळाने घाला घातला. शहाजीराजेचे आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले. सुहासिनींच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. शहाजीराजांच्या निधनाचा दादासाहेबांना एवढा जोरदार धक्का बसला की ४-५ दिवसांच्या अंतराने त्यांचे दुःखद निधन झाले. राजाज्ञे परिवार दुःखाच्या तिमिरात बुडून गेला. व्यतीत होणाऱ्या काळाने हा तिमिर हळूहळू दूर केला. डॉ. सुहासिनी स्थिरप्रज्ञेने येणाऱ्या प्रसंगांना सामोरे गेल्या.

मनाचा ठाम निर्धार करून एके दिवशी आपल्या लेकरांना घेऊन त्यांनी राजाज्ञे वाड्यातून आपला मुक्काम हलवला. पितृतुल्य दादासाहेब व प्राणप्रिय सहचर यांच्या अनंत आठवणी या वाड्याच्या प्रत्येक जागी त्यांना व्याकुळ करत होत्या. हे सारे त्यांना असह्य वाटत होते. म्हणून तर त्यांनी हा निर्णय घेतला होता. या ऐतिहासिक वास्तूतून बाहेर पडणे किती कर्म कठीण होते. ही जाणीव सदोदित जागती ठेवतच त्यांनी आपले पाऊल पुढे टाकले. लोक काय म्हणतील ? हा विचार त्यांच्या ही मनात प्रकंपने उठवत होता. पण...जनापेक्षा त्यांनी आपल्या मनाचा कौल स्वीकारला.

वैभव, संपत्ती, नावलौकिक हे राजेभोंसले राजाज्ञे या नावासवे होतेच. परंतु ज्ञानाची शिदोरी, ज्ञानज्योती त्यांनी आपल्या या जीवन प्रवासात सोबत घेतली. वाटेत असणाऱ्या **तिमिराला ही ज्ञानज्योतीच** दूर सारणार होती हा त्यांचा दृढ विश्वास होता. **तमसो मा ज्योतिर्गमय**... हाच **आत्मविश्वास व आत्मबळ** त्यांच्या समवेत होते आणि एक **कणखर सुहासिनी** ताठ मानेने अदम्य विश्वासाने उभ्या राहिल्या, पुढे चालत राहिल्या.

'नारायणपूर' येथे होणाऱ्या 'नारायण महाराजांच्या' प्रवचनांची 'नारायणधारा' ही ग्रंथरूप रचना त्यांनी अथक परिश्रमाने सिद्ध केली. याचे काही भाग प्रकाशित झाले. अध्यात्म आणि परमार्थाच्या वाटेवर त्यांनी मनाचा प्रवास केला.

दरम्यानच्या काळात मनाची मंगलमयता व संवीरता असतानाही शरीरात मधुमेह रूपी व्याधीने चिंता व अनुवंशिकतेचे बोट धरून प्रवेश केला. आवरेना आवरिता असा हा मधुमेह दिवसेंदिवस बळावतच गेला त्याने दृष्टी हिरावून नेली. परंतु अंतःकरणातील दृष्टी सतेज ठेवली. प्रा.डॉ. सुहासिनी राजेभोंसले राजाज्ञे यांनी याही परिस्थितीत आपल्या जीवनाचा सकारात्मक प्रवास सुरु ठेवला. दोन कन्या व चिरंजीव राजदीप आपल्या संसारात सुखी आहेत. मॅडमनी हाती



घेतलेली ज्ञानज्योती पुढील पिढ्यांचे जीवन प्रकाशित करत आहे. हे त्यांनी घडवलेले संक्रमण खचितच अभिमानास्पद आहे.

आपले दुःख उगाळत न बसता पुढील पिढीच्या हाती त्यांनी जो कर्तृत्त्वाचा व आनंदाचा वसा आणि वारसा ज्या निष्ठेने सोपवला आहे त्या निष्ठेला माझा सलाम !!





डॉ. सुहासिनीदेवी राजाज्ञे-राजेभोंसले : एक कर्तबगार महिला

प्रा. डॉ. शैलजा माने
समाजशास्त्र विभाग-प्रमुख, सातारा.

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ||
शब्दचि आमुच्या जीवाचे जीव
शब्दे वाटूधन जनूलोकां ||
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव
शब्देचि गौरव पूजा करू ||

- संत तुकाराम

डॉ. सुहासिनीदेवी राजाज्ञे-राजेभोंसले या अभंगातील शब्दांच्या एक हाडाच्या शिक्षिका, संस्कृत भाषेच्या गाढा अभ्यासक, पंडित, चिंतन करणाऱ्या आणि खऱ्या अर्थाने संस्कृत भाषा समाजापर्यंत घेऊन जाणाऱ्या राजेभोंसले मॅडम.

राजेभोंसले मॅडम म्हणजे एक वादळ, संघर्षमय जीवन आणि या सगळ्या जीवनाला तोंड देत असताना एक शिक्षक म्हणून कुठेही कमी पडल्या नाहीत हे कौतुकास्पद आहे.

माझी आणि राजाज्ञे मॅडमची ओळख १९९१ पासूनची. या पूर्वीच्या प्रा. वीणा चौहाण. चौहाण कुटुंब तसे शांत, संयमी आणि सुस्वभावी. त्यांचे मोठे बंधू बी. एड. कॉलेजवर शिक्षक म्हणून कार्यरत होते. तेही अगदी मृदू भाषिक. बहिण-भावंडांचा स्वभाव सारखाच. हळवा, मनमिळावू, शांत व चेहऱ्यावर सतत स्मित हास्य असणारा.

डॉ. राजाज्ञे मॅडमचा विवाह सातारा येथील राजेभोंसले राजघराण्यात झाला. त्यांचे सासर सातारा येथेच असल्याने त्या शिकल्या तेथेच म्हणजे एल. बी. एस. कॉलेजला आणि शिक्षक म्हणूनही एल. बी. एस. ला च लागल्या. तेथेच सेवानिवृत्तीही झाल्या. त्यांच्या या जीवनाच्या प्रवासात त्यांनी अनेक चढ-उतार जगले. एक महिला म्हणूनच तर अडथळ्यांची शर्यत जिंकून त्या जगल्या. मॅडमचे पती अकाली गेले पण जाताना त्यांच्या पदरी तीन मुले अगदी लहान-लहान होती. त्यात

दोन मुली व एक मुलगा. संसाराचे एवढे बारदान सांभाळत असताना त्यांना त्यांच्या सासऱ्यांनी मोठे सहकार्य केले. त्यांना प्रोत्साहन, प्रेरणा दिली. त्यामुळेच तर त्या जीवन जगू शकल्या. शिकू लागल्या व शिकून शिक्षक झाल्या. हेच खरे त्यांचे आयुष्य, हाच संघर्ष आणि हेच वादळ. पण ते त्यांनी अमृत करून पिले आणि ज्ञानामृतमय विद्यार्थी घडविले. मुलांना शिकवून सुसंस्कृत बनविले. त्यांच्या दोन्ही कन्या त्यांच्याच विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थ्यांना उच्च पदस्थ बसविले. अनेक संस्कृतचे आदर्श अभ्यासक तयार केले.

एका विधवा महिलेला एकावेळी अनेक भूमिकेत लढावे लागते. त्यातून तरून जाणे व स्वत:ची विद्वत्ता जपणे हे सोपे काम नाही. घर, कुटुंब, नवऱ्याविना संसार, नोकरी, समाज यांचे पाहण्याचे, बोलण्याचे वेगवेगळे दृष्टिकोण हे एक महादिव्य असते. पण दिव्यातून स्वत:ला सावरून बाहेर येऊन तिन्ही मुलांचे संगोपन, संवर्धन, संस्कार, शिक्षण व विवाह या जबाबदाऱ्या उत्तमरित्या पार पाडल्या. यासाठी त्यांनी आत्मिक, अध्यात्मिक बळ मिळविण्यासाठी व स्वत:ची मन:शांती टिकविण्यासाठी नारायणपूरला दत्ताला जाऊन तेथील आरती, भजन, प्रवचन यातून मिळविले. लोकांचे प्रबोधनही केले आणि यातून होणाऱ्या टिकाटिप्पणीला तोंडही दिले पण स्वत: न डगमगता पहाडासारख्या उभ्या राहिल्या.

महाविद्यालयात ज्युनिअर, सिनिअर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषय शिकविला. संस्कृतचे बाळकडू विद्यार्थ्यांच्या गळी उतरविले. अनेक विद्यार्थ्यांना एम. फिल.,पीएच. डी. चे मार्गदर्शन केले. त्यातून अनेक विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक झाले. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मदत केली. शिवाजी विद्यापीठाच्या अनेक मंडळावर काम केले. पुस्तक लिखाण केले. त्यांच्या या कार्याचा गुणगौरव महाराष्ट्र शासनाचा 'महाकविकालिदाससंस्कृतसाधना' पुरस्कार, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार त्यांना प्राप्त झाले, हे त्यांच्या कार्याचे फलितच होय.

मुलांचे विवाह ठरविणे, ते यथोचितपणे पार पाडणे ही मोठी जबाबदारी त्यांनी पार पाडली. राजदीप हा त्यांचा लाडका मुलगा. त्याचे लग्न त्यांना पाहायला मिळाले पण सूनबाईंचा सहवास फार लाभू शकला नाही. पण तेथेही त्या आदर्श सासूबाई झाल्या. प्रेमळ आई ठरली. मयूराला तर त्या 'मयू' म्हणायच्या. मयूच्या लग्नाची त्यांना फार काळजी वाटायची. यासाठी की त्यांच्या डोळ्यासमोर तिचे लग्नं व्हावे. तिचा सुखी संसार त्यांना पाहायचा होता. पण देवाचे आभार मानावेत तेवढे थोडेच की, त्याने या तिनही मुलांचे विवाह त्यांच्यासमोर घडविले. अक्षता टाकल्या



आणि पोटभर जेवल्याचे समाधान मानून ढेकर देत या माऊलीने समाधानाने जीव सोडला. आजारपणाशी झुंज दिली. पण आजारापुढे हार मानली नाही. शेवटपर्यंत स्वाभिमानाने राहिल्या.

या माऊलीला त्रिवार प्रणाम !!!





संस्कृतभाषा व संस्कृतीचा जिवंत कोश: प्रा.डॉ. सुहासिनी राजेभोंसले

प्रा. शिवराम मेस्त्री
मानसशास्त्र विभाग-प्रमुख, सातारा.

मी कोल्हापूर जिल्हयातील इचलकरंजी या गावचा रहिवासी. श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेने माझी बदली दिनांक: १२.०८.२००५ रोजी लाल बहादर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स, सातारा याठिकाणी केली आणि मी साताऱ्यात आलो. येथे आल्यानंतर बऱ्याच नवीन प्राध्यापकांची ओळख झाली. त्यातील काही ओळखीचे रूपांतर घनिष्ठ नाते संबंधात निर्माण झाले. त्यातील सर्वात वरिष्ठ स्तरावर राहिल्या त्या म्हणजे आदरणीय प्रा. डॉ. सुहासिनी राजेभोंसले मॅडम.

मॅडमचे स्टाफरूमधील अस्तित्व तसे न जाणवणारे पण दुर्लक्षित न करण्याजोगे. कारण मॅडम तासाव्यतिरिक्त शांतपणे आपल्या खुर्चीवर बसून असत. फारशा काही बोलत नसत. फक्त न्याहाळत असत. नजरानजर झाली की, स्मितहास्य करीत. मात्र त्यांच्या चेहऱ्यावरील भाव अतिशय शांत असत. या अर्थी त्यांचे अस्तित्व न जाणवणारे. त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयावर मी चर्चा करीत असे. प्रत्येक विषयावर किंवा घटनेवर त्यांची मांडणी सखोल असे. त्यामागे तात्विक व शास्त्रीय बैठक दिसून येत असे. प्रत्येक गोष्टीमागचे तत्त्वज्ञान त्या उलगडून दाखवित असत. याअर्थी त्यांचे अस्तित्व दुर्लक्षित न करण्याजोगे.

मॅडमचा अध्यात्म, तत्त्वज्ञान व संस्कृत विषयांचा गाढा व्यासंग होता की ,जी क्षेत्रे आज दुर्लक्षित होत आहेत. पण आपली भारतीय संस्कृती खऱ्या अर्थाने समजावून घ्यायची असेल तर या विषयांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. मॅडमनी आयुष्यभर या क्षेत्रांचा सखोल अशा पद्धतीने मनापासून अभ्यास केला आहे. फक्त अभ्यासच केला नाही तर त्यातील ज्ञानाचा जीवनामध्ये वापर करून स्वतःचे व इतरांचे जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध केले आहे. कारण आज भौतिक साधनसामुग्री विपुल प्रमाणात असतानाही मानव सुखी, समाधानी व आनंदी जसा असावयास हवा तसा तो नाही. यावर मॅडमचे म्हणणे असे असायचे की, जीवनात सुखी, समाधानी व आनंदी असण्यासाठी अध्यात्मिक बैठक असणे गरजेचे आहे. यामुळे स्वत:चा सर्वांगिण विकास स्वत:च्या प्रयत्नाने निश्चितच व्यक्ती करेल. यातूनच समाज निकोप होईल. आयुष्यात गुरूंचे महत्त्व काय असते, ते मॅडम वेळोवेळी आम्हांस समजावून सांगत असत. गुरूमूळे जीवनाला दिशा मिळते, कल्याण होते. असा त्यांचा मानस होता.



अवघड विषयाचा गाढा अभ्यास मॅडमचा होता. तो विषय म्हणजे संस्कृत. भारतीय संस्कृतीची खरी ओळख संस्कृतच्या अभ्यासातून होते. या अर्थाने भारतीय संस्कृती इतरांना समजावून सांगणे, तिची ओळख करून देणे याद्वारे भारतीय संस्कृतीचे रक्षण आयुष्यभर मॅडमनी केले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

उलट त्यांच्या कार्याचा गौरवच एक प्रकारे होईल. मॅडम विद्यार्थ्यांशी फारच आपुलकीने वागत असत. अतिशय शांत आवाजात त्यांना समजावून सांगत असत. मॅडम विद्यार्थ्यांवर चिडलेल्या, रागावलेल्या मी पाहिलेले नाही. नेहमी विद्यार्थ्यांच्या हिताचाच त्या विचार करीत असत. जीवनाच्या शेवटपर्यंत-आजारी असतानाही, चालता येत नसतानाही तशाही अवस्थेत मॅडम शिकवण्यासाठी व पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांच्या मौखिक मुलाखतीस हजर राहिल्या. यावरून विद्यार्थ्यावरील व शिक्षणावरील त्यांचे प्रेम व तळमळ दिसून येते.

मॅडमच्या वैयक्तिक जीवनातील चढ-उतारानंतरही त्यांनी आपला आत्मविश्वास, स्व-नियंत्रण, निर्णयक्षमता, मुलांचे पालन-पोषण व त्याच्यांवरील संस्कार तितक्याच धीरोदात्तपणे केल्याचे दिसून येते. एक आदर्श आई म्हणून त्यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले हे त्यांच्या मुलांकडे पाहिल्यावर व मुलांचे आईशी जे वर्तन व्यवहार चालत असत त्यावरून दिसून येते. मॅडमचा स्वभाव फारच वेगळा होता. कोणाविषयी वाईट कधीही बोलत नसत, विचार करीत नसत. जीवनातील प्रत्येक घटनेकडे सकारात्मक पद्धतीने पाहत असत. शांतपणे त्या आपले जीवन व्यतित करीत असत. कधीही नाराजी, उदासीनता व नैराश्य जीवनामध्ये येऊ दिले नाही. अतिशय सुखी, समाधानी व आनंदी जीवन जगल्या व शांतपणे मृत्यूला सामोरे गेल्या. खऱ्या अर्थाने कृतार्थ जीवन जगल्या

अशा या कृतार्थ जीवनास, आदर्श गुरूस, आदर्श आईस व महत्त्वाचे म्हणजे भारतीय संस्कृती रक्षकास विनम्र श्रद्धांजली !!





अत्यंत अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या आक्कासाहेब- डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



श्री. मालोजीराव शिरोळे, पुणे.

'आक्कासाहेब 'एक सुशील विद्वान असे व्यक्तिमत्त्व! मराठा समाजातील सुविद्य असे बाणेदार व्यक्तिमत्त्व ! आक्कासाहेब म्हणजे प्रा. डॉ. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले- राजाज्ञे.

संस्कृत आणि इतिहासातील त्यांचे मोलाचे असे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी लिहिलेला' प्रबंध' होय. 'राजा शिवछत्रपतींवरील' त्यांनी केलेले संशोधन होय. त्यांनी संशोधनासाठी घेतलेला हा विषय अत्यंत नावीन्यपूर्ण होता. 'महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज' आणि तेही 'देववाणी संस्कृत' काव्यात दिसणारे त्यांचे पावन चरित्र हे अत्युच्च आणि अभिमानास्पद आहे. हा संगम म्हणजे पवित्र नदीतीर्थांचा होय. ज्या घराण्याचा त्यांना वारसा मिळाला त्या घराण्याला साजेसे असे लेखन-कर्तुत्त्व आक्कासाहेबांच्या हातून घडले. हा 'शिवप्रभूंचाच आशीर्वाद 'त्यांना लाभला. ज्यामुळे त्यांच्या हातून ही सेवा झाली. हा विषय प्रथमच संशोधनासाठी घेण्याचा" बहुमान" त्यांना लाभला. संस्कृतमध्ये असे संशोधन कोणी यापूर्वी केले नाही आणि शिवछत्रपतींवर या पद्धतीने संशोधन झाले नाही. आम्हां सर्व परिवाराला त्यांचा फार अभिमान वाटतो.

शहाजीराजें, ज्यांना आम्ही 'संभाजीराजेही' म्हणत होतो. आमचे नात्याने मामे-मेहुणे लागत होते. त्यामुळे आक्कासाहेब म्हणजे आमच्या भगिनी समान होय. आम्ही नात्यांने आत्ये-जावई लागतो. श्री. शहाजीराजेंशी (भाऊसाहेब)आमचे जवळचे प्रेमाचे संबंध होते. ते खूप धाडसी, मिश्किल स्वभावाचे होते. जावयांशी फार थट्टा-मस्करी करणे, हसून-खेळून राहणे..असे मित्रांसारखे वागत. बहिणीसाठी जीव ओवाळून टाकत. माँसाहेबांचे (आमच्या मामीसाहेब) लाडके होते. आबासाहेबांसाठी(मामासाहेब)अभिमान, गर्व होते. पण दुर्दैवाने लवकर गेले. आज हे मांडत असताना त्यांची ही खूप आठवण झाली. आक्कासाहेबांच्यावर तर फार मोठा आघात झाला. शिवाय त्या धक्क्याने (सासरे-आबासाहेब) मामासाहेब भाऊसाहेबांच्या ६/७ व्या दिवशी गेले. आक्कासाहेबांच्यावर तर आभाळच कोसळले. त्यां दोघांचे आक्कासाहेबांच्यावर फार प्रेम होते. ते आपल्या सूनेस मुलगीच मानत. तसेच प्रेम त्यांच्या प्रति होते. फार मोठा आधार होता त्यांचा आक्कासाहेबांना ! संपूर्ण कुटुंबियांसाठी कठिण परिस्थिती होती. पण यातूनही



आक्कासाहेब धीराने उभा राहिल्या. त्या फार धीराच्या होत्या. कोणीही पाठिशी नसताना एकट्याने शून्यातून विश्‍व निर्माण केले. आपणही पुढे गेल्या. मुलांनाही छान घडविले आणि घराण्याचाही 'नावलौकिक 'वाढविला. आपल्या घराण्याचे नाव रोशन केले, उज्ज्वल केले. एकट्या मराठा-क्षत्रिय स्त्रीने केलेले हे कार्य-कर्तुत्त्व पुढील अनेक पिढ्यांसाठी आदर्श आहे.

आमची ज्यावेळेस भेट होतं अत्यंत आदराने, आपुलकीने संवाद होतं असत. त्यांनी केलेल्या शिवप्रभूंच्या संशोधनावर - इतिहासावर चर्चा होत. राजदीपराजेंही भेटतात त्यांना पाहून कै. शहाजीराजेंची आठवण होते . तसेच राजबिंडे आहेत आणि आक्कासाहेबांचे संस्कारही त्यांच्या वागण्या- बोलण्यात दिसतात. तोच शांतपणा, सौम्यता आणि धैर्य त्यांच्या ठिकाणी दिसते. दानींच्या सून म्हणजे थोरल्या कन्या रेशमा यांच्यात सोशिकता, आपुलकी दिसते. मयूरांच्या ठिकाणी तीच बुद्धीची चमक दिसते. हे आक्कासाहेबांचेच संस्कार आहेत.

आक्कासाहेबांचे संशोधन जगासमोर यावे ही आमची मनोमन इच्छा आहे. ते फार महत्त्वाचे आहे. खरतरं त्या फार लवकर गेल्या. ही अत्यंत दुःखद घटना घडली. मात्र त्या आयुष्यभर लढतच राहिल्या. 'लढाई ही वारशानेच' आली असे म्हटले तरी चालेल.

आक्कासाहेब 'लढवय्या' होत्या. आक्कासाहेब अत्यंत सोशिक होत्या पण दुबळ्या कधीच नव्हत्या. त्यांचा आम्हांला सर्वांना अभिमान वाटतो. "आई जगदंबेप्रमाणे " त्या मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या. आताही सदैव त्यांचा आशीर्वाद राहणार यात शंकाच नाही. ज्यांच्यावर आईंचा आशीर्वाद त्यांचे नेहमी चांगलेच होईल.

आक्कासाहेबांच्या पवित्र आत्म्यांस चिरशांती लाभो, ही ईश्‍वर चरणी प्रार्थना !

आईभवानी मुलांच्या पाठीशी उभी राहो !



वहिनीसाहेब - एक वीरांगणा

सौ.पद्मजा प्रशांत ढमाले-देशमुख

निवृत्त-मुख्याध्यापिका, शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे.



संथ वाहते कृष्णामाई
तीरावरल्या सुखदुः खांची
जाणीव तिजला नाही....

आमची ही कृष्णामाई, जीवनाकडे अत्यंत शांतपणे संथपणे पाहत होती. येणा-या वादळापासून अनभिज्ञ होती. एखाद्या चित्रपटला शोभेल अशीच प्रेम कहाणी होती शहाजीराजे आणि वीणादेवी यांची !! शहाजीराजे यांचे पिताश्री म्हणजे शंकरराव उर्फ दादासाहेब राजेभोंसले राजाज्ञे राजकीय क्षेत्रातील नावाजलेले, सामाजिक क्षेत्रात सुधारणावादी असलेले ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व ! दमदारपणे संपूर्ण सातारा शहराचे नेतृत्व करत होते. सातारा जिल्हयाचे होम-गार्ड होते. वीणांचे कुंभारगावच्या चौहाणांचे घराणे. त्यांचे वडिलही नावाजलेले तडफदार व्यक्तिमत्त्व ! डफळे सरकारांशी संबंधित होते. अशी ही दोन तुल्यबळ घरंदाज माणसं ! आणि यांचा तो बाणेदारपणा सगळे कसे आगळे-वेगळेच होते.

शहाजीराजे चित्रपटातील एखाद्या नायकासारखे रुबाबदार, धाडसी, देखणे, बाणेदार ! आणि वीणादेवी अशी एक मुलगी उंचीने छोटीशी पण चालण्यात चटपटीत, चाफे -कळी नाक, सुहास्यवदना, दिसण्यात सायराबानू सारखी ! या सौंदर्याने मोहित झालेले आमचे बंधू, हे आमच्या लक्षात आले. असे स्वप्नातील राजकथेसारखे यांचे छान-छान दिवस चालले होते. (पण हे गुलाबी दिवस फारच कमी काळापुरते त्यांच्या वाट्याला आले.) अर्थातच हे दोन्ही परिवारांना समजले. दोन्ही परिवारांनी मान्यता दिली. यथावकाश लग्न पार पडले आणि वीणादेवी या सौ. सुहासिनीदेवी राजेभोंसले-राजाज्ञे झाल्या. घरातील कर्ती सून म्हणून या सुहास्यवदना लक्ष्मीने माप ओलांडले. चेह-यावर कायम आनंद आणि समाधान यांचेच मिलन पाहावयास मिळाले. एक सकारात्मकता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

वहिनीसाहेबांच्या ठिकाणी सरस्वती आणि लक्ष्मी या दोघींचे वास्तव्य एकाच ठिकाणी वसलेले होते. वहिनीसाहेबांची बुद्धी म्हणजे प्रत्यक्ष जिजाऊ आईसाहेबांबरोबर यांच्या बुद्धीचे नाते जोडू शकू. इतके तेज होते. सासू - सासरे, पती आणि पूर्ण परिवार यांच्या सहकार्याने यांच्या वैवाहिक जीवनाबरोबर शैक्षणिक जीवनाची वाटचाल खूप चांगली सुरु झाली. बी. एड. करताना



पाठ नीट लिहिणे, टिटोरियलस लिहिणे, नोट्स लिहून काढणे ह्या कामात स्वतः सासरे (दादासाहेब) मदत करत असत. तेव्हा त्या अवघडलेल्या अवस्थेत होत्या, मोठ्या कन्येचा जन्म झाला होता. सगळी सुख हाथ जोडून उभी होती. सकाळी कॉलेजमुळे मुलांची जबाबदारी मोठ्या जाऊबाईंवर पडत असे. त्या पण आपल्या परिने या यज्ञकुंडात आपले योगदान देत होत्या.

कॉलेजवरुन आल्या की, सौ. सुहासिनी सर्व जबाबदारी घेण्यास सुहास्य वदनाने पुढे होत. दोघींनी एकमेकींबरोबर बहिणींचे नाते जपले होते. माझे मोठे बंधू श्री. जयवंतराव उर्फ आप्पासाहेब हेही यांना **जिजाऊ** म्हणत असत. "खरंच राजमाता जिजाऊंना जसे हिंदवी स्वराज्य स्थापन करताना कष्ट झाले असतील तेवढेच कष्ट या जिजाऊंना पण झाले होते." सासर- माहेर सांभाळताना तारेवरची कसरत होतीच. पण या सरस्वतीने स्वतः च्या नावाप्रमाणे शिक्षणाची वीणा हातात घेतली होती. कॉलेज-नोकरी चालू होते. छोट्या- छोटया चिमुकल्या दोन मुली अंगणी चिवचिवत होत्या.

थोरल्या आनंदीबाई-रेशमा (दादासाहेबांची धारणा होती की, यांच्या आईसाहेबांचा या नातीच्या रुपाने पुनर्जन्मच झाला. त्यामुळे ते तळहाताच्या फोडापेक्षाही जास्त या छोट्या आनंदुला जपत असत.) हया आबांच्या लाडक्या तर मयूरा पप्पांच्या लाडक्या! घरात नोकरी रुपाने लक्ष्मी पाणी भरत होती. पण आतील सरस्वतीचा कोंडमारा चालला होता. ती बाहेर येण्यासाठी धडपडत होती. हळूहळू पीएच.डी.चा मार्ग मोकळा झाला. अभ्यासाला सुरूवात झाली. सरस्वतीदेवी आनंदून गेली. सर्व घरदार सहकार्यासाठी उभे राहिले. अभ्यासासाठी खूपच कष्ट घावे लागत होते. त्यातच धाकटया राजदिपराजेंचा जन्म झाला होता. सर्वजण आनंदात होते. संशोधनासाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर, तंजावर अशा गावांना जाऊन ग्रंथालयात १०/१० तास बसून नोट्स काढाव्या लागत होत्या. मुलांचे संगोपन, पीएच. डी. चा अभ्यास, १०/१५ माणसांचे एकत्र घरंदाज कुटुंब त्यात अनेक रितीभाती सांभाळणे या काही साध्या-सुध्या गोष्टी नव्हत्या. प्रापंचिक अडचणी चालू होत्याच. कामाचा रामरगाडा खूप असायचा. पण यांच्या चेह-यावर ना दुःख ना त्रासाचा लवलेश ना तक्रार !! मात्र या आमच्या **"मूर्ती लहान पण कीर्ती महान"** अशा वहिनीसाहेब सगळ्यांना टकरा देऊन हिमालयाएवढे कार्य करुन किर्तीच्या शिखरावर चढून गेल्या हो ! यांचा विषयच तसा होता. **"छत्रपती शिवाजी महाराजांचे संस्कृत साहित्यातील चरित्र",** संस्कृतमधून अभ्यास करुन सांगायचे. अहो ! विषय ऐकूनच लोकांचा आ-वासलेला तसाच राहत असे. म्हणजे हे आकाशास गवसणी घालणारेच कर्तृत्त्व नव्हते का? यासाठी यांना वारंवार जर्मनीवरून बोलावले जात होते.

सुहासिनींचे, माझ्या वहिनीसाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे स्वयंभू होते. कुणाची माता, कुणाची पत्नी, कुणाची भावजय तर कुणाची सून म्हणून ओळखावे इतके ते सीमित नव्हते. गुरु, मार्गदर्शक,



सल्लागार, सहकारी आणि प्रत्येक गोष्टींची जबाबदारी पेलणा-या व्यक्ती असे होते. माझ्या वहिनीसाहेबांचा समावेश उदार विचारकांमध्ये करावयास हवा. या शूर, कर्तृत्ववान आणि उत्तम प्रशासक होत्या. स्त्रीची प्रतिष्ठा यांनी स्वतःच्या कृतीने आणि शिकवणुकीने वाढविली हे निःसंशय!

नियतीने मात्र त्यांच्यावर सूड उगवला होता. यांना पूर्ण पाठिंबा देणारे यांचे पती शहाजीराजे व सासरे दादासाहेब पीएच. डी. चा प्रबंध पूर्ण झालेला पाहण्याचा आनंद न घेता १५ दिवसाच्या अंतराने यांना एकटिला सोडून गेले होते. जणू हा ग्रंथ पूर्ण करणे हाच या पृथ्वीवरचा यांच्या कामाचा ध्यास होता. २ मुली आणि १ मुलगा यांची पूर्ण जबाबदारी यांच्यावर आली होती . ही आमची **'वीरांगणा 'न-डगमगता** पुन्हा उभी राहिली. जेव्हा प्रबंध पूर्ण झाला दादासाहेबांनी हातात घेतला. तेव्हा त्यांच्या डोळ्यातून आनंदाने अश्रू आले. त्यांना धन्य झाल्यासारखे वाटले. वीणांची पाठ थोपटली. घराण्याचा नावलौकिक वाढविलात, अशा शब्दांत कौतुक केले. (ते वीणाच म्हणत असत आपल्या मुलींप्रमाणे) भाऊसाहेब (शहाजीराजे) स्वतः वहिनीसाहेबांबरोबर शिवाजी विद्यापीठात प्रबंध सादर करायला गेले होते. तेच शेवटचे ठरले.....

वयाच्या साठीपर्यंत आयुष्याची सर्व कामे पार पाडत असताना शरीर व मन मात्र थकले होते. अजूनही जर्मनीचे standing invitation होतेच. पण आता या माऊलीला मात्र वेध सरस्वती - पूजनाच्या पूर्ततेचे लागले होते. मनाने या कधीच पतीजवळ जाऊन पोहोचल्या होत्या.

मी यांची धाकटी ननंद म्हणायला पण आमचे नाते कायम बहिणींचे राहिले. शेवटच्या दिवसांत मी यांच्याजवळ होते. पण माझ्याकडून सेवा करुन घेणे हे यांना खूपच त्रासदायक व्हायचे. त्या म्हणत " दिवाणसाहेब, नका हो करु तुम्ही हे काम, मी तुम्हांला फार त्रास देते आहे ना हो !" मी त्यांची समजूत काढत, "आपल्या माणसाचा कसला आला आहे त्रास. आम्ही तुम्हांला या घरात लग्न करुन घेऊन आलो तर तुम्हाला शेवटपर्यंत साथ देणे हे माझे कर्तव्यच आहे ना ! "

भव्य स्वप्न पाहण्याची ताकद यांच्यात होती. यांचे हे स्वप्न आमच्या राजेभोंसले कुटूंबाला वेड लावणारेच होते. देहभान विसरुन, जीव ओवाळून टाकायला तयार व्हावं, अशी प्रेरणा देणारे उच्च असे ध्येयस्थान होते. या स्वप्नात दादासाहेबांनी मालोजीराजांसारखे आपले नेतृत्व करत सर्व कुटुंबियांना पण खंबीरपणे यांच्यामागे उभे केले. यांनी स्वप्न आपलेच मानून कल्पवृक्षासारखी सावली पांघरली आणि सर्व परिवाराला आपल्या छायेत बरोबर घेतले.अशी ही आमची ध्येयवेडी कृष्णामाई सर्वांच्या इच्छा पूर्ण करत लहान वयातच अनंतात विलीन झाली.

आमचे “शहाजीराजे व यांच्या जिजाऊसाहेब यांना शतशः प्रणाम “.... !!!*



विनम्र आदरणीय व्यक्तिमत्त्व - डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम

सौ. मंदाकिनी चौकवाले-भोरे
निवृत्त प्राध्यापिका (संस्कृत),
कनिष्ठ विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा.



दिव्यत्त्वाची जेथ प्रचिती।
तेथे कर माझे जुळती।।

या उक्तिला अनुरूप असे व्यक्तिमत्त्व म्हणजे आमच्या राजेभोंसले मॅडम होय. माझी त्यांची भेट साधारणपणे १९८० ला झाली. तेव्हापासूनच माझा त्यांच्याशी परिचय होता. मी एम. ए. ला शिवाजी कॉलेजला असताना मॅडम आम्हांला शिकवायला 'गेस्ट लेक्चरर' म्हणून येत असत. अत्यंत सुस्वभावी, हुशार अशा त्या मला प्रथम भेटीतच भावल्या. त्यांचे शिकवणे, भाषेवरची पकड आणि भाषेचे ज्ञान हे अफाट होते. मॅडम खूपच सुंदर शिकवायच्या आणि सुंदरही दिसायच्या. त्यांचा तो डोक्यावरचा पदर फार शोभून दिसायचा. त्यांची वाणी फार असख्लित होती. विद्यार्थ्यांशी फार आपुलकीने, आस्थेने आणि प्रेमाने वागायच्या. त्यांचे विषयाचे ज्ञान अगाध होते. त्यांच्या " व्यक्तिमत्त्वाची दिव्य'' अशी आभा होती. त्या प्रेममयी मूर्ती वाटायच्या. त्या एक आदर्श - शिक्षिका होत्या.

पुढे मी एम. फिल. करत असताना त्यांनी मला बी. एड. करण्याचा सल्ला दिला. 'ते प्रथम करा,' असे त्यांनी कळकळीने सांगितले आणि मीही तसेच केले. हा सल्ला माझ्यासाठी फार मोलाचा असा महत्त्वपूर्ण ठरला. कारण १९९१ला मी लगेचच लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात कनिष्ठ विभागात प्राध्यापिका म्हणून रुजू झाले. हे माझ्या आयुष्यात फार महत्त्वाचे ठरले. हा त्यांचा योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करणे गुणविशेष होता. याची मला अनेकदा प्रचिती आली. त्या वरिष्ठ विभागात कार्यरत होत्या. मला वेळोवेळी त्यांचे मार्गदर्शन लाभत असत. अगदी मला त्या माझ्या थोरल्या भगिनी समान वाटत होत्या. त्यांचा नेहमी कठिण प्रसंगी आणि वैयक्तिक आयुष्यातही आधार वाटायचा. त्या गेल्या तेव्हा माझ्या मनाला खूप वेदना झाल्या. माझी भगिनी सोडून गेल्या सारखे वाटले. माझी थोरली बहिणच गेल्यासारखे वाटले.

डॉ. राजेभोंसले मॅडम स्वभावाने अतिशय विनयशील होत्या. विनम्र स्वभावाच्या होत्या. **"विद्या विनयेन शोभते।"** हे त्यांच्या बाबतीत सत्य होते. इतरांना मदत करणे, आस्थेने चौकशी करणे हा त्यांच्यावरचा संस्कारच होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू होता. माझी-त्यांची अनेक

विषयांवर चर्चा होत. त्यांच्या कडून अनेक नवनवीन घडामोडींची, विषयांची माहिती मिळत. त्यांचे वाचन अफाट होते. हवे ते संदर्भ सहजतेने योग्यवेळी त्यांच्याकडून उपलब्ध होत असत. एकमेकांच्या सुख-दुःखांची देवाण-घेवाण होत. त्यांच्याशी बोलताना कधी दडपण येत नसत. आपलेपणा वाटत असत. जणू आपल्या मैत्रीणीशी, जवळच्या व्यक्तीशी मनमोकळ्या गप्पा मारतो असे वाटायचे.

आम्ही एकाच ठिकाणी काम करत होतो आणि 'चांगल्या माणसांना 'त्रास हा होतच असतो. आजूबाजूच्या लोकांचे राजकारण हे तर सर्वत्रच चालते. पण आमचे संबंध कधीच बिघडले नाहीत. कारण मॅडम कधीचा कुणाच्या कुठल्याच राजकारणात पडल्या नाहीत. भाग झाल्या नाहीत. त्यांना सर्व माहित असायचे पण कधीच त्या कोणाबद्दल वाईट बोलत नसत. इकडचे-तिकडे करणे हे त्या आवर्जून टाळत. हे त्यांना अजिबात आवडत नसत**. 'विद्या अविवादाय केवल ज्ञानाय** हे त्यांचे व्रतच होते असे म्हटले तरी चालेल. खूप वर्षांचा आमचा सहवास होता. त्यात मी कधीच त्यांना रागावलेले पाहिले नाही. नेहमी हसतमुख असायच्या. प्रसन्न असायच्या. त्यांचे आयुष्य दुःखाने पोळलेले होते पण चेहऱ्यावर मात्र 'पवित्रतेचे तेजच 'होते. 'आनंदाचे झाड' होत्या असे म्हटले तरी चालेल. मॅडमनी अत्यंत जिद्दिने आणि आपल्या विद्वतेने मान-सन्मान मिळवला. नावलौकिक मिळवला.

***मरावे परि कीर्तीरुपी उरावे*..**

हे त्यांच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते. मॅडमचे अत्यंत सुस्वभावी, शालीन आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व होते. सर्वांशी अत्यंत आपुलकीने, प्रेमाने बोलायच्या. कनिष्ठ-वरिष्ठ ,उच्च-नीच असा भेदभाव त्या कधीच करत नसत. त्या एक 'सकारात्मक ऊर्जेचा स्रोत' होत्या. सगळ्याशी मिळून-मिसळून राहायच्या. त्यांची खूप साधी राहणी होती पण उच्च विचारसरणी होती. त्यांचे बोलणे लाघवी होते.

सभेत बोलताना त्यांच्या बोलण्याने मंत्रमुग्ध झाल्यासारखे वाटत असत. 'देवीशारदेचा आशीर्वाद' त्यांच्यावर होता. 'जिह्वेवर सरस्वती' नांदत होती. त्यांनी अपार कष्ट केले. अत्यंत आत्मियतेने विद्यार्थ्यांना घडविले. त्यांच्या मुलांना सक्षम केले. संस्कारित केले. त्यांच्या तब्येतीने थोडी साथ दिली असती तर आणखी काम त्यांनी केले असते. पण तरीसुद्धा त्या मनापासून काम करायच्या. आई जाण्याचे एवढे मोठे दुःख मुलांच्यावर कोसळले. पण मुलं फार धीराची आहेत. मला मॅडम विषयी पराकोटिचा आदर वाटतो. त्यांची सतत आठवण येते. त्या नेहमी 'संस्कृत'च्या प्रचार आणि प्रसारासाठी प्रोत्साहन द्यायच्या. 'शासनाच्या समितीवर अशासकीय सदस्य' म्हणून



नियुक्त असल्यामुळे वेगवेगळ्या संस्कृत पाठशाळांना भेट द्यायच्या. तेथील अनुभव, कार्य पद्धती सांगायच्या.

आज-काल अशी माणसं कमी होत चालली की, ज्यांच्या विषयी आदर वाटतो किंबहुना असे चरणच कुठेत ज्यांच्यावर नतमस्तक व्हावे. पण मॅडमकडे एक दिव्यत्त्व होते. सत्व होते. ज्याबद्दल प्रचंड आदरभाव वाटतो. त्यांच्या विषयी सांगावे तेवढे थोडेच आहे.

अपार त्यांची थोरवी.. असेच म्हणून त्यांना नमन करते !
परमेश्वर त्यांच्या आत्म्यांस शांती देवो !





माझी आक्का



सौ. हिमगौरी संजीव कदम
एम. ए. सातारा

श्रीमती सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले (राजाज्ञे) पूर्वाश्रमीची म्हणजे माहेरची कु. मेहेरवीणा विष्णूपंत चौहाण उर्फ आम्हां सर्वांची लाडकी आक्का !

आज तिच्याविषयी लिहिताना खरेतरं डोळे पाणावले आहेत. तिच्या अनेक आठवणींनी मन भरुन गेले आहे. पण तरीही शब्दसुमनांजलीने मी तिला वंदन करत आहे. यापुढील या माझ्या लेखात तिचा उल्लेख “ति. आक्का"असा येऊ शकतो. कारण 'आक्का' या तिच्या नावातच तिचे व आमचे नाते खूप घट्टपणे जोडले गेले आहे. आक्का हे नाव उच्चारताच डोळ्यांसमोर तिची डोक्यावर पदर घेतलेली प्रेमळ स्वरूपाची मूर्ती उभी राहते आणि आठवणींचा हिंदोळा झुलू लागतो. आज मी तिच्या माहेरची प्रतिनिधी म्हणून तिच्या आठवणींना उजाळा देत आहे.

ति.आक्का आम्हां तीन भावंडांची मोठी आत्या. वडिलांनंतर तिने माझ्या साऱ्या परिवाराला खूप धीर दिला. 'मेहेरवीणा' हे नाव तिला तिच्या जन्मानंतर संत श्री मेहरबाबांनी दिले. त्यांचा आशीर्वाद घेत ती मेहेरबाबांच्याच अंगा- खांदयावर खेळत मोठी झाली आणि तिच्यातील आध्यात्मिक साधनेचे बीज तिथेच पेरले गेले असावे. कारण बालपणी अनेक सत्पुरुषांचा सहवास, आशीर्वाद, स्नेह तिला मिळाला. पाचलेगावकर महाराज, गुळवणी महाराज आदी आध्यात्मिक मार्गातील संत त्यावेळी घरात येत असत. त्यांच्या सहवासाने, आशीर्वादाने बालपणापासूनच तिला परमार्थ मार्गाची गोडी लागली होती.

माझे वडील म्हणजेच ति. सुहासिनीदेवींचे वडील भाऊ श्री. विजय विष्णू चौहाण. या दोघांचे नाते भाऊ-बहिणींचे होते. पण माझ्या लहानपणापासून मी या दोघांच्या नात्यातील अनेक वेगवेगळी रुपे पाहिली आहेत. ते दोघेही एकमेंकाचा अतिशय आदर करत. दोघेही एकाच शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांचे तात्विक मतभेद पण होत पण त्यात कुठेही अतिशयोक्ती नसायची. त्या दोघांमध्ये आध्याात्मिक संवादाची देवाण-घेवाण चालू असायची. दोघांच्या स्वभावातही खूप सारखेपणा होता. भाऊ-बहीण या नात्यापलीकडे त्यांच्यात वडील-मुलगी, गुरू-शिष्य यासारखे नाते जाणवायचे. वडील भाऊ आक्कासाठी सर्व काही होते. ती त्यांचा फार आदर करायची. तिच्यासाठी ते गॉडफादर, फिलॉसॉफर, धीर देणारे वडीलभाऊ, प्रेरणा देणारे शिक्षक



असे सर्व काही होते. ती त्यांना 'आबा' या नावाने संबोधत असे. त्या दोघांचे नाते इतके दृढ होते की, दोघांच्या जन्मामध्ये १३ वर्षाचे अंतर होते. आबा तिच्यापेक्षा १३ वर्षाने मोठे होते आणि दैवाचा विलक्षण योगायोगच असावा तिचे आबा म्हणजेच माझे वडिलांच्या मृत्यूनंतर बरोबर १३ वर्षानेच तीही त्याच्या पाठोपाठ निघून गेली. मृत्यूसमयीचे दोघांचे वय सारखेच होते. हा काय योग होता हे आमच्यासाठी अनाकलनीय होते.

आक्कांच्या स्वभावाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ती कमालीची सोशिक व शांत स्वभावांची होती. हे गुण तिला तिच्या आईकडून म्हणजे सौ. चतुराबाई यांच्याकडून व वडील भावांकडून मिळाले असावेत. जीवनात आलेल्या विपरीत व प्रतिकूल परिस्थितीत आक्का कमालीची स्थितप्रज्ञ व शांत स्थितीत तो प्रसंग निभावून न्यायची. एकदा तिला मी तिच्या या गुणांविषयी विचारले तेव्हा तिने खूप सोप्या भाषेत यावर मला समजावले होते. **"भोगणे ते फल संचिताचे | "**¸असे तुकाराम महाराजांनी सांगितले आहे. सुख हे कर्माचे फल आहे आणि दु:ख हे ही कर्माचेच फल आहे. पूर्वीची सर्व कर्मे वाईटच असतील हे कशावरुन ? काही चांगली कर्मे ही आपल्या संचितात असतात. त्यामुळे विपरीतस्थितीत मनाला विचारांनी सावरावे**." एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा | हरीकृपे त्याचा नाश आहे|| "**या ओवीप्रमाणे परमेश्वरावर विश्वास ठेवून आलेल्या प्रत्येक परिस्थितीला शांत मनाने सामोरे जावे. असे तिचे म्हणणे असे.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत तिने स्वत:चे शिक्षण, पीएच. डी. चा अभ्यास केला. बरोबर वैवाहिक आयुष्यातील कर्तव्ये, तीन लहान मुलांचे संगोपन करत स्वत:चा प्रपंच पूर्णत्वाला नेला. लग्न झाल्यावर ती सासरी राजघराण्यातील कुटूंबाशी जोडली गेली. तेव्हा बावरून न जाता तिने तेथील कुटुंबातील चालीरिती, संस्कृती, परंपरा या सर्व गोष्टींना आपुलकीने स्वीकारले व सर्व कुटुंबाला आपलेसे केले. अकालीच पतीची साथ सुटल्यावरही डगमगून न जाता सासर व माहेरच्या माणसांना बरोबर घेऊन तिने स्वत:ला जीवनाच्या अनेक टप्पावर सिद्ध केले.

मुलांचे शिक्षण, स्वत:ची नोकरी हे सर्व एकटीने निभावताना तिची किती तारांबळ उडायची हे मी पाहिले आहे. एकटीने हे सारे निभावून नेणे हे सोपे नव्हते. पण त्याचा परिणाम तिने स्वत:च्या प्रपंचावर, कर्तव्यावर होऊ दिला नाही. एखाद्या रणरागिणीसारखी ती सर्व पातळीवर लढत उभी राहीली. स्वत: ला यात आत्मनिर्भर ठेवण्यासाठी व निडर ताठ मानेने उभे राहण्यासाठी प्रपंच्याच्या धबडग्यात कर्तव्य करत करत तीने स्वत:ची अध्यात्म साधना सुरू ठेवली होती. ही साधना तिच्यासाठी मनोबल होती. त्यावेळी रात्र व दिवस तिच्यासाठी जणू एकच होता. अहोरात्र ती व्यस्त असायची. दिवसा कर्तव्य पार पाडायचे व रात्री ती स्वत:ला या परमार्थ साधनेतून स्वत:ला मनोधैर्य मिळवायची. बाहेरच्या जगात कोणीच पाठीराखा नसताना केवळ



स्वत:च्या आत्मविश्वास आणि साधनेतून मिळविलेल्या मनोबलाच्या आधारावर तिने तिची जीवनाविषयीची व अध्यात्माविषयीची तत्वनिष्ठा अभंग ठेवली होती. याच काळात पुण्याजवळील नारायणपूर या देवस्थानातील गुरूदेव दत्तमहाराज तिचे मनोबल दृढ करत होते. तिथे तिची श्रद्धा होती. त्यामुळेच तन-मन-धन अर्पून तिने 'नारायण ज्ञानगंगा' या अध्यात्मावरील पुस्तकांसाठी आपला वेळ दिला व ते कार्य पूर्णत्वास नेले. यावेळी अनेक परीक्षेचे प्रसंग तिच्या जीवनात आले. पण श्री दत्त महाराजांच्या कृपेने या सर्व प्रसंगातून बाहेर पडली.

वेद- वैदिक वाङ्मय एकूणच भारतीय संस्कृतीविषयी तिच्या मनात प्रखर अभिमान होता. भारतीय संस्कृती, ज्ञानेश्वरी, भगवद्गीता या सारख्या अनेक धार्मिक ग्रंथावर तिने सखोल अध्ययन व चिंतन केले असल्याने यातील श्लोकांची निरूपणे ती सोप्या भाषेत समजावून सांगत असे. संस्कृत भाषेवरील प्रभुत्वामुळे अनेक सुभाषिते ही ती समजावून द्यायची. या सर्व धार्मिक ग्रंथावरील चितंन केले असल्याने ती आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग तिने ज्ञानदानातच केला. समाज-जीवन, सुखी, समृद्ध समाधानी असावे यासाठी ती प्रयत्नशील असे. तिच्या कॉलेजमधील भाषणातून ते जाणवत असे. एक दैवी शक्ती तिच्या व्यक्तिमत्त्वातून ही जाणवायची पण आक्काने स्वत:च्या या गुणांविषयी, साधनेविषयी, कधीही बाहेर परिचितामध्ये याची वाच्यताही केली नाही. बाह्य जगात वावरताना ती अतिशय संयमित मृदुभाषी, विवेकशील, मर्यादाशील, स्थितप्रज्ञ, ग्रहस्थाश्रम सांभाळणारी कर्तव्यदक्ष गृहिणी ,माता, व प्राध्यापिका या रुपातच असे. तिच्या स्वभावाचे अनेक पैलू अज्ञातच राहिले आहेत,असे मला वाटते. तिचा लोकसंग्रह विशाल होता. राजकारण, शैक्षणिक, अध्यात्म अशा हरत-हेच्या क्षेत्रातील लोकांशी तिचे ऋणानुबंध होते.

आक्काला स्वयंपाकाची आवड होती. ती सुगरण होती. पण त्याच बरोबर चवीने खाणारी रसिक खव्वयी पण होती. जे खायचे ते अत्यंत चोखंदळपणे रुचकर, हवेच असा तिचा आग्रह असे. रोजच्या व्यस्त जीवनातून थोडा वेळ मिळाला की, सुग्रास भोजन पदार्थ ती बनवत असे. तिने केलेल्या पुडाच्या कंरजा, गाजराचा हलवा, पॅटीस, गरमागरम चहा हे माझे आवडते पदार्थ. तिच्या हातचा कोणताही पदार्थ खाल्ला की, त्याची चव माणूस विसरत नसे. गोडाचे पदार्थ, मिठाई, आईस्क्रीम तिला मनापासून आवडत असे. पण प्रकृती अस्वास्थ्याने आलेल्या पथ्यामुळे हे पदार्थ तिला आवडत असूनही मनाप्रमाणे खाता येत नव्हते. पण या साऱ्या गोष्टींचा कधी तिने बाऊ केला नाही.

ज्या प्रमाणे जीवनातल्या सर्व संकटांचा सामना तिने शांत हसतमुखाने केला. त्याचप्रमाणे या आरोग्याच्या समस्येचाही सामना धीराने केला. अशी माझी आक्का वैयक्तिक जीवनात अनेक



कठीण प्रसंगातून तावून-सुलाखून अनुभव घेऊन बाहेर पडली, त्यामुळे तिने आम्हां सर्व मुलांना, तिच्या मुलांना आम्हां भाच्याना एवढेचं नव्हे तर आमच्या मुलांना म्हणजे तिच्या नातंवडांना देखील स्वाभिमानाने, निडर, निर्भयतेने जगाच्या आव्हानांना मजबूतपणे कसे सामोरे जावे याचे वेळोवेळी मार्गदर्शन केले. लग्न होऊन स्वत:च्या अनंत जबाबदारी असूनही तिने सासर, माहेरेचे ऋणानुबंध जपले. तिच्यावर लिहिण्यासाठी अनेक आठवणींचे पट डोळ्यांसमोर उभे आहेत. पण शब्दांना मर्यादा हवीच ना?

शेवटी या लेखाने मी माझ्या आत्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. यात अधिक-उणे काही असल्यास तो दोष माझ्यातील अपूर्णतेचा मानून रसिक वाचकांनी माफ करावे.

आयुष्यात आलेल्या काही व्यक्तीची जीवनचरित्रे ही त्यांची वैयक्तिक जीवनपर न राहता ज्ञान देणारे लघुसंग्रह होऊन जातात. अशी माझी आक्का शेवटी समग्र मानवी जीवन, सर्व अंगानी अनुभवून आनंदाने सर्व ऐहिक ,सामाजिक, सांप्रदायिक, कौटुंबिक कर्तव्ये पार पाडून अनंतात विलीन झाली.

तिच्या चिरंतन स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली !





या डोळ्यांची दोन पाखरे...

डॉ. सौ. माधवी श्रीपाद जोशी
एम. ए.,बी. एड. पीएच. डी. प्राध्यापिका, सांगली



मातृदेवो भव। पितृदेवो भव ।आचार्य देवो भव।

ही धर्मवाक्ये आपल्याला आपल्या जीवनातील मात-पिता ,आचार्य यांचे महत्त्व सांगतात. आपल्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणाऱ्यांमध्ये माता-पिता यानंतर तिसरे स्थान गुरूंचे असते. मग ते शाळेतील शिक्षक असोत, महाविद्यालयातील प्राध्यापक असोत की आध्यात्मिक सद्गुरु असोत. प्रत्येकाचे स्थान आपल्या जीवनात अनमोल असते. शैक्षणिक क्षेत्रातील ज्या शिक्षकांचा आपल्यावर अधिक प्रभाव असतो तेच आपले आदर्श शिक्षक असतात आणि त्यांचेच अनुकरण आपण आजीवन करत असतो.

माझ्याही जीवनात माझ्या आदर्श शिक्षकांबद्दल लिहायला बसले. अर्थातच ते नाव होते माझ्या आदरणीय कै. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले मॅडमचे. त्यांच्याबद्दल लिहायला बसले आणि त्या माझ्या जीवनात आल्यापासूनचे प्रसंग माझ्या स्मृतीपटलावरुन तरळून गेले. तेच आपणासमोर मांडण्याचा अल्पसा प्रयत्न करत आहे. मला भावलेल्या मॅडम खरतर याहून अत्युच्च व उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभलेल्या आहेत.

असे म्हणतात.. Teacher is friend, philosopher and guide पण याही पुढे जाऊन Mother also असे जोडले तर वावगे ठरणार नाही. माझ्या मॅडमही अशाच होत्या. मला त्यांनी आपली मुलगी मानल्याने यापुढे त्यांचा उल्लेख 'आई' असाच करेन.

मी बी. ए. भाग १ च्या वर्गात शिकत असताना आईंचा आणि माझा जवळून संबंध आला. प्रसन्न हास्य, प्रेमळ दृष्टी, प्रभावी अध्यापन, विद्यार्थ्यांबद्दलची तळमळ, संस्कृत विषयावरील प्रेम, अभ्यास, व्यासंग या त्यांच्या गुणांनी त्या मला खूप जवळच्या वाटू लागल्या. श्रीमद्भगवदगीता असो की विक्रमोर्वशीयम् नाटक असो तर्कशास्त्र असो की काव्यप्रकाशसारखा व्याकरणपर ग्रंथ असो आईंचे शिकवणे तितकेच प्रभावी आणि अस्खलित होते. संस्कृतमधील कोणताही विषय आपलासा करुन सुलभतेने शिकवण्याची त्यांची हातोटी असामान्य होती. भगवद्गीता शिकविताना तर आई तो विषय इतक्या तल्लीनतेने शिकवायच्या की, क्षणभर असे वाटायचे की, प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या तोंडूनच गीतेचे हे तत्त्वज्ञान आपण ऐकत आहोत. यातूनच आईंच्यात आणि माझ्यात



गीतेतील विषयावर तास न् तास चर्चा सुरु असे. त्यांत रामायण, महाभारत, पुराणे, उपनिषदे इत्यादी विषय असत त्यातूनच आमच्यातील प्रेमाचे बंध अधिकच दृढ होत होते. आईंचे सतत बरोबर असणे. त्यांच्याबरोबर चर्चा करणे इत्यादी प्रकर्षाने आवडत होते. भविष्यात मी जे श्रीकृष्ण-अर्जुन यांची अन्योन्य भक्ती' यावर संशोधन केले, ती अन्योन्य भक्ती आम्ही खऱ्या अर्थाने जगलो होतो. जणू काही त्याचे बीजच येथे रुजले गेले होते.

आईंबरोबर श्री क्षेत्र नारायणपूर येथील श्री दत्त सेवेबरोबर त्यांनी माझ्यावर अनेक संस्कार केले. भक्ती म्हणजे काय ? भक्त कसा असतो ? उच्चतम त्याग कसा करावा ? जीवनात सुसमायोजन कसे करावे ? शिष्यांची कर्तव्ये कोणती ? याबद्दलचे संस्कार आई केवळ देत नव्हत्या तर स्वतःच्या आचरणातून ते संस्कार आमच्यात रुजवत होत्या. या साऱ्यामुळे माझ्या हृदयातील आईंची प्रतिमा अधिकच उंचावत होती. बी. ए., एम. ए. या परीक्षांमध्ये मी जेव्हा विद्यापीठामध्ये प्रथम आले होते तेव्हा माझ्यापेक्षा आनंद आईंनाच झाला होता आणि माझा अभिमानही वाटला होता. तसेच आईंना जेव्हा विद्यावाचस्पती ही पदवी प्रदान झाली तेव्हा मलाही खूप आनंद झाला होता.

कालांतराने माझ्या विवाहानंतर काही काळ आमचा संपर्क कमी झाला होता. परंतु गुरु आपल्या अनामिक शक्तिने शिष्याला आपल्याकडे बोलावून घेतात. तसेच काहीसे घडले. भविष्यात पीएच. डी. केली तर आईंकडेच करायची हे पूर्वीच ठरविले होते. जेव्हा या संदर्भात मी आईंकडे माझा पीएच. डी. चा विषय बोलले तेव्हा आईंनी त्याला तात्काळ मान्यता दिली. पुढे शरीर साथ देत नसतानाही आपला प्रबंध हा उत्तम प्रतीचा निर्दोष व्हावा यासाठी मला सर्वप्रकारे उत्तम मार्गदर्शन केले.

दिवस दिवस बसून प्रबंध ऐकणे, त्यात सुधारणा सांगणे, स्वतःच्या शारीरिक व्याधींकडे दुर्लक्ष करुन विद्यार्थ्यांसाठी झटणाऱ्या माझ्या आईंचे हे विलक्षण रुप तेव्हा मला दिसले. प्रबंध तपासण्यासाठी जेव्हा जेव्हा मी आईकडे जात असे तेव्हा तेव्हा माझ्या माहेरी गेल्याची जाणीव मला होत असे. माझ्या पीएच. डी. च्या अंतिम मुलाखतीच्या वेळी आईंची प्रकृती खूपच खालावली होती. तरीही त्याकडे दुर्लक्ष करुन आई माझ्या मुलाखतीच्या वेळी उपस्थित होत्या. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद, कृतार्थता, कर्तव्यपूर्तीचे विलक्षण समाधान होते. शेवटी गीतेत भगवान श्रीकृष्णाने सांगित्याप्रमाणे –

वासांसि जीर्णानि यथा विहायनवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ।।

या न्यायाने त्यांनी या जगाचा निरोप घेतला खरा पण त्यांची संस्कारांची शिदोरी जी त्यांनी आम्हांला दिली. ती मात्र कायम पुरेल अशीच आहे. शरीराने जरी त्या गेल्या असल्या तरी आम्हां सर्व मुलांना त्या जणू काही आश्वासन देत आहेत -

या डोळ्यांची दोन पाखरे फिरतील तुमच्या भोवती ।
पाठलाग ही सदैव करतील असा कुठेही जगती ।।'





अमृताचा अक्षय झरा - माझ्या गुरूवर्या..

सौ प्रतिष्ठा कुलकर्णी-सोनटक्के**,** बी. ए. , एम. जे.
समन्वयक आणि कार्यकारी संपादक,
व्यास क्रिएशन्स प्रकाशन संस्था, ठाणे मुंबई



या काळजाचे त्या काळजात ओतणे
सुमधुर बोल जागवील आपले गाणे
संवाद एक माध्यम एक निमित्त
यातूनच घडेल अवघ्या अंतरीचे तराणे

एक शिक्षक, एक गुरु नेमकं हेच करीत असतो. आपल्याजवळ जे काही आहे ते निस्वार्थीपणे आपल्या विद्यार्थ्याला देत असतो. या हृदयीचे त्या हृदयी हे नित्यनूतन गाणे तो गात असतो. शिकविता- शिकविता अनंत अनुभवांची शिदोरी तो आपल्या विद्यार्थ्यांसमोर रिती करीत असतो आणि या शिदोरीवरच कित्येक पिढ्या घडत असतात. सुगंधी फुले जशी भोवतालचा परिसर आपल्या गंधाने दरवळून टाकतात. तसेच आपल्या अनुभव विश्वाची ओंजळ गुरू अलगदपणे रिकामी करीत असतो. ओंजळीतल्या या सुगंधी संस्कार पुष्पांनी आम्ही उभे राहिलो. प्रत्येक क्षणी घडत राहिलो...

माझ्या गुरुवर्या संस्कृतच्या प्राध्यापिका डॉक्टर सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे यांच्या आठवणींनी मन भरून येतयं. आता त्या बरोबर नाहीत पण त्यांचा शब्द न् शब्द मनाच्या कोपऱ्यात जपून ठेवलाय. तुम्ही कुठे शिकला, तुमचे शिक्षण काय, तुम्हाला लाभलेले शिक्षक, ज्या वातावरणात तुमची वाढ होते ती संस्था, तो परिसर, तुमची साथ-संगत या साऱ्यातून लाभलेले संस्कार हेच तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी आधारस्तंभ असतात. मी ज्या संस्थेत खऱ्या अर्थाने घडले त्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय आणि मला लाभलेले गुरू डॉ. आ. ह. साळुंखे आणि डॉ. राजाज्ञे मॅडम यांच्या विषयीची कृतज्ञता ही शब्दातीत आहे.

मी बी. ए. द्वितीय वर्षापर्यंत वाई, जिल्हा सातारा येथील किसन वीर महाविद्यालयात शिकत होते. संस्कृत विषय घेऊन बी. ए. करायचे हे आधीच ठरले होते पण वाईच्या महाविद्यालयात तृतीय वर्षासाठी संस्कृत विषयाची सोय नव्हती. म्हणून साताराच्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात प्रवेश घेतला. आता पुन्हा नव्या वातावरणात जोडले जाणार होते. ध्येयाच्या

टप्प्यावर नवं जग पाहणार होते. मनात भीती होती, धास्ती होती. नवे शिक्षक, नवे कॉलेज, नवे साथ सोबती यांचे थोडं दडपणही जाणवत होतं, पण एका सुस्मित हास्याने हे सारं दडपण निघून गेलं. हे हास्य होतं सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम यांचं ! माझी पहिली ओळख त्यांच्याशी झाली. पहिल्या भेटीतच माझी आस्थेने चौकशी केली. कॉलेजबद्दल, संस्कृत विभागाबद्दल, इतर प्राध्यापकांबद्दल मला सांगितलं. त्यामुळे हे कॉलेज माझंच आहे याची जाणीव झाली; अर्थात ती जाणीव मॅडमनीच निर्माण केली. मी वाईहून सातारला रोज एस.टी. ने जायचे, याचे त्यांना खूप अप्रूप वाटायचे. कॉलेज सकाळी सात वाजता असायचे, पहाटे सहाच्या एसटीने निघून बरोबर पावणेसातला कॉलेजच्या दारात हजर असायचे. ही गोष्ट खूप विशेष आहे असं मला कधीच वाटायचं नाही. पण सर्वांना त्या कौतुकानं हे सांगायच्या.

संस्कृत हा मॅडमचा जिव्हाळ्याचा विषय. शिकविताना त्या अत्यंत तन्मयतेने अक्षर न ्अक्षर अगदी जीव ओतून शिकवायच्या. संस्कृत साहित्याच्या इतिहासापासून संस्कृत वाङ्मय, वेद, उपनिषदे, संस्कृत नाटके यांच्यावर त्यांचे प्रभुत्व होते. वाणी अत्यंत शुद्ध, मधुर, गोड. त्यांच्या प्रत्येक शब्दातून ही संस्कृतवाणी नित्य झ-यासारखी पाझरत असायची.

शिकवण्याची उत्तम हातोटी, सच्चेपणा आणि राजेभोंसले मॅडम यांचा स्वभावधर्म होता. केवळ एक वर्ष त्यांच्या हाताखाली शिकण्याचे भाग्य मला लाभलं. त्यांनी केवळ अभ्यासक्रम शिकवला नाही तर अनुभवांचं त्यांच्या ठाई आलेल्या आठवणींचं संचित देऊ केलं.

अत्यंत हाल-अपेष्टा, नियतीच्या करूण मार्गातून स्वतःचा मार्ग शोधत त्या उभ्या होत्या. अनेक संकटे आली, दुःख आली पण त्या ठामपणे त्याला सामोरे जात होत्या. कोणाचाही आधार नसताना एकटी ही स्त्री आयुष्याशी भांडत होती. 'पूर्णानंदचारी' या कोकणी भाषिक कवीने 'आयुष्याला परीक्षा' म्हटले आहे. यात सुख-दुःखांचं व्याकरण असतं, गरजांचा गुणाकार असतो, इच्छा आकांक्षांचा भागाकार असतो, ही प्रश्नपत्रिका सोडवायचं कसब प्रत्येकाकडे असतंच असं नाही. राजाझे मॅडमने अत्यंत सचोटीने ही प्रश्नपत्रिका सोडवली. त्या कायम म्हणायच्या, रोजंच चांदण वाट्याला येईल किंवा ग्रह कायमच फिरलेले असतील असा विचार कधीच करू नये. आजही हे शब्द ठाई-ठाई आठवतात.

कॉलेज वर्ष संपल्यातरही माझा उल्लेख माजी विद्यार्थिनी असाच त्या इतरांजवळ करायच्या. मला आठवतंय; मी बॅचरल ऑफ जर्नालिझम शिवाजी विद्यापीठातून करीत होते. लेडीज हॉस्टेलवर राहत होते. त्याच वर्षी त्यांची कन्या मयूरा हिला पदवीदान समारंभात विशेष प्राविण्याचे बक्षीस होते. मोठा सोहळा असतो तो. त्याआधीच्या वर्षी हे पारितोषिक मला मिळाले


होते. (अर्थात याचा पाठपुरावा राजेभोंसले मॅडमने केला होता) मला त्यांचा फोन आला.'मी आणि मयूरा विद्यापीठात येतोय, तू मयूराला मदत करशील ना!' मी म्हणाले, 'मॅडम मदत काय म्हणताय. मला हक्कानं सांगा, मी तुमच्याबरोबरच राहीन. पदवीदान समारंभादिवशी त्या कोल्हापूरला आल्या. संपूर्ण दिवस मॅडम आणि मयूरा बरोबर मी होते. समारंभ झाला आणि निघताना त्यांनाच खूप भरून आलं. मला मिठी मारली. त्यांचा तो स्पर्श, आशीर्वादाचा हात आजही जाणवतोय. त्यानंतरही कधी फोनवर, कधी प्रत्यक्ष त्या भेटत राहिल्या.

एक दिवस अचानक त्यांच्या निधनाची वार्ता कानावर पडली. डोळ्यातील पाण्याने अश्रूंची जागा घेतली होती. आभाळ भरून यावं आणि पावसाच्या धारा कोसळाव्यात तशा सा-या आठवणी तरळू लागल्या. मॅडमनी केवळ पदवी मिळवण्यासाठी शिकवलं नाही तर आयुष्याच्या प्रत्येक परीक्षेला सामोरे जाण्याचे संस्कार-शिक्षण दिलं. परीक्षेचा अभ्यास असो किंवा आयुष्याचा अभ्यास असो तो तळमळीने आणि चिकाटीने करायचा असतो हे त्यांनी सांगितलं. खास करून आम्हां मुलींना त्यांचे मार्गदर्शन कायम मोलाचं ठरलं.

बाहेर समाजामध्ये वावरताना एक स्त्री म्हणून, एक मुलगी म्हणून आपण खंबीरपणे उभं राहिलं पाहिजे याचं मूल्यशिक्षण त्या नेहमी देत असत. बी .ए. नंतर मी संस्कृतच शिक्षण पुढे कायम सुरू ठेवावं अशी त्यांची मनापासून इच्छा होती. पण मी दिशा बदलली आणि ते राहून गेलं. आज याची खरोखरच मला खंत वाटते आहे. संस्कृतसंबंधी कोणताही संदर्भ आला तरी डोळ्यासमोर राजाज्ञे मॅडम यांची मूर्ती आजही उभे राहते. आपण रक्ताच्या नात्याने बांधलेले असतो आणि मानलेल्या नात्यांनी जोडलेलो असतो. असं माझं नि मॅडमचं जोडलेलं नातं होतं.

हे बंध नात्यांचे
हे बंध हृदयाचे
हा अमृताचा जणू
अक्षय झरा !!





स्वयंसिध्दा- माझी आक्का

सौ रूपाली रवींद्र येवले,
एम. ए., ठाणे मुंबई

एका सर्वसामान्य मराठी कुटुंबात जन्माला येऊन 'संस्कृत' अशा प्राचीन भाषेचा अभ्यास करून 'डॉक्टरेट' ही पदवी मिळवली ती माझी आत्या डॉ. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले(राजाज्ञे) !आम्ही तिला घरात (तिच्या माहेरी) 'आक्का' या नावाने हाक मारत असो. आक्का म्हणजे मोठी बहीण आणि मोठया बहिणीप्रमाणेच तीने ती जबाबदारी वेळोवेळी निभावली. अगदी माझ्या लग्नाची जबाबदारीही तीने उचलली आणि उत्तमरित्या पार पाडली.

आज तिच्या आयुष्याकडे बघताना मला जाणवते की, दुःखालाही सुख मानून कसे जगावे हे तिच्याकडून शिकावे. ब-याच चांगल्या-वाईट प्रसंगातून जाताना तीने स्वतःला सिद्ध करून समाजात एक मानाचे स्थान मिळवले आणि अशीच स्वतः ला 'स्वयंसिद्ध' करण्याची ताकद तिच्यामध्ये होती. तेजस्वी, करारी आणि स्वाभिमानी असे तिचे व्यक्तिमत्त्व. समाजात मानाचे स्थान असूनही कधी त्याचा गर्व केला नाही. याउलट अतिशय साधी- राहणी आणि उच्च विचार-सरणी अशीच कायम राहिली.

पुस्तक वाचनाची तिला प्रचंड आवड होती. त्यामुळे ती उत्तम-वक्ताही होती. ब-याच शाळा, महाविद्यालयामध्ये ती प्रमुख-पाहुणे म्हणून जायची. त्यामुळे तिच्यासोबत जाण्याचा मलाही योग येत असे. तिची बरीच छान व्याख्याने मला ऐकायला मिळाली. त्याचबरोबर मोठमोठया व्यक्तींना भेटण्याची संधीही मिळाली. तिच्या सोबतच्या खूप छान आठवणी आजही विसरता येत नाहीत. अशीच छान आठवण म्हणजे मी तिच्यासोबत अदालत वाडयात छ.राजमाता सुमित्राराजे राजेभोंसले यांना भेटावयाला गेलो ती ! तिच्यामुळे त्यांना जवळून भेटण्याची, बोलण्याची संधी मला मिळाली. 'थोर इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे' यांनाही पाहण्याचा योग मिळाला तोही तिच्यामुळेच ! वाचनाबरोबरच तिला लिखाणाचीही आवड होती. वृत्तपत्रांतील 'छत्रपती शिवाजी महाराजांवरील' तिने लिहिलेले लेख खूप प्रसिद्ध झाले. श्री क्षेत्र नारायणपूर येथील प्रसार आणि धार्मिक ग्रंथाच्या लेखनाचे काम हाती घेऊन उत्तमरित्या ते पार पाडले.

माझी गुरू, मार्गदर्शक तर ती होतीच पण आमच्या कुटूंबाची आधारस्तंभ पण होती. माझ्या वडिलांच्या निधनानंतर आम्हां तिन्ही भावंडांना आणि माझ्या आईला तिने शेवटपर्यंत



आधार दिला. माझ्या आईसोबत तीचे संबंध ननंद-भावजयाचे नसून सख्खा बहिणीप्रमाणे होते. दोघीही आपल्या सुख-दुःखाच्या गोष्टी एकमेकांशी मन-मोकळ्याप्रमाणे बोलत. आम्ही लहानपणापासून आक्काला लढताना पाहिले. तिने कधीच कशासाठी आमच्या पप्पांकडे हट्ट केला नाही. जे मिळाले त्यात सुख मानले. परिस्थितीशी जुळवून घेताना पाहिले. आक्का स्वभावाने खूप सोशिक आणि शांत होती. नेहमी सर्वांच्या अडी-अडचणीला धावून जाणारी होती.

आमच्या पप्पांशी तिचे नाते मुलीसारखेच होते. त्यांच्या दोघांच्या वयात जवळ-जवळ तेरा वर्षाचे अंतर होते. आमची धाकटी पुष्पा आत्या जिला आम्ही ताई म्हणतो. ती नेहमी आक्काला म्हणायची, 'आक्का तुझा जन्म पुण्याला डॉ. देवांकडे देव हॉस्पिटलमध्ये झाला आणि तू अगदी देवासारखीच आहेस, देवमाणूस आहेस!' ताईसाठीही आक्काने खूप केले. तिच्या तिन्ही मुलींच्या लग्नातील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या तिने स्वतः हून आनंदाने पार पाडल्या. आक्का कधीच कोणत्या मान-पानाची अपेक्षा ठेवत नसे. खूप प्रेमळ आणि भोळी होती आक्का !!

आक्काच्या हातच्या चहाची, सुंदर करंज्याची आणि चवदार पालक-पनीरची चव जिभेवर अजूनही रेंगाळते. तिच्या हातचा स्वयंपाक फार आवडायचा. आक्काला व्यवस्थित राहिलेले आवडायचे. ती स्वतः कधीच सौंदर्य-प्रसाधने वापरत नव्हती पण आम्हां मुलींचे मात्र लाड करायची. अशी माझी आक्का सुंदर, स्वयंपूर्ण, शांत, समजूतदार आणि म्हणूनच **स्वयंसिद्धा** !! माझी लाडकी आक्का !!

माझ्या महाविद्यालयीन काळात तिच्यासोबतच्या आठवणी सांगायच्या तर माझ्या विद्यापीठाचे पेपर सेंटर तिच्या कॉलेजमध्ये होते. त्यामुळे आम्ही दोघीही सोबतच जात असू. एकदा एका पेपरचा माझा अभ्यास व्यवस्थित पूर्ण झाला नसल्यामुळे मला थोडे दडपण होते. मी तिला सहजच जाताना बोलले. आज पेपरला वर्गामध्ये तू पर्यवेक्षक म्हणून आली तर किती छान होईल. आणि देवाच्या मनात ही असेल कारण ती माझ्या शेजारच्या वर्गावर पर्यवेक्षक म्हणून आली. मला आनंदही झाला आणि मनात थोडी धाकधुक ही वाटायला लागली. माझी आत्या एवढी मोठी प्राध्यापक आणि आपल्याला साधा पेपरही सोडवता नाही आला तर? पण थोड्याच वेळेत मला तिला पाहून आत्मविश्वास वाटू लागला आणि पेपर लिहायला सुरूवात केली. तिच्याबद्दल आदरयुक्त भीतीही मनात होती. त्यामुळे मान खाली घालून लिहायला सुरूवात केली आणि पेपर पूर्ण केला. नंतर त्याच पेपरमध्ये मला चांगले मार्कही मिळाले. मी संस्कृत विषयाचा जो काही थोडा-फार अभ्यास केला तो आक्कामुळेच. तिनेच मला संस्कृत घ्यायला लावला होते. मी अनेकदा माझा अभ्यास तिला घ्यायला लावत असे.



माझ्या सासरी माझे पती श्री.रविंद्र येवले आणि माझे सासरे जे तीचे गुरू-बंधु ही होते. श्री. संपत साहेबराव येवले हेही तिच्या आजपर्यंतच्या कर्तृत्त्वाबद्दल कौतुकाने बोलतात. त्यामुळेच तिच्यासारख्या थोर व्यक्तीचा सहवास मला माझ्या या आयुष्यात मिळाला त्याबद्दल मी देवाचे खरोखरच आभार मानते. तिने केलेल्या संघर्षाचे कौतुक वाटते आणि तीने स्वतःच्या हिंमतीने, जिद्दिने उभारलेल्या घराचे, साम्राज्याचा अभिमान वाटतो. सातारला गेले की, आक्काची भेट घेतली नाही ,असे कधीच झाले नाही.

आत्ता मात्र 'ती' नाही तर तिची कमी फार जाणवते. तिची खूप आठवण येते. तिच्या जाण्याने जीवनात पोकळी तर निर्माण झाली आहेच पण आमचा आजपर्यंतचा आधारस्तंभ ही कुठेतरी गळून पडला असे वाटते.

शेवटी तिचे शुभाशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी राहोत, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !!





माझी बहीण : ताईसाहेब



श्री.विकास धुळेकर,
पत्रकार, दै. ऐक्य, सातारा

प्रा. डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले यांची व माझी ओळख कुठल्या माध्यमातून झाली याची आता फारशी कल्पना नाही. मी १९८५ साली दै. ऐक्यमध्ये नोकरीस लागलो, तेव्हाचे लाल बहादूर शास्त्री कॉलेज आतासारखे खूप मोठे होते असे नाही पण बातम्यांच्या निमित्ताने कॉलेजशी संबंध येत असायचा. त्यावेळी प्राचार्य चिटणीस सर होते. संस्कृत विषयाचे प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्यासोबत कार्य करणाऱ्या प्रा. डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले यांच्याशी माझा परिचय झाला.

डॉ. राजेभोंसले त्यावेळी मंगळवार पेठेत राजाज्ञे वाड्यात राहायच्या. वाडाही मोठा ऐसपैस आहे. राजघराण्याचा वारसा त्यांना लाभला असला तरी त्यांच्या वागण्यात राजघराण्याचा मोठेपणा कोठेच नव्हता. मात्र त्यांच्या मुलांची राजघराण्याची ऐट जाणवणारी होती. मी त्यांना ताईसाहेब म्हणायचो, त्या आपल्या मुलींशी व मुलाशी कधीच एकेरी नावाने वागल्या वा बोलल्या नाहीत. मुलीही नेहमीच त्यांच्याशी अहो-जाहो या आदराने बोलत असत. मी त्यांना विचारलेही होते असे आदरार्थी वा अहो, जाहो असे संबोधन मुलांसाठी का म्हणून ? त्या म्हणाल्या होत्या, हे राजघराण्याचे संस्कार असतात. त्यामुळे मुलांशी बोलतानाही ते संस्कार जपूनच बोलावे लागते. जपायचे असतात

मी त्यांना ताईसाहेब असेच म्हणत असे. मला आठवते दरवर्षी राखीपौर्णिमेला मला राखी बांधत. अशा अनेक घटना आजही मला आठवतात.

डॉ. सुहासिनीदेवी यांची 'छत्रपती शिवाजी महाराजांवरील' लेखमाला दै. ऐक्यमधून प्रकाशित होत होती. त्यांच्या पीएच. डी. चा विषयही तोच होता. ही लेखमाला चांगलीच गाजली होती. दोन मुली व एक मुलगा माझ्याशी आजही प्रेमाने मामा म्हणून संपर्क ठेवून आहेत. ताईसाहेब नारायणपूर येथील आण्णामहाराज यांची सेवा करत.

त्यांच्या मुलींच्या विवाहात त्यांनी मला आवर्जून बोलवले होते. दोन्ही मुलींचे विवाह अगदी थाटात करून दिले. मुलाच्या विवाहावेळी मात्र त्यांची प्रकृती खूपच खालावली होती. एक चांगले की त्यांनी सूनमुख पाहिले व नातवंडही पाहिली. खरं म्हणजे त्या एक अत्यंत विद्वान आणि संस्कृत पंडित असल्या तरी त्यांना त्याचा अजिबात गर्व नव्हता.

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या त्या विद्यार्थिनी. डॉ. साळुंखे आणि डॉ. सुहासिनीराजे या सांगलीचे संस्कृतचे प्रा. डॉ. इनामदार सर यांचे विद्यार्थी. दोघांनी विद्यार्थ्यांनी डॉ. इनामदार सरांचे नाव खूप चांगले कीर्तीवंत केले, यात कोणतीही शंका नाही. शास्त्री कॉलेजची विद्यार्थिनी त्याच महाविद्यालयात प्राध्यापक आणि तेही डॉ. साळुंखे यांच्यासोबत प्राध्यापक म्हणून नोकरी करण्याचा अनुभव डॉ. सुहासिनी राजेभोंसले यांनी घेतला होता.

कालांतराने त्या निवृत्त झाल्या. त्यांची कन्या मयूरा लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातच प्राध्यापिका म्हणून लागली. तिने आईचाच वारसा चालवला. तीदेखील आधी शास्त्री कॉलेजची विद्यार्थिनी होती. नंतर त्याच कॉलेजात प्राध्यापिका म्हणून रुजू झाली. आईचाच कित्ता कन्येने गिरवला हे एखादेच उदाहरण असावे. एक निर्विवाद सत्य, ताईसाहेबांची पतीनिष्ठा तसूभरही कमी झाली नव्हती. मुलं अत्यंत चांगली निघाली. त्यांनी आईचे नाव अजरामर केले यात शंका नाही. वास्तविक वडिलांच्या पश्चात मुलांची परवडच होते. पण ताईसाहेबांनी आपल्या दरबारी धाकात मुलांवर अत्यंत चांगले संस्कार केले. दोन्ही मुली आणि मुलाने आईचे नाव राखले.

ताईसाहेब आज नाहीत, त्यांची आठवण पदोपदी अनेक प्रसंगी येते. शेवटच्या दिवसात त्यांची भेट घेता आली नाही याची खंत आजही मनात आहे. मोठी मुलगी पुण्याला, एक गदगला आणि मुलगा आपल्या व्यापात असल्यामुळे त्यांच्या भेटीगाठी कधीतरी घडतात ही वस्तुस्थिती आहे.

पण ताईसाहेबांच्या आठवणी आजही मनात कायम आहेत. त्यांचे स्मितहास्य आजही मनावर कोरलेले आहे.

त्यांच्या आत्म्यांस सद्गती लाभो हीच देवाजवळ प्रार्थना !!





गुरुभक्ती, सेवा, त्याग, प्रेम, तेज म्हणजे माझ्या वीणा आत्या...!

सौ. दीप्ती नकुल राजेतौर (तंवर रजपूत)सरपाले,
सावरगाव, बीड.

लिखाणाचा आणि माझा तसा खास संबंध नाही. परंतु काही व्यक्ती ह्या जीवनात येतात व त्यांच्याबद्दल काहीतरी लिहिण्यास मिळणे हे कार्य त्यांच्याच ओढीने पूर्ण होते.

कै. श्रीमती प्रा. डॉ. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले राजाज्ञे एम. ए. (संस्कृत, मराठी) बी. एड. पीएच. डी. (माझ्या वीणा आत्या) हे असे उच्च शिक्षित व्यक्तिमत्त्व आयुष्यात येणे हे माझे व माझ्या परिवाराचे भाग्य मानते. वीणा आत्यांचा व माझ्या कुटुंबाचा संबंध हा श्री क्षेत्र नारायणपूर ह्या देवस्थानात आला.' योगी सद्‌गुरू श्री. नारायण महाराज (आण्णा)' यांच्या चरणी सेवेच्या माध्यमातून माझ्या वडिलांच्या गुरुबहिण हे नाते त्यांच्याशी तयार झाले. स्वच्छ, स्पष्टवक्त्या व प्रेमळ शब्दांत भल्या-भल्यांना आपल्या शाब्दिक ज्ञानाने गप्प करीत असतं. आमचे वडील जहाल होते तरी ते देखील आत्यांसमोर गप्प असतं.

आत्यांचे 'संस्कृत' वर प्रभुत्व होते. जेव्हा 'योगी सद्‌गुरू आण्णा महाराज 'यांच्या विचारातून संस्कार शिबिराची संकल्पना उदयास आली. तेव्हा त्या महान कार्यात वीणा आत्यांचे योगदान प्रथम व कौतुकास्पद राहिले. त्यांना अनेक सेवक भक्तांनी साथ दिली. संस्कार शिबिरात त्या श्लोक म्हणून घेत. व्याख्याने देत असतं.

मी तशी मस्तीखोर, डांबिस पण आत्यांना मानणारी होते. त्यांचा आवाज कानावर आला तरी मी पूर्ण लक्ष त्यांच्याकडे देत असे. त्यांच्या आवाजात एक मधुरता, नम्रता होती.

प्रेम, श्रद्धा हे काय असते हे मी फक्त अन् फक्त वीणा आत्यांकडूनच शिकले. बंधू प्रेम अगदी ते गुरुबंधू असो किंवा सख्खे बंधू असो त्यांनी ते समान प्रेम केले. श्रद्धा तर भगवंतावर आहेच ! पण गुरूभक्ती अशी की, अगदी वाखण्याजोगी आहे. माझ्याकडे अनेक विषय आहेत, परंतु हा विषय मला आवर्जून सांगवासा वाटतो. सद्‌गुरू आण्णा महाराजांनी (देवस्थानाच्या वतीने) काही ग्रंथ व पुस्तके प्रकाशित केले आहेत. त्यांच्या वाणीतून शब्द यावेत व ते आत्यांनी तास न् तास बसून ग्रहण करून लिखाण करावे, ही साधी भक्ती- सेवा नाही.



सद्‌गुरू नेहमी सांगतात, जो दाखवून सेवा करतो त्यापेक्षा जो गुप्त सेवा करतो त्यास मेवा (आशीर्वाद) ज्यास्त मिळतो ही खरी गुरुचरणी सेवा.

आत्या मूळ सातारच्या राहणाऱ्या होत्या परंतु त्या पुण्यात सरपाले आण्णा व कळस गावी देवकर आजोबांच्या घरी ग्रंथांचे लिखाण काम करीत असत. मी त्यांना दिवस-रात्र काम करताना पाहायचे. अगदी त्यांच्या शरीरात रक्ताच्या गाठी होत. मी स्वतः अशा पुण्यवान स्त्रीचे पाय चेपायचे, हे माझे भाग्यच !!

आत्यांचा शृंगार म्हणजे एकच डोक्यावरील साडीचा पदर, जो की केव्हा खांद्यावर सुद्धा पाहिला नाही. काय ते त्यांचे सालस व तेजस्वी रूप की पाहून धन्य वाटे !

त्याग तर काय विचारू नका ! त्यांच्या छोट्या तीन मुलांना कधी घरी तर कधी बंधू (चौहाण मामा) यांच्या घरी सातारला ठेऊन त्या पुण्यात व श्री क्षेत्र नारायणपूर ला येत असत. त्या संस्कृतच्या प्रोफेसर होत्या. सर्व कामासाठी स्वतःच सर्व खर्च करीत. त्यांचे लेख वर्तमानपत्रात छापले जात. अगदी त्यांच्या सारखेच त्यांचा मुलांचे कौतुक करावेसे वाटते की, ते आपल्या आईच्या सर्व सेवेमध्ये साथ देत. ह्या कार्यापुढे मी तर नतमस्तक आहे.

आत्या कमी बोलत पण ते लक्षात राहण्यासारखेच होते. त्या कॉलेजला जाताना मला खाऊला पैसे देत. मला आठवते रात्री चौपाटीवर भेळ खायला पैसे देणाऱ्या आत्या ! पण त्यांना न सांगता मैत्रिणीसोबत खरेदीला गेले तेव्हा मात्र ओरडा देणाऱ्या आत्या ! आजही आठवले की शिस्तीचे पालन होते.

माझ्या आत्यांनी केव्हाच जाणवून दिले नाही की, त्या 'राजेभोंसले' घराण्यातील स्त्री आहे. आम्ही मावळे मावळ प्रांतातील ! पण त्या फक्त न् फक्त आत्या (गुरुवर्य) म्हणूनच आम्हा मुलांच्या मनामध्ये घर करून राहिल्या.


मी त्यांना शेवटच्या क्षणी नाही भेटू शकले. त्या आजाराने त्रस्त होत्या. खरतरं मला त्या तेजस्वी मूर्तीला लहानपणापासून ज्या तेज-रूपामध्ये पाहिले होते तसेच डोळ्यात-मनात साठून ठेवायचे होते. हे माझे दुर्भाग्य की मी स्वार्थी झाले म्हणावे !

मी तर म्हणेन गुरुभक्ती, सेवा, त्याग, प्रेम, तेज म्हणजे माझ्या वीणा आत्या...!
वीणा आत्यांना माझा मनापासून साष्टांग दंडवत...!!





सातारमधील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील संस्कृत विभागाच्या मुकुटमणी सन्माननीय प्रा. डॉ. एस. एस. राजेभोंसले मॅडम



कु. मुलाणी झीनत शौकत
एम. ए., बी. एड. प्राध्यापिका, सातारा

**"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥"**

सातारमधील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील संस्कृत विभागाच्या मुकुटमणी सन्माननीय प्रा .डॉ. एस. एस. राजेभोंसले मॅडम यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

प्रत्येक व्यक्तीने त्याच्या जीवनात शाळा, महाविद्यालयातील सुखद क्षणांना जगण्याचा अनुभव हा घेतलेला असतो. शाळा, महाविद्यालयात आपण ज्या गोष्टीसोबत जास्त जोडलेलो असतो ते असतात आपले शिक्षक, महाविद्यालय आणि विद्यार्थी यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे आपले शिक्षक होय. विद्यार्थ्याला घडविण्यात आणि त्याच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे काम हे शिक्षक करत असतात. म्हणूनच जेव्हा जेव्हा महाविद्यालयीन जीवनाचा उल्लेख होतो तेव्हा सर्वात प्रथम आपल्या स्मृतीत येतात ते आपले आवडते शिक्षक. आवडते शिक्षक म्हटल्यावर बहुधा सर्वांना आठवतात ते त्यांच्या शाळेतील शिक्षक कारण ते बालपणाचे स्वच्छंदी जीवन, शालेय जीवन, शिक्षकांचा प्रेमळ स्वभाव त्यामुळे ते कायम आपल्या स्मृतीत राहतात.

माझ्या जीवनात ही आत्तापर्यंत अनेक शिक्षक आले. त्यांचा मला सहवास लाभला आणि त्यांच्याकडून मी ज्ञान ग्रहण करून शकले. पण तरीही गुरु, शिक्षक, आचार्य हे शब्द जरी ऐकले तरी डोळ्यासमोर एकच प्रतिमा उभी राहते ती म्हणजे माझ्या गुरु आदरणीय प्रा. डॉ. एस. एस. राजेभोंसले मॅडम यांची. प्रथम तर स्वतःचचं मोठ नशीब म्हणायला हवे की, एवढ्या आदर्श गुरूंची विद्यार्थिनी होण्याचं भाग्य मला लाभलं. साधी राहणी, उच्च विचारसरणी, स्वच्छ, निर्मळ आणि आदर्श व्यक्तिमत्त्व असणाऱ्या आमच्या राजेभोंसले मॅडम !

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात मी कला शाखेमध्ये प्रवेश घेतला होता. कोणत्या विषयात पदवी प्राप्त करावयाची हे आधीच ठरवलं होते आणि त्यानुसारच प्रथम वर्षासाठी मी विषय निवडले होते. पण तरीही मनात विषयांविषयी थोडी भीती होती. मला संस्कृत विषयात



पदवी प्राप्त करायची होती पण दहावी नंतर दोन वर्षे मला संस्कृत विषय नव्हता आणि आता अचानक तो विषय पुन्हा शिकायचा. मला तो विषय कठीण तर नाही ना जाणार? मला त्या विषयाचे आकलन होईल ना ?असे अनेक प्रश्न मनात ठेवून तो विषय मी घेतला. पण ज्यावेळी मी प्रथम संस्कृतच्या विषय-शिक्षिका राजेभोंसले मॅडम यांना भेटले. तेव्हा माझ्या मनातील सारी भीती नाहीशी झाली आणि मॅडमच्या भेटीने खरचं माझ्या जीवनाला कलाटणीचं मिळाली. आज जीवनात मी जे काही आहे त्याच्यामध्ये मॅडमचं योगदान खूप मोठे आहे. जेव्हा मी बी. ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेतला होता तेव्हा मी एका सामान्य दगडाच्या स्वरुपात होते. या दगडातील अनावश्यक गोष्टी दूर करून त्याला योग्य आकार देण्याचं काम मॅडमनी केले.

महाविद्यालयात असताना तीन वर्षे मॅडमचा सहवास आम्हांला खूप जवळून लाभला. मॅडमचा स्वभाव खूप प्रेमळ होता. तीन वर्षात एकदाही मी मॅडमना रागवताना किंवा चिडताना कधीच पाहिलं नाही. कितीही मोठेपदस्थ व्यक्तिमत्त्व असो, महाविद्यालयीन कर्मचारी असो किंवा आमच्यासारखे विद्यार्थी असो मॅडम प्रत्येकासोबत आदराने वागत असतं.

त्यांचे स्मितहास्य, प्रेमळ आणि मायाळू स्वभाव यामुळे प्रत्येकाच्या मनात मॅडम विषयी आदराची भावना निर्माण झालेली पाहायला मिळते. खरचं म्हणतात की ,सन्मान हा पैशाने विकत घेतला जात नाही तर तो कमवावा लागतो आणि मॅडमनी त्यांच्या प्रेमळ स्वभावाने एवढी माणसं आणि एवढा सन्मान कमावला होता की आजही मॅडमचं नाव महाविद्यालयात निघालं तरी मॅडमविषयी आदरपूर्वकचं बोल ऐकायला मिळतात.

असं म्हटलं जात की, व्यक्तीचं मोठेपण हे त्याच्या कृतीमधून दिसून येते आणि खरचं माझ्या मॅडम खूप-खूप मोठ्या होत्या. एक उत्तम व्यक्तिमत्त्व, उत्तम सहकारी, उत्तम नियोजक अशा विविध गोष्टींमध्ये मॅडम श्रेष्ठ होत्याचं पण ह्या सर्वांमध्ये महत्त्वपूर्ण म्हणजे एक अतिशय श्रेष्ठ आणि उत्कृष्ट अशा संस्कृतच्या विषय-शिक्षिका होत्या. खरतरं ज्ञानाचा भांडारचं होत्या मॅडम. शुद्ध, स्पष्टवाणी, विषयाची काठिण्यता समजून त्या विषयाला अतिशय सोप्या पद्धतीने शिकविणे यात मॅडमचा हातखंडा होता आणि म्हणूनच आम्हांलाही कधीचं दर्शन, व्याकरण, तत्त्वज्ञान यांसारखे विषय अवघड वाटले नाहीत. माझ्या सारख्या विद्यार्थिनीला तर दोन वर्षे संस्कृत विषय नसतानाही त्या विषयात सलग तीन वर्षे प्रथम येणे आणि त्या विषयाची रुची निर्माण होणे हे केवळ मॅडममुळेच साध्य झाले. असे म्हटले जाते की गुरु हे शिष्याचे परम् मित्र असतात परंतु मैत्रीपेक्षा आम्हांला मॅडममध्ये "आईची" अनुभूती जास्त मिळायची कारण शिक्षक म्हणजे केवळ अध्यापन करणे एवढेच नसून जशी एखादी आई मुलीला कोणत्या गोष्टी कराव्या आणि कोणत्या करू नये,



हे सविस्तर सांगते तशा साऱ्या गोष्टी आम्हांस मॅडम सांगायच्या आणि त्यामुळेच कदाचित आमच्याकडून मॅडमना ''मॅडम'' कमी आणि ''आई" असं जास्त संबोधल जायचं.

शिक्षक किती निस्वार्थी वृत्तीने आपले काम करतात याची प्रचिती आम्हांला शेवटच्या वर्षी आली. आमचं शेवटचे वर्ष होते आणि त्या दरम्यानचं मॅडम खूप आजारी असायच्या. त्यांच्या पायांना एवढी सूज यायची की, त्यांना तिसरा मजला चालून येणे खूप कठीण व्हायचं. काहीवेळा त्यांच्या वेदना त्यांना खूप असह्य व्हायच्या पण तरीही त्यांच्या चेहऱ्यावर त्या वेदना कधीच प्रकट व्हायच्या नाहीत. ह्या साऱ्या वेदना त्यांनी सहन केल्या केवळ आम्हां विद्यार्थ्यांसाठी, आम्हांला घडवण्यासाठी.

बी .ए. ची पदवी पूर्ण करून आम्ही बाहेर पडलो. पदवी मिळाली म्हणजे मॅडम आणि कॉलेज सोबत संपर्क संपला असं कधीच झाले नाही. बी. ए. नंतर एम. ए. करायचा सल्ला मला मॅडमकडून मिळाला. एम. ए. ची पदवी मिळाली, विषयाचे ज्ञान मिळत होते परंतु स्वतःचा सर्वांगीण विकास आणि धाडशी वृत्तीची कमतरता स्वतःमध्ये जाणवत होती. त्यावर उपाय म्हणून मॅडमनी मला बी.एड. करायला सांगितले आणि निश्चितच त्या गोष्टीचा फायदा मला झाला. एकंदरीत जेव्हा जेव्हा आम्हांला गरज होती तेव्हा तेव्हा मॅडम एक उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून आमच्या सोबत होत्या.

"संस्काराचे सामर्थ्य माणसाला जीवन जगण्याची सुंदरता बहाल करते", या विचारसरणीचे पाईक होऊन सुसंस्कारशील व्यक्तिमत्त्व असलेल्या आमच्या प्रा. डॉ. एस. एस. राजेभोंसले मॅडम यांनी "संस्कार हाच उत्तम जीवनाचा पाया" या तत्त्वज्ञानावर प्रचंड निष्ठा ठेवून काम करणे, हे व्रत आयुष्यभर जोपासले. विद्यार्थी या नात्याने आम्हांला घडवण्याचं आणि आमच्यात त्या संस्कारांचे बीजारोपण करण्याच काम करून खरचं मॅडमनी आम्हांस परिपूर्ण केले.

मॅडमचे आदर्श विचार, त्यांचे संस्कार याचं प्रतिबिंब आणि उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची मुले. मॅडमची छवी मॅडमच्या मुलांमध्ये पाहायला मिळते. विद्यार्थ्यांवर जेवढं प्रेम मॅडम करायच्या तेवढच प्रेम मयूरा मॅडम ही करतात. एका नामवंत शिक्षिकेची कन्या असूनही आपल्या आईने त्यांच्यावर केलेल्या संस्कारांवर आजही कोणी प्रश्नचिह्न करू शकले नाही. मयूरा मॅडमनी त्यांना मिळालेली संस्कारांची शिदोरी आमच्या पर्यंत पोहोचवून खरचं आम्हांला कृतार्थ केले. मुली ह्या आपल्या आई–वडिलांच्या खूप जवळ असतात. भावनिक दृष्ट्या त्या आपल्या आई – वडिलांशी खूप जोडलेल्या असतात. मयूरा मॅडमचे ही राजेभोंसले मॅडमवर खूप प्रेम होते. त्यांच्या प्रेमाची तुलना कोणासोबत होणारचं नाही पण तरीही मयूरा मॅडमप्रमाणे राजेभोंसले मॅडमवर निस्सीम



प्रेम कोणी केलं असेल तर ते आहेत राजदीप सर ! आजवर श्रावण बाळाची कथा फक्त ऐकली आहे परंतु खरा 'श्रावण- बाळ' आम्ही प्रत्यक्षात राजदीप सरांच्यामधून पाहिला. आजकालच्या युगात आईवर एवढं प्रेम करणारा आणि आईची अपार सेवा करणारा मुलगा क्वचितच पाहायला मिळतो.

आई–वडिलांना सर्वस्व मानून त्यांना परमेश्वराचे स्थान देणे हे राजेभोंसले मॅडमचे संस्कारच त्यांच्या मुलांमध्ये उतरले होते. श्री समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे की, **"जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी शिकवावे, शहाणे करून सोडावे, सकल जन!"**ह्या वचनाप्रमाणे नेहमी आचरण करणाऱ्या मॅडम नेहमी इतरांना ज्ञानरूपी अमृताने परिपूर्ण करत राहिल्या.

मॅडम आमच्यासाठी शिक्षक नव्हे गुरूचं, गुरु नव्हे गुरुमाऊलीचं त्या ! आमच्या डोक्यावर सरस्वतीचा वरदहस्त ठेवून आमचे जीवन घडवणाऱ्या गुरूंना शतशः नमन !!

खरचं "भाग्ये आम्हा ऐसे गुरु लाभले. तस्मै श्री गुरवे नमः"

अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया ।
चक्ष्युरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः ॥





माझ्या आठवणीतल्या वीणा आत्या

श्री. सुधीर दिलीप सस्ते,
मु. पो. साकुर्डे ता. पुरंदर जि. पुणे

साधारण पंचवीस वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणपूर येथे माझ्या आयुष्यातील पहिल्या वहिल्या संस्कार शिबिराला जाण्याचा योग आला होता. संस्कार शिबिर हे सात दिवसांसाठी आयोजित करण्यात आले होते.

मुळात माझे वडील श्री. दिलीप काका हे श्री सद्गुरूआण्णा महाराज यांचे शिष्य. माझे वडील म्हणजे कडक स्वभाव आणि शिस्त प्रिय त्यामुळे आमच्यात संस्काराचे बीज अगोदरच रुजले होते पण त्या संस्काररुपी रोपट्याला संस्कारित करून व्यवस्थित वाढविण्याचे काम केले त्या म्हणजे आमच्या वीणा आत्यांनी.

आत्या म्हणजे साक्षात् सरस्वतीचे रूप ! त्यांची वाणी म्हणजे अमोघ ! स्वतः सरस्वती त्यांच्या मुखातून बोलत आहेत असा भास ! भास म्हणजे काय साक्षात् सरस्वतीच त्यांच्या मुखातून बोलत होती. त्यांच्या वाणीत असणारी संस्कृत भाषेतील पकड हि विलक्षण प्रभुत्व दाखवत होती. त्यांच्या चेहऱ्यावरचे सात्विक तेज म्हणजे साक्षात् ममतेचे, मायेचे (मातेस्वरूप प्रेमाचे) अन् उदार अंत:करणाचे विश्वरुप !

मला अजुन सुद्धा त्यांची आठवण आली की, ती शिबिरातली रम्य झुंझुमुंझु पहाटेची आठवण येते. सकाळी येणारा दिलीप काकांचा आवाज. चला लवकर उठा, सर्वांना आदेश युक्त प्रेमाचा आवाज ऐकला रे- ऐकला की ,सर्वच्या सर्व एका आवाजात उठून थेट पाण्याच्या टाकी खाली आंघोळीला. आंघोळ उरकली की सर्व चहा पिऊन लगेच सूर्यनमस्काराला.

सूर्यनमस्कारचे व्यायामाचे प्रात्यक्षिक देवआजोबा स्वत: करुन दाखवत. त्याबरोबरच वीणा आत्यांच्याकडून सूर्य नमस्काराचे श्लोक सूर्यदेवांच्या बारा नामांसहित. आमचे शिबिरार्थींचे सूर्य नमस्कार पूर्ण होत असत आणि त्या नंतर श्लोक, नामस्मरण, ध्यानधारणा हे वीणा आत्यां आम्हां सर्वांकडून करवून घेत असत. ह्या मध्ये नाष्ट्याची वेळ झालेली सुद्धा आम्हाला कळत नसे. म्हणजे इतके आम्ही एकाग्र होत असत. तदनंतर सद्गुरू आण्णा माउलींचे आणि वीणा आत्यांचे संस्कार मार्गदर्शन होत असे. ह्यामधे शिबीराचे सात दिवस कसे जात होते, ते सुद्धा आम्हांला कळत नसे. सतत आम्हाला वाटे की, हे संस्कार शिबिर संपूच नये.



असो शेवटी त्या आठवणी, आठवणी म्हणण्यापेक्षा ते मार्गदर्शन आम्हांला आमच्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर योग्य विचारांची वाट दाखवतात. वीणा आत्यांच्याबद्दल किती सांगावं तेवढे कमीच. शिबिरानंतर सुद्धा ब-याच वेळा आत्यांचा संपर्क असायचा तेंव्हा देखील त्यांच्या अमोघ वाणीचा अमृतानुभव वेगळ्याच सात्त्विक भावविश्वात घेऊन जायचा.

अशा माझ्या आठवणीतल्या प्रेमळ वीणा आत्या ! अत्यंत विद्वान अशा आत्या ! आठवणी स्वरुप तुमचं अस्तित्व अजूनही टिकून आहे. आत्या ! तुम्ही अमर आहात, तुमच्या विचारांनी, तुम्ही घडवलेल्या संस्कारानी आमच्या हृदयात तुमचे अढळ स्थान आहे.

अशा वंदनीय वीणा आत्या आपणांस त्रिवार वंदन !!!





माझ्या वंदनीय संस्कृत गुरु
श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले मॅडम

श्रीमती स्वप्नाली रामचंद्र करांडे - गौंड
वरिष्ठ-लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

एक चांगला शिक्षक आशा जागृत करुन कल्पनेला प्रज्वलीत करु शकतो. " अगदी तशाच माझ्या गुरु राजेभोंसले मॅडम होत्या. मॅडमचा आणि माझा प्रथम संपर्क कॉलेजच्या पहिल्या वर्षाला आला. त्यांचे ते अफाट ज्ञानसागरातून आलेले विचार, शब्द तसेच त्यांच्या शब्दांतून जणू **आई सरस्वतीच** बोलते असे वाटत होते. त्यांचे लेक्चर सुरु झाले की, संपूच नये असे वाटायचे. पण मधेच बेल व्हायची आणि उद्या मॅडम पुढे काय शिकवणार याची उत्सुकता लागायची. अशाप्रकारे मला प्रथम न आवडणा-या व अवघड अशा संस्कृत विषयाबाबत आवड निर्माण झाली आणि मग त्या विषयातच मी बी. ए. ची पदवी घेतली. खरतरं मला संस्कृत शिक्षिका व्हायचे होते. परंतु ही माझी इच्छा अपूर्णच राहीली.

" होता गुरुचरणाचे दर्शन, मिळे आनंदाचे अंदन "

ही पंक्ती आमच्या राजेभोंसले मॅडमना अगदी लागू होती. मॅडमनी खुप संघर्षमय स्थितीत त्यांचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या होत्या. त्यांनी संस्कृतमधील ज्ञानाचा भांडार आम्हांस दिला. मॅडमनी कधीही घाईत अभ्यासक्रम संपवला नाही. तर विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम पूर्ण समजला आहे का, याची खात्री करुनच पुढील पाठ शिकवले. कधी कधी तब्येत बरी नसतानाही सुट्टीत जादा तास घेतले होते. आमच्या शेवटच्या वर्षी गीतेचे अध्याय अभ्यासक्रमात होते. तेव्हा तर मॅडम ज्याप्रमाणे ते गीतेचे सारआम्हांस समजून सांगायचे की, जणू आम्ही आत्तांच्या जगात नसून त्या ऐतिहासिक, पौराणिक काळातच असल्याचे भासायचे.

मॅडमना त्यांचे कारकीर्दित अनेक पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यातील मानाचा " महाराष्ट्र शासनाचा महाकविकालिदास संस्कृतसाधना पुरस्कार" त्यांना मिळाला होता. ही आमच्यासाठी व कॉलेजासाठी अभिमानाची गोष्ट होती. कारण आमच्या महाविद्यालयाला परत अशी शिक्षिका होणे पुन्हा होणे नाही.

अशा या मातृतुल्य गुरुस माझे कोटी कोटी प्रणाम ||





स्थितप्रज्ञः प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे

श्री. डॉ. नीलेश जोशी



नत्वा सुहासिनीं देवीं शान्तांसौम्यां कराम्यहम्।
उपकृतार्थत्वमाप्त्यैलघुसंस्मृत्यपोर्णुतिम्।।

एप्रिल २००६ मध्ये मी एम . ए. संस्कृत झालो आणि पुढे पीएच. डी. करण्याचा विचार पक्का झाला. वैदिक व्याकरणावर संशोधन करायचे हे निश्चित होते. आता फक्त मार्गदर्शक शोधायचा होता आणि त्यासाठी माझा प्रवास सुरु झाला. सर्व प्रथम व्याकरण विदुषी डॉ. सरोजा भाटे यांच्याशी डॉ. अंजली पर्वते यांच्या मदतीने संपर्क साधला. त्यावेळी त्या भांडारकरमध्ये चेअरमन होत्या. पण नुकतेच त्यांनी ते पद सोडले होते आणि पुणे विद्यापीठात अन्य कोणाकडे पीएच. डी. करणे शक्य नव्हते. त्यांनी मला शिवाजी विद्यापीठातूनच पीएच. डी. करण्याचा सल्ला दिला आणि मी डॉ. राजेभोंसले मॅडमना पहिंल्यादा भेटलो. यापूर्वी मी त्यांच्या विषयी ऐकून होतो पण त्यांना भेटण्याचा कधी प्रसंग आला नाही.

अत्यंत शांत व्यक्तिमत्त्व ज्यांच्या समोर केवळ बसता क्षणी मन अत्यंत शांत झालं. जे मनात चाललेले अनेक सैरभर विचार जणू एक मार्गी होऊन शांत झाले. त्यांनी माझी अत्यंत आस्थेने चौकशी केली. माझा बनारस येथे झालेल्या वैदिक व्याकरणाचा अभ्यास जाणून घेऊन "आपण या विषयावर निश्चित काम करूयात" असे सांगून मला आश्वस्त केले. येथून माझा पीएच. डी. चा प्रवास सुरु झाला, त्यात अनेक अडथळे होते. जसे वैदिक स्वरांच्या खुणा हा सर्वात अवघड प्रश्न जो सोडवण्यासाठी त्यांनी वैदिक संशोधन मंडळाच्या डॉ. पाटस्कर यांच्याशी चर्चा करून कोणता फॉण्ट वापरायचा वगैरे माहिती सहज उपलब्ध करून दिली.

पुढे अनेकदा त्यांच्या घरी येणे जाणे सुरु झाले आणि नकळत मी कधी त्यांच्या घराचा सभासद झालो ते मलाच कळले नाही. आमची सर्व विषयांवर चर्चा होत असे, एकदा कुतूहलाने पण मला त्यांची कुंडली बघण्याचा योग्य आला आणि राजयोगाची पहिली कुंडली मी पाहिली. एकदा मनात विचार आला होता. याच विषयावर आपण लिहूयात पण त्यांच्यासाठी बरचं काही करण्याचा मानस असल्याने हा विषय राखीव ठेवला आहे.

आवर्जून लक्षात राहतील असे काही प्रसंग माझ्या आयुष्यात घडले ते असे - त्यावेळी मी विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे कार्यरत होतो, अचानक मॅडमचा फोन आला की, तुम्ही लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात माझ्या बरोबर काम कराल का ? ही खूप मोठी गोष्ट होती. ज्या महाविद्यालयात डॉ. आ. ह. साळुंखे आणि स्वतः डॉ. राजेभोंसले यासारख्या मंडळींचे योगदान आहे. ज्यांचे विद्यार्थी आज महाराष्ट्रातील अन्य महाविद्यालयातून संस्कृत अध्यापनाची धुरा सांभाळीत आहेत, त्यांच्या बरोबर सहकारी म्हणून काम करायचं !! खरचं खूप मोठी बाब !! आणि तितकीच जबाबदारीची देखील !! पण मॅडममुळे सहज संभव झाली आणि मी लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात रुजू झालो. हा क्षण खूप महत्त्वाचा ठरला. पुढे माझ्या आयुष्यात प्रगतीची नवी कवाडे उघडण्याची सुरुवात होती ही !!

एके दिवशी मी ग्रंथालयात होतो. प्रा. मेस्त्री सर तेथे होते आणि मी इंटरनेटवर माझा नेट परीक्षेचा निकाल पाहत होतो. काय आश्चर्य ! मी नेट परीक्षा उत्तीर्ण झालो होतो, मला तर विश्वास बसत नव्हता, पण हे खरं !! प्रा. मेस्त्री सर खूप खूष झाले आणि त्यांनी राजेभोंसले मॅडमना ही बातमी सांगितली आणि अहो आश्चर्य !! आपलं मूल काही तरी आगळीक करून यावं तसा आनंद त्यांना झाला नि कसलाही विचार न करता मला म्हणाल्या, "नीलेश ! हे ५०० रु. घ्या, ताबडतोब पेढे घेऊन या, गोड बातमी अशी कधी द्यायची असते का ?" मला काही सूचत नव्हतं, लोक आपल्याकडे पेढे मागतात; पण फक्त आईच असू शकते, जी आपल्या बाळाला असं सांगू शकते. आणि त्यानंतर विचारू नका. त्यांनी ही बातमी सर्वांना सांगितली, हे कौतुक किती दिवस चालू होत काय सांगू ! सर्व वृत्तपत्रांसाठी त्यांनी बातमी तयार केली, ती छापून येईपर्यंत तिचा पाठपुरावा केला.

पुढे तर खूप महत्त्वाची भूमिका त्यांनी बजावली ती म्हणजे डिसेंबर २०१० रोजी मी प्रबंध विद्यापीठात सादर केला; पण २०१२ उजाडले तरी त्यावर मान्यवरांच्या परीक्षकांच्या प्रतिक्रिया आल्या नाहीत. या दरम्यान त्यांची प्रकृती बरीच ढासळली होती, पण तशा अवस्थेत त्यांनी प्रा. मल्हार कुलकर्णी IIT मुंबई यांच्याशी संपर्क साधून viva voce निश्चित केली आणि ऑगस्ट २०१३ रोजी मला पीएच. डी. मिळाली आणि नोव्हेंबर २०१३ रोजी IIT मुंबई मध्ये वरिष्ठ भाषाशास्त्रज्ञ म्हणून हजर झालो. तेव्हापासून भाषा आणि प्रौद्योगिकी तंत्रज्ञान यामध्ये बरेच कार्य करीत नावलौकिक मिळवत आहे. पण हे केवळ राजेभोंसले मॅडमच्या आशीर्वादाने !!

दरम्यानच्या काळात मुंबई ते दिल्ली बदली झाली नि मॅडमशी संपर्क सुटला आणि ती अत्यंत दुःखद घटना घडली. माझ्या मनात खंत राहून गेली की मी त्यांचे अंतिम दर्शन देखील



घेऊ शकलो नाही आणि म्हणूनच ठरवलं काही तरी करायचं नि हा सर्व प्रपंच मयूरा दीदींच्या सहकार्याने उभारला. त्या स्थितप्रज्ञ माऊलीचा जीवनपट मांडून कुठेतरी उतराई होण्याचा !!

त्या आज असत्या तर त्यांनी असं काही करू दिलं नसतं किंबहुना याहून काहीतरी वेगळं करवून घेतलं असतं !! कारण त्या कोणतीही आशा, अभिलाषा नसलेल्या, सदा तृप्त असून सुख व दु:ख यांमुळे आनंद किंवा उद्वेग नसलेल्या, आत्मबोधाने सदा संतुष्ट अशा होत्या. हीच सारी लक्षणे ज्ञानेश्वरीमध्ये दुसऱ्या अध्यायात सविस्तर वर्णन केली आहेत ती अशी -

म्हणे अर्जुना परियेसीं | जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं | तो अंतराय स्वसुखेंसीं | करीतु असे || २९१||
जो सर्वदा नित्यतृप्तु | अंतःकरण भरितु | परी विषयामाजीं पतितु | जेणें संगें कीजे || २९२||
तो कामु सर्वथा जाये | जयाचें आत्मतोषीं मन राहे | तोचि स्थितप्रज्ञु होये | पुरुष जाणैं || २९३||
नाना दुःखीं प्राप्तीं | जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं | आणि सुखाचिया आर्ती | अडपैजेना || २९४||
अर्जुना तयाच्या ठायीं | कामक्रोधु सहजें नाहीं | आणि भयातें नेणें कहीं | परिपूर्णु तो || २९५||
ऐसा जो निरवधि | तो जाण पां स्थिरबुद्धि | जो निरसूनि उपाधि | भेदरहितु || २९६||
जो सर्वत्र सदा सरिसा | परिपूर्णु चंद्रु कां जैसा | अधमोत्तम प्रकाशा- | माजीं न म्हणे || २९७||
ऐसी अनवच्छिन्न समता | भूतमात्रीं सदयता | आणि पालटू नाहीं चित्ता | कवणें वेळे || २९८||
गोमटें कांहीं पावे | तरी संतोषें तेणें नाभिभवे | जो वोखटेनि नागवे | विषादासी || २९९||
ऐसा हरिखशोकरहितु | जो आत्मबोधभरितु | तो जाण पां प्रज्ञायुक्तु | धनुर्धरा || ३००||
कां कूर्म जियापरी | उवाइला अवेव पसरी | ना तरी इच्छावशें आवरी | आपुले आपण || ३०१||
तैसीं इंद्रियें आपैतीं होती | जयाचें म्हणीतलें करिती | तयाची प्रज्ञा जाण स्थिति | पातली असे || ३०२||

ही श्री भगवान श्रीकृष्णाने सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणे, जी ज्ञानेश्वर माऊलींनी विस्ताराने जणू मॅडमसाठीच वर्णिली आहेत की काय अस या सर्व **"ज्ञानज्योती तपोयोगिनी"** समरणिकेतील लेख वाचताना आपणांस प्रकर्षाने जाणवेल नि निश्चय होईल की,

स्थितप्रज्ञ : प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे !!





फिरूनी नवी जन्मेन मी....

सौ. रेशमा दानी-काळे देशमुख
एम. ए., बी. एड., शिक्षिका, पुणे



फिरूनी नवी जन्मेन मी
माझ्याच आईच्या उदरी!

आईचा जन्म २ नोव्हेंबर १९५५ रोजी दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी झाला. त्यांचे वडील बंधु कै. श्री. विजय चौहाण यांच्याहून आई १३ वर्षाहून लहान. ज्या दिवशी आईचा जन्म झाला त्याचदिवशी कै. हिम्मतबहादूर विष्णूपंत चौहाण म्हणजेच आईचे वडील माझे आजोबा यांना लॉटरीचे तिकिट लागले, त्यांना इतका आनंद झाला की, 'अरे माझ्या घरी लक्ष्मीचाच जन्म झाला, असे सर्वांना सांगू लागले. माझे आजोबा संत मेहेरबाबांकडे जात असत. त्यावेळी त्यांनी बाबांना विचारले बाळाचे म्हणजेच आईचे नाव काय ठेवायचे ? तेव्हा मेहेरबाबांनी मौनव्रत घेतले होते. त्यांनी वीणा वाजवून दाखविली व आईचे नाव 'मेहेरवीणा' ठेवण्यात आले. नावाप्रमाणेच अत्यंत मधूर असलेल्या आमच्या आई ! **त्यांच्या ठिकाणी सरस्वती व लक्ष्मी यांचा सुंदर मिलाफ होता.**

माझ्या आई या सगळया जगापेक्षा वेगळया होत्या, असे मला वाटते. 'आ' म्हणजे आत्मा, 'ई' म्हणजे ईश्वर हे सर्वश्रूतच आहे. पण खरोखरच ईश्वर पाहायचा असेल तर तो फक्त आईमध्येच. श्यामची आईने जशी संस्काराची मूल्यांची बीजे रोवली, जसे राजमाता जिजामातांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविताना हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि सत्यातही उतरवले. त्याचप्रमाणे आमच्या आई, ज्यांच्या स्वकर्तृत्त्वाने इतिहासात एक सोनेरी पान लिहिले गेले, असे मला वाटते.

भूतकाळ कसा लक्षात ठेवावा. वर्तमानकाळात कसे जगावे. भविष्यकाळ आपल्या हातात कसा असतो, हे आई बऱ्याच वेळा आम्हांला सांगायच्या. मला म्हणायच्या,"दीदी काळाच्या चक्रारपंक्ति हया कधीही स्थिर नसतात त्या सतत बदलत असतात. त्याप्रमाणे जगता यायला पाहिजे. पण आपल्या मूल्यांची पायमल्ली होणार नाही ना याची काळजी घ्यावी.. "!

लहान वयातच आईनी 'संस्कृतमधील राजा शिवछत्रपती' या विषयावर पीएच. डी.



पदवी पूर्ण केली. पीएच. डी. करताना येणाऱ्या प्रत्येक संकटाना तोंड दिले. परिस्थिती तितकीशी अनुकूल नव्हती पण आईच्या मनामध्ये जिद्द होती. महत्वकांक्षा होती. ती त्यांनी पूर्ण केली. पुरूषसुद्धा एवढं कर्तुत्त्व करणार नाही. एवढया जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या, 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हे आमच्या आईचे द्योतक होते. कधी कशाबद्दल गर्व नव्हता. त्यांच्या प्रत्येक शब्द सुवर्णासारखा असायचा. आईचा स्वाभिमान तो म्हणजे संस्काराचा, सदाचारांचा, नीतीचा, विवेकबुद्धीचा आणि सत्याचारणाचा !

आता आईच्या आठवणी सांगताना, एकेका प्रसंगाला धीराने कसे तोंड दिले, हे आठविताना माझे शब्द अपूरे पडतील. त्यांच्या ज्ञानापुढे समुद्राची खोली कमी पडेल. त्यांच्या सदाचारापुढे तसेच आमच्यावर व समाजावर केलेल्या प्रेमापुढे आकाशाची व्याप्ती कमी पडेल. आज त्या जगात नाहीत पण त्यांच्या कर्तुत्त्वाचा सुगंध मात्र चौफेर पसरलेला आहे. चंदनासारख्या त्या झिजत राहिल्या. असे म्हटले जाते, सोने तयार होताना त्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागते, घर्षण होते, जाळले जाते. त्याच्यावर घाव घातले जातात त्यानंतर त्यातून अलंकार घडतो. त्याचप्रमाणे आमच्या आईचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडले. जीवनात येणारी संकटें, संघर्ष, परीक्षा यांचे समीकरण ठरलेले होते आणि सगळयांतून त्या पार पाडत होत्या. यशस्वी होत होत्या.

आईकडे दांडगा आत्मविश्वास, सत्यता, प्रामाणिकपणा, धैर्यवृत्ती, खंबीरपणा, टापटीपपणा होता .**'मूर्ती लहान पण कीर्ती महान'** असे अत्यंत लाघवी सुंदर व्यक्तिमत्त्व होते. **लाथ मारेन तिथे पाणी काढेन,** असे त्यांचे कर्तृत्त्व होते. आई म्हणजे हसतमुख व्यक्तिमत्त्व. आवाजात असणारे माधुर्य, भाषण देताना शब्दांना असणारी तेजस्वी धार, कधी कोणाचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी, कामाच्या ठिकाणी असणारी निष्ठा, आत्मीयता या सर्व गुणांची रत्नमाला म्हणजे आई.

छोटया-मोठया गोष्टीतून आईंनी आम्हांला बऱ्याच गोष्टींचे ज्ञान दिले. मला आठवते दारात आलेल्या संन्याशाला आपल्या बोटातील सोन्याची अंगठीसुध्दा त्यांनी दान केली होती. मी आईंना म्हटले, अहो आई तुम्ही सोनेसुद्धा दान केले ! साधु संन्यासाला कशाला हवे सोने ? आई म्हणाल्या, परमेश्वर माझी पण परीक्षा पाहत असेल की , मला कोणता मोह आहे की नाही. खरेतरं त्या लहान वयात मला हे शब्द समजले नाही. पण जीवनात कोणत्याही गोष्टींची लालसा करू नये, या गोष्टी क्षणभंगूर असतात. ही गोष्ट त्यांनी मला समजावून सांगितली.

'कर्मण्येवाधिकारस्तु मा फलेषु कदाचन'



अशा आमच्या समाधानी आई. ज्यांनी आयुष्यभर भगवद्गीता शिकवली आणि ती आचरणात सुद्धा आणली. प्रत्येक कर्म त्या परमेश्वराला वाहत. कोणत्याही कर्माबद्दल त्यांना आसक्ती नव्हती.

आईची सकाळची सुरूवात पवित्र मंत्रापासून व्हायची. आम्ही साखर झोपेत असायचो. सकाळी-सकाळी असे वाटायचे की, आता ३३ कोटी देव इथेच अवतरतील. सकाळी उठल्या पासून रात्री झोपेपर्यंत त्यांचे कार्य अखंड चालू असायचे. आजकाल आपल्याला मन एकाग्र करण्यासाठी क्लास लावायला लागतात. पण घरातील वा बाहेरील कोणतेही काम असो त्या फार मन लावून करीत असे.

एवढी मोठी विद्वान व्यक्ती पण घरातील सगळी कामे त्या स्वत: करीत. घर झाडताना त्या इतके स्वच्छ घ्यायच्या. मी आईना म्हणायचे, अहो आई, 'घर खूप स्वच्छ झाले.' तेव्हा त्या म्हणायच्या, अहो, ‘पाय फरशीवर घासून पहा; पायाला घाण तर लागत नाही ना !' बेडसीटला एकही सुरकुती पडलेली आवडायची नाही. कपडे इतके स्वच्छ व ताठ असायचे की इस्त्रीची गरजच त्यांना भासत नसे. "कपडयावरची घाण व मनातील घाण विचार "हे नेहमी झटकून टाकावे. वाईट विचारांना थारा देऊ नये, ही शिकवण त्यामागे होती. आई स्वयंपाक फार सुंदर करायच्या. माणसाने तृप्तीचा ढेकर दयावा असे त्यांचे भोजन असे.

आमच्या घरी खूप विद्यार्थ्यांची ये-जा असे. प्रत्येक विद्यार्थ्याला तन्मयतेने शिकवायच्या. बाहेर गावाहून येणाऱ्या मुलांची तर आई आत्मीयतेने चौकशी करायच्या. आमच्याबरोबर त्यांना खाऊ घालायच्या. योगायोगाची गोष्ट म्हणजे आम्ही दोघी बहिणींनासुद्धा आईनीच संस्कृत शिकवले. म्हणजे आमच्या गुरूसुद्धा आईच होत्या. आई जेव्हा उपनिषद, वैदिक वाङ्मय, भगवद्गीता शिकवायच्या तेव्हा अक्षरक्ष: असे वाटायचे की, माता सरस्वती आपल्याशी बोलत आहे. कित्येक कच्च्या मडक्यांना आकार देऊन त्यांनी पक्की मडकी बनविली, याला सुमारच नाही. **'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे,** अशा आमच्या आई ! आपल्या ज्ञानाने विद्याथ्यांची झोळी भरेल एवढे ज्ञान त्यांच्याकडे होते.

आईची स्मरणशक्ती खूप प्रगल्भ होती. कोठे काय ठेवले आहे. कोणत्या पुस्तकातील ओळ, कोणती पुराणकालीन कथा असो वा वाङ्मयीन गोष्टी असो त्या त्यांना मुखोद्गत होत्या. आज आम्हांला गुगलला भेट दयायला लागते. पण आमच्या आई म्हणजे चालत्या-बोलत्या डिक्शनरीच होत्या.

आमच्या घरी येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांचा राबता असायचा. आईना १९८६ रोजी



पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यांचे सासरे कै. शंकरराव यशवंतराव राजेभोसले (राजाज्ञे) हयांनी खूप पाठींबा दिला. माझ्या वडिलांचाही त्यांना पाठींबा होता. माझे आबा (आजोबा) आईना तिसरा मुलगाच मानायचे. आईचे सासरी नाव 'सुहासिनी' होते. कारण त्यांचे हास्य निखळ होते. सुहास्यवदना म्हणून सुहासिनीदेवी असे म्हणायचे. पण आमचे आबा (म्हणजे माझे आजोबा) त्यांना वीणाच म्हणायचे. ज्यावर्षी त्यांना पीएच. डी. प्राप्त झाली त्याचवर्षी आमच्या वडिलांचे व आजोबांचे निधन झाले. हा सुखद सोहळा पाहण्यासाठी ते मात्र राहिले नाही. डोंगराएवढया संकटांना पार करीत आईंनी आम्हांला लहानाचे मोठे केले. कोणतीही उणीव त्यांनी पडू दिली नाही.

आईचे मन सांसारिक गोष्टीत कधी रमलेच नाही. त्या फक्त आमच्यासाठी जगत होत्या. मी आईंना म्हणायचे,'आई देव प्रसन्न झाल्यावर तुम्ही काय मागाल ?' तेव्हा आई म्हणायच्या,' मी काही मागणार नाही पण कुंतीसारखे दुःख मागेन'. मी विचारले का? तेव्हा त्या म्हणाल्या, 'ज्याप्रमाणे श्रीकृष्ण सदैव कुंतीच्या बरोबर होते त्याचप्रमाणे परमेश्वराचे सानिध्य आपल्याल्या लाभते'. मनुष्याला वेळेला अन्न मिळाले म्हणजे बस्स !

आईचे अक्षर म्हणजे मोत्यांचा टपोरा दाणा. इतके सुंदर सुवाच्य की, वाचणारी व्यक्ती त्या अक्षरांच्या प्रेमात पडेल. आईच काम फार चोख असायचे. कोणालाही बोलायला त्या जागा ठेवत नसत. आईच्या स्वभावामुळे त्यांना 'अजातशत्रू' असे म्हणायचे .**'संथ वाहते कृष्णामाई'** असेही आईना म्हणायचे. सतत वाहत राहणे. सतत त्यांनी स्वतःला कामात गुंतून घेतलेले होते. 'जो थांबला तो संपला' असे आई म्हणायच्या. त्यामुळे तुम्ही सदैव कार्यरत रहा, कितीही संकटे आली तरी घाबरायचे नाही. आपण आपले काम प्रामाणिकपणे करावे.

आईनी अनेक कामे केली. त्यांनी दत्त सेवेत स्वतःला अर्पण करून घेतले होते. कित्येक पुस्तके लिहिली, संस्कार-शिबीरे घेतली, समाज-प्रबोधन पर व्याख्याने दिली. पण कुठेही आपल्या नावाचा उल्लेख त्यांनी केला नव्हता. पैसा कमवण्यासाठी त्यांनी कधीच कामे केली नाहीत. निस्वार्थ-बुद्धी, त्याग, भक्ती यांचे समीकरण म्हणजे आमच्या आई.

'ऐक्य' या वर्तमानपत्रात संशोधनपर 'संस्कृतमधील राजा शिवछत्रपती' ही व्याख्यानमाला सुरू केली. आई घराघरात त्यांच्या व्याख्यानमालेद्वारे पोहोचल्या होत्या. त्यांच्या कीर्तीचा ध्वज सातासमुद्रापार सुद्धा पोहोचला होता. इंग्लड, अमेरिका या पुस्तकात सुद्धा आईचे नाव आहे. **'मरावे परी कीर्तीरूपी उरावे'** असे, आई म्हणायच्या. त्याप्रमाणे त्यांनी काम केले. मला तर आठवते, आईनी कॉलेजची, पेपर तपासणी, नॅकची, पुणे, कोल्हापूर विद्यापीठाची सगळी कामे केली. विना तक्रार केली. आपल्या मुलांची हेळसांड न होता बाहेरील व घरातील सर्व



जबाबदा-या पार पाडल्या. आईकडे खूप सोशिक वृत्ती होती. या सगळया जबाबदा-या पार पाडताना त्यांच्या तब्येतीवर खूप परिणाम झाला. आयुष्यातील प्रत्येक संकटांना तोंड दिले. सहन केले. पण मधुमेहाने मात्र त्यांचा शरीर थकून गेले. स्वतःच्या आत्मिक बळावर तोंड त्यांनी खूप संकटांना तोंड दिले. त्यातुन सुध्दा त्या आनंदी असायच्या.

चि. राजदीपनी आईची खूप सेवा केली. दुसरा श्रावण बाळ म्हणजे राजदीप. मयूरांनी पण त्यांची खूप काळजी घेतली. देव काठे आहे हे मला माहीत नाही. पण माझ्यासाठी फक्त आईच परमेश्वर होत्या. **'मातृदेवो भव'** म्हणूनच आपण म्हणतो. माझी नाळ फक्त माझ्या आईशीच जोडलेली आहे. आईचे ऋण सात जन्म काय पण शंभर जन्म सुद्धा आम्ही फेडू शकणार नाही, अशा माझी देवतुल्य आई !

१६ ऑक्टोबर २०१७ हा दिवाळीतील वसुबारस दिवस आईसाठी काळरात्र ठरला.

तीन वासरांना लेकरांना या अफाट सांसारिक जगात सोडून त्या अनंतात विलीन झाल्या.

ॐ श्री मातृदेव्यै नमो नमः ।





ज्ञान, कर्म आणि भक्तिचा संगम आई -माझं दैवत



श्री. राजदीप शहाजीराव राजेभोंसले -राजाज्ञे
सातारा

'आई' माझं सार विश्व, माझं सर्वस्व ! आपल्याला जे काही प्रथम समजते ते आईंच्या पोटात.. बाहेरच्या जगाला समजत असतो ते आईं कडूनच..आपल्याला पहिला श्वास देते ती आई.. जन्म झाल्यावर जिला प्रथम पाहतो ती आई.. जो पहिला शब्द उच्चारतो तो आई.. पहिल्या प्रथम या जगाची ओळख होते तेही आईंच्या नजरेतून.. आईंच्या संस्कारातून.. आणि आज मी प्रथमच जे लिहित आहे ती व्यक्तीही आईंचं.!! माझा पहिला श्वास - माझा पहिला उच्चार- माझा पहिला शब्द-प्रपंच आईच !!! या जगात सर्वात प्रिय मला कोण असेल तर माझ्या आई ! सर्व देवांमध्येही प्रथम पूज्य कोण असेल तर माझ्या आईं ! पुण्यनगरी येथे देव हॉस्पिटलमध्ये डॉ. देवांकडे देवासारख्या जन्माला आलेल्या माझे परमदैवत त्या माझ्या आई !!

माझ्या आऊसाहेब'.. मी असेच म्हणायचो. अशा अनेक नावाने आईंना प्रेमाने बोलवायचो. माझे - त्यांचे नाते कधी गंभीर असे नव्हतेच. अगदी कधी आईं सारखे, कधी मैत्रीणी सारखे आणि नंतर ते माझ्या मुलीसारखे होते. आमच्या मिश्किल स्वभावाला अनुरूप असेच आमचे नाते होते. इतरांना कधी ते फार वेगळे वाटायचे. समजायचे नाही. चेष्टा-मस्करी, हास्य-विनोद असे वातावरण हलके cool ठेवणारे होते.

आमच्या पप्पांचाही फार थट्टेखोर आणि मिश्किल स्वभाव होता. पप्पांचे आईंवर खूप प्रेम होते. पप्पा फार धाडसी, करारी होते. "राजामाणूस" होते. त्यांचा एक दरारा होता. ते गेले तेव्हा आम्ही लहान होतो पण आई नेहमी त्यांचे रोमांचक किस्से सांगत असत. आईं-वडिलांचा 'प्राण', घराची 'शान', आईंचा' मान' आमचा 'सन्मान', बहिणींचा 'वाघ' मित्रांची 'जान' म्हणजे पप्पा !! त्यांना सगळे जण खूप घाबरत असत. आम्हांला आमचे पप्पा आईंकडूनच समजले . कारण आम्ही ते गेले तेव्हा नकळत्या वयात होतो.

माझ्या मित्रांबरोबरही आई खूप आपुलकीने, स्नेहाने वागायच्या, बोलायच्या, भेटायच्या. खूपदा या मित्र-वीरांच्या पराक्रमांना आई सांभाळून घ्यायच्या. कॉलेजमध्ये अनेकदा ॲडमिशनच्या वेळी यांच्या 'दत्तक पालक' म्हणून अनेकदा आईच फार्म भरायच्या. त्यामुळे हे मित्रही आईंना 'आईच' म्हणत असत. आईंचा स्वभावच सर्वांना आपलेसे करुन घेणारा होता.

खरतरं किती रूपांमध्ये आई मला दिसतात. आईभवानीसारख्या त्या मला वाटतात, आशीर्वाद देतात अशीच मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. 'आईजगदंबेचे' नवरात्र चालू आहे."जगत्जननीची" अनेक रूपात पूजा केली जाते. असाच जागर आमच्या आईंचा मांडला आहे असे या क्षणाला वाटतं आहे. आई एक आदर्श गुरू, एक उत्तम वक्त्या, एक प्रसिद्ध व्याख्यात्या, एक पत्रकार, एक उत्तम आयोजन, कर्तुत्त्ववान मुलगी, आदर्श सून, आदर्श माता आणि प्रेमळ आजी, असे एक अत्यंत उज्ज्वल चारित्र्यसंपन्न स्वयंपूर्ण व्यक्तिमत्त्व होत्या.

आईचा आमच्यावर खूप विश्वास होता. कोणताही छोटा-मोठा निर्णय घेताना आम्हांलाही त्यात सहभागी करत असत. माझा एकही हट्ट 'आऊंनी' पुरविला नाही असे कधीच झाले नाही. राजकुमारासारखेच त्यांनी मला वाढवले. काहीजण तर मला 'लक्ष्मीपुत्रच' म्हणत असत आणि ते खरेचं होते. कशाची म्हणून कमी पडून दिली नाही. आईंना स्वच्छता फार प्रिय होती. घाण-अस्वच्छता म्हणजे नरक म्हणायच्या. त्यामुळे. कॉलेजवरून आल्यावर त्यांचा बराचसा वेळ साफ-सफाईतच जायचा. तेच वळण आम्हांला लागले. 'मन घर आणि व्यवहार स्वच्छच असायला पाहिजे', असे त्या म्हणत. 'तशाच त्या होत्या. "मुलांना फक्त सावलीत नव्हे तर उन्हाचीही झळ बसलीच पाहिजे. नाहीतर एक उत्तम व्यक्तिमत्त्व म्हणून ते उभारणार, फुलणार नाहीत आणि त्यांचा दरवळ पसरणार नाही, असा त्यांचा विचार होता." आईंनी नेहमी घरात येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत केले. कुणालाही दुखवले नाही. मग तो अगदी शत्रू जरी असला तरी ! 'हेच खरे छत्रपतींचे संस्कार !!' तोच संस्कार आम्हांलाही दिला. तसेच घडविले. मनात तेच रुजविले.

मुलांच्यासाठी वाटेल ते कष्ट घेण्याची त्यांची तयारी असत . एकदा तर माझ्या बालहट्टापायी रात्री १२ वाजता मिठाईवाल्याला उठवून दुकान उघडवायला लावून माझ्या आवडीचा फरसाण आणून दिला होता. आज काही ऐकलेल्या ओळी आठवतात..

जगी माऊली सारखे कोण आहे ?
जिचे जन्मांतरीचे ऋण मजवरी
कसे फेडू ज्यास व्याज नाही..

आज अगदी असेच वाटते. माझ्या मनातल्या भावनांना शब्दांत उतरविल्यासारखे वाटते.

मी तसा लहानपणापासून उद्योगी ! सतत काही ना काही माझी खटपट-धडपड चालूच असायची. आई कॉलेजला गेलेल्या असायच्या. मग आम्ही मागे काही उद्योग केलेला असायचाच. कधी डोकं फोडून घे, कधी हात मोडून घे तर कधी पायात काच घुसवून स्वतःच्या हाताने काढूनही टाकलेली असायची..! आई येईपर्यंत कुणाची ना कुणाची तक्रार आलेलीच

असायची. पण आईं सगळं सांभाळून घ्यायच्या. आईं म्हणायच्या, कधी-कधी मला असे वाटते की, 'माझे बाबा, तुमचे पप्पा आणि तुम्ही एकापेक्षा एक आणि खटपटी पण माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहात. ' सतत तुम्ही एकमेकांची आठवण करून देत असता. आम्हांला आईंशिवाय दुसरे कोणीच सांभाळू शकले नाही. त्या धरणीमातेसारख्या सहनशील आणि सर्व गोष्टी पोटात घेणाऱ्या, पाठीवर टाकून पुढे जाणाऱ्या होत्या. असाच एक किस्सा आठवतो. आई एकदा दिवसभर मामांजवळ मला सोडून गेल्या होत्या . मामांचा अक्षरशः पिट्टा पडला होता. मग काय आल्यावर आईंना मामा चेष्टेने म्हणाले "आक्का, तू मला हजार रूपये दिलेस तरी मी काही तुझ्या लेकाला सांभाळू शकत नाही . तू कसे करतेस !"आणि असे बोलून खूप हसले होते. हे फक्त आईच करू शकत होत्या. त्यांच्याकडे प्रचंड सहनशक्ती होती.

शोधूनि मिळत नाही पुण्य
सेवार्थाने व्हावे धन्य
कोण आहे तुजविण अन्य
आई तुजविण जग हे शून्य........!!!!

या एका कवीच्या ओळी आठवतात. माझं हे पुण्यच की, त्यांनी मला जन्म दिला. पण आज त्या नाहीत तर साने गुरूजींसारखे मन व्याकुळ होते, सैरभैर होते. पण त्यांचे आयुष्यच प्रेरणा देते. जगण्याची उमेद देते..आयुष्याकडे सकारात्मकतेने बघण्याच्या दृष्टिकोण देते. माझ्या आईंच्या पाठिशी तरी कोण होते. गर्दीत ही त्या एकट्याच होत्या..! एकट्या लढत होत्या परिस्थितीशी !! मात्र कधी डगमगल्या नाहीत ! हरल्या नाहीत!! थांबल्या नाहीत !!! ' ***बाजीप्रभूंसारख्या आयुष्याची पावनखिंड'** लढवतं राहिल्या. पण रडल्या नाहीत. शेवटच्या क्षणापर्यंत फक्त आणि फक्त लढल्या. त्यांच्यासाठी त्यांच्या आईच प्रेरणास्थान होत्या. त्या त्यांच्यासारख्याच होत्या. आत्मसन्मानाचा स्वाभिमानाचा धडा त्यांच्या आईंनीच बालवयात शिकवला. शिक्षणाचे बिजारोपण केले.

आई खूप धाडसी आणि कष्टाळू होत्या. कितीही अपयश आले, वेळ लागला तरी त्या प्रामाणिकपणेच काम करायचे, यश मिळवायचे असे म्हणायच्या . आई लहानपणी आम्हांला कै. राजमाता सुमित्राराजे भोंसले, सातारा यांच्याकडे घेऊन जात. आपण आले पाहिजे, भेटले पाहिजे, मुलांना घेऊन येत जा, अशा पद्धतीने त्या बोलत असत. आपुलकीने प्रेमाने त्या बोलत. चौकशी करत. त्यांचे आईंवर प्रेम होते. त्यांना आईंचे कौतुक वाटत. अनेकदा त्या ऐतिहासिक संदर्भांविषयी चर्चा करत असत. माहिती घेत असत.



श्री क्षेत्र नारायणपूरच्या 'दत्त महाराजांवर' आईंची खूप श्रद्धा होती. त्यांनी प्रचंड सेवा केली. सकाळी कॉलेज करून संध्याकाळी जायच्या. तेव्हा वाहतूकीची सोय पण नव्हती. पण आई कधी-कधी गाडी नाही मिळाली तर चालत कापूरहोळ ते नारायणपूर जायच्या. तेव्हा तो भाग दाट जंगलाचा होता. हिंस्रश्वापदांची भीती असायची. पण आई न घाबरता जायच्या. प्रवास करायच्या. नेहमी त्यांच्या पाठिशी ' दत्त महाराज ' उभे असायचे. आई निडर आणि निग्रही होत्या. त्यावेळेला 'आण्णा महाराज' ज्या वेगात बोलत असत. त्याच वेगात आई लिखाण करत. अगदी डोळे मिटूनही लिहिण्याचा वेग होता. सुरूवातीची सर्व पुस्तकाचे लिखाण, छपाई, प्रसिद्धी आईंनी केली. रात्रीचा दिवस करून पुस्तक लिखाणाचे काम, वर्तमानपत्रातील लेख, क्षेत्र महात्म्य, आण्णांच्या प्रवचनांचे रेकार्डिंग यासाठी आईंनी अपार कष्ट घेतले. त्यांनीच प्रथम रेकार्डिंगला सुरूवात केली.

संस्कारशिबीरामध्ये आण्णामहाराजांचे प्रवचन आणि आईंचे व्याख्यान अशी दोन सत्रे असायची. छत्रपती शिवाजीमहाराज, उपनिषदे, वेद, पुराण, नवनाथ-चरित्र यांतील कथा सांगून अवघड तत्त्वज्ञान सोपे आणि मनोरंजक पद्धतीने कथन करून संस्कारित करत असत. त्यांचे भक्तीत मन रमायचे. कशाचीच पर्वा त्यांनी केली नाही. तो एक फार मोठा आधार होता. खूप सेवा केली. त्या सेवेत त्यांना आनंद वाटायचा. समाधान मिळायचे. तिथे वीणा ताई, वीणा आत्या म्हणून प्रसिद्ध होत्या. पत्रकार म्हणून त्यांनी खूप काम केले.

आई ज्या कार्यक्रमांचे नियोजन करायच्या ते इतके शांतपणे आणि म्हणूनच एका उच्च प्रतीचे, दर्जाचे असायचे. भव्य आणि दिव्य असे रम्य असायचे. दैदिप्यमानता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच होते. सोहळा असायचा. त्यामुळे एक उंची यायची. कार्यक्रमात कधीही कसले भांडण, रुसवे-फुगवे नसायचे.

शेवटच्या काही काळात त्या वर्षभर घरीच डायलेसिस वर होत्या. मी ते डॉक्टरांकडून शिकून करत होतो. इतका त्रास व्हायचा त्यांना पण त्या शांत राहायच्या. शेवटच्या काही दिवसांत मयूदिदिंचे लग्न झाल्यावर आम्ही दोघे असायचो. नंतर-नंतर त्यांना खूप त्रास होत होता. मला त्यांचा तो त्रास बघवत नव्हता. पण आपला कुणाला त्रास होऊ नये म्हणून त्यांनी खाणं सोडलं होतं.. जणू स्वतःहूनच मरण पत्करले. मला तर फक्त पाहूनच त्यांच्या वेदना असह्य व्हायच्या, त्या कशा सहन करायच्या, याचचं आश्चर्य वाटायचं. कुठून मिळायचे लढण्याचं बळ हेच समजत नव्हते. त्यांच्याकडूनच मला सहनशक्ती मिळाली. संयम, शांतपणा आणि धैर्य मिळाले, हे त्यांच्याकडून शिकलो. त्या गप्प पडून राहायच्या. त्यांच्या वेदना मला समजत होत्या, माझ्या मनाची घालमेल त्यांना समजत होती. आमच्यात मूक-संवाद सुरु होता. तेव्हा त्या माझ्या मुलगी झाल्या होत्या आणि आता मी त्यांच्या इच्छा पूर्ण करण्याचा, हट्ट पुरविण्याचा मनोमन प्रयत्न करत होतो.



एक क्षणभरही त्यांना- मी आणि मला-त्या सोडत नव्हत्या. त्याचे त्यांच्याच साठी वापरत होतो. यांना या वेदनेतून कसे बाहेर काढावे हेच समजत नव्हते.

मागू कुणाला आणि मागू कसा,
माझ्या मनाची व्यथा सांगू कुणा....
शरण जाऊ कुणा....???*

आईंना वाचवण्यासाठी वाटेल ते करण्याची इच्छा होती पण नियतीने तिचा डाव साधला. त्यांचे प्रेम, त्यांचा लळा, त्यांची ओढ जीवाला जाळते.. त्यांच्या इतकी संयमी स्त्री, व्यक्ती मी पाहिली नाही. आबासाहेब (आजोबा)म्हणायचे, त्याप्रमाणे माझ्या आई खरी खानदानी स्त्री होत्या. आमच्या घराण्याचे हे भाग्यच म्हणून तुम्ही आमची सून म्हणून लक्ष्मीच्या पावलांनी आलात, असे ते म्हणत.

कलह, भांडण, कटकट यांचा लवलेश त्यांच्या ठिकाणी नव्हता. अस्सल खानदानी होत्या. घराण्याच्या मर्यादेचे फार भान त्यांना होते. त्यांनी ते जीवापाड सांभाळले होते. आमच्या आबांना, पप्पांना जे आवडत नव्हते ते त्यांनी त्यांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चातही केले नाही. आबा-माँ (पप्पांचेआई-वडिल) विषयी आईंना खूप आदर, प्रेम होते. 'माँ' च्या करारी स्वभावाचे कौतुक होते. काकी, मामी, आत्या आणि मावशी किंवा इतर कुणालाही आईंनी कधीही दुखावले नाही. अनादर केला नाही. कोणाच्याही आवश्यक कार्यात जेव्हा-जेव्हा गरज असेल तेव्हा-तेव्हा आई सहकार्यासाठी निस्वार्थपणे उभ्या होत्या. येणाऱ्या प्रत्येकाचे यथोचित सन्मान केला. स्वागत केले. जेव्हा संधी मिळे तेव्हा योग्य वेळी योग्य पद्धतीने लहानांपासून मोठ्यांपर्यत प्रत्येकाला ज्याचा-त्याचा सन्मान, आदर आईंनी दिला. आमच्या आईंच्या घरात कधीच कोणाचा अपमान झाला नाही. आई इतक्या साध्या, निष्कपट, निस्वार्थी की, वेळेला को-या कागदावर सुद्धा त्यांनी सही द्यायला मागे-पुढे पाहिले नाही. सगळ्यांसाठी त्यांनी केले. त्यांनी आपली पुरस्काराची संपूर्ण रक्कम देखील महाविद्यालयास देणगी म्हणून सूपूर्त केली. सगळ्यांना खूप काही देऊनच गेल्या. त्यांची महानता, मनाचा मोठेपणा समजायला ती योग्यता हवी. घरातल्या, बाहेरच्या, जवळच्या, दूरच्या प्रत्येकासाठी आईंनी केले.

आई स्वतंत्र विचारांच्या होत्या. पुढारलेल्या विचारांच्या होत्या. पण सन्मानाचा, मर्यादेचा पदर कधी ढळला नाही. कोणत्याही परिस्थितीत स्वाभिमान न सोडण्याचा धडा त्यांनी शिकवला.. ख-या अर्थाने मी घडलो ते माझ्या आऊसाहेबांच्या शाळेतच ! जीवन जगण्याची कला Art of living शिकलो याच माझ्या सद्‌गुरुंकडे ! जीवनाचे खरे शिक्षण दिले त्या आईंच्या अनुभवसंपन्न विद्यापीठाने !

आज माझ्या दोन्ही बहिणी आईंच्या जागी आहेत. माझ्या कन्येच्या "जिजाई शिवराज्ञी " रूपात आई माझ्यापोटी आल्यात, असे मला वाटते. ज्ञान, कर्म आणि भक्तीचा संगम आईंच्या ठिकाणी होता. ***संघर्षाच्या तप्त अग्निमध्ये तापून झळाळून उठलेल्या आईंच्या जीवनाला सोन्यासारखी चकाकी, चमक आणि अमौलिकता प्राप्त झाली होती.***

आईंचे आयुष्य एखाद्या चित्रपटाच्या कथानकाला शोभेल असेच होते. माझ्या मनाची स्थिती तर अशी आहे की,

जिसने लिखा मुझे उसे किस श्याहिसे लिखु..??

भावनांना योग्य शब्दांची आणि शब्दांना समजून घ्यायला शुद्ध अंतःकरणाची गरज असते.

शब्द आणि भावना समजून घ्यायला 'अंतराची 'नव्हे तर' अंतरीची 'गरज असते

माझे दैवत - आईंच्या चरणी नतमस्तक होतो !!





Aai (Mother)

Mr. Subhash Ramchandra Ghatge (Sarkar)
Senior Engineer, Bengaluru.

(Aai) Mother is a word which fills everyone with emotions. A Mother is certainly the most important human being in everyone's life. Mother's Love for her child certainly cannot be compared with anything. Her level of forgiveness is unmatchable. A Mother is capable of forgiving any wrong doing. Mother is the most important woman in everyone's life. A mother sacrifices her happiness for her child. No one else can care for their kids the way a Mother does. A Mother is great and does not need anyone like me explaining that. Mother is a small attempt to discover the greatness of a mother.

Myself Subhash Ramchandra Ghatge (Sarkar), now Husband of Mayura Shahajirao Rajebhonsale (Rajadyne) and Son in law of Mrs. Dr. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale (Rajadyne).

You may wonder why I'm saying these things, I'm talking about the person I meet for the first time to Mrs. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale (Rajadyne) on the occasion to see her daughter and make her my life partner, I never felt like that I'm meeting for the first time, I felt like I know this family for a long time before. All were so familiar.

I feel like I'm very much blessed that I got two mothers in my life one who gave me birth and other My Mother in law Dr. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale (Rajadyne) who gave her loving daughter to me, First time when I saw my mother in law I could notice that she was the person with a few words and a kind heart.

After My marriage with Mayura I visited several places in satara, meet her family, friends and colleagues. I went to her collage and meet many people,

everyone was praising her and saying lots good words about her and her struggle of life, how she studied and brought up her children's in life. After my marriage I went for the first time to my mother in laws house as she was not well but still she used to sit with me and we used to chat for some time, she used to tell me her experiences of her life that how she struggled and completed her studies and brought up her kids and how she travelled to Narayanpur and meet Anna Maharaj and sat with them used to write several books which Anna maharaj used to narrate her. The way she was narrating the words I could see the clear picture in front of my eyes, I mean to say that her speech was that much effective and powerful that any person could get influenced.

Dr. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale was woman of wisdom, knowledge, sacrifice and Sacraments, That I can see in her Children's Reshma didi, Mayura, and Rajdeep.

I was lucky enough to serve her for some time and I was truly overwhelmed with her presence, I feel that she is with all of us with her good deeds and words that's Dr. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale (Rajadyne).





ज्ञानज्योती तपोयोगिनी: आईसाहेब

श्रीमती मयूरा सुहासिनी शहाजीराव राजभोंसले -राजाज्ञे
(एम. ए. एम. फिल. नेट. संस्कृत)



पवित्र **ॐ** इतक्या परिपूर्ण शब्दामध्ये **माँ** आणि **साई** इतक्या अर्थपूर्ण शब्दामध्ये मला माझ्या **आई** दिसतात. .'आई' या शब्दामध्ये खूप पवित्रता आहे. ज्यांनी माझ्या जीवनाला 'अर्थ ' दिला. माझ्या आई या केवळ माझ्याच नव्हे तर अनेकांच्या आई झाल्या. आईविषयी लिहिणे-बोलणे हे खरतरं खूप अवघड. अशाप्रसंगी भावनांची आणि शब्दांची गर्दी होते. त्यांचा सगळा संघर्ष-कष्ट डोळयांसमोर उभा राहतो. पण मी ते मांडू शकले नाहीतर ते न्याय्य होणार नाही. आपल्या जवळच्या व्यक्तिविषयी आपण व्यक्त होऊ शकलो नाहीतर आपल्या असण्याचा काहीच उपयोग नाही. 'आई' म्हणताच अनेक भावना उचंबळून येतात, कंठ दाटून येतो, डोळे पाण्याने भरून येतात, भावनांचे काहूर माजते ! "भावनेच्या उचंबळलेल्या सागरात माझ्या शब्दरूपी होडीला टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य त्या मातृशक्ती मध्येच आहे". मी माझ्या अल्पमतीने लिहिण्याचा छोटासा प्रयत्न त्यांच्या आशीर्वादानेच करत आहे.

या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता |
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम : ||

अभिजात खानदानी सौंदर्य म्हणजे माझ्या आई ! प्रेममयी सात्विक मूर्ती म्हणजे माझ्या आई ! वर्तनाने सत्शील, कुलीन, घरंदाज लावण्य म्हणजे माझ्या आई ! कसलाही अहंकार, बडेजावपणा, दिखाऊपणाचा लवलेशही ज्यांच्या ठिकाणी नव्हता त्या म्हणजे माझ्या आई ! माझ्या आई म्हणजे प्रसन्नतेचे- समृद्धीचे- संपन्नतेचे प्रतिक ! माझ्या आई म्हणजे साक्षात् देवी लक्ष्मीचे रूप ! ज्यांच्या ओघवती वाणीमध्ये आणि बुद्धीमध्ये माता सरस्वतीचा आविष्कार होता त्या म्हणजे माझ्या आई ! सागरासमान अमाप ' ज्ञानाचे भांडार' म्हणजे माझ्या आई ! मर्दानी झाशीच्या राणी लक्ष्मीबाईसारख्या लढवय्या म्हणजे माझ्या आई ! राजमाताजिजाऊ आईसाहेबांसारख्या कर्मयोगिणी माझ्या आई ! क्रांतीज्योती सावित्रीबाईसारख्या संघर्षाने झळाळून उठलेल्या माझ्या आई ! आकाशासमान विशाल अंत:करणाच्या, धरणीमातेसमान सोशिक-वृत्तीच्या, फुलांसारख्या कोमल मनाच्या, गंगेसारख्या पवित्र-पावनचारित्र्याच्या, चंद्रासारख्या शितल सहवास असणा-या, सूर्यासारख्या तेजस्वी कर्तव्यदक्ष, फळांसारख्या गोड रसाळ वाणीच्या ...



शक्तिस्वरूपा-बुध्दिस्वरूपा-क्षमास्वरूपा-समृध्दिस्वरूपा-ज्ञानस्वरूपा म्हणजे माझ्या आई ! अगदी जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत ज्यांच्या वाटयाला संघर्षच आला पण ज्या कधी डगमगल्या नाहीत. एखादया पहाडासारख्या सामो-या गेल्या, खंबीरपणे पाय रोवून उभ्या राहिल्या त्या म्हणजे माझ्या आई.

'सुहासिनी' हे नाव त्यांच्या स्मितहास्यावरून आमच्या वडिलांनी ठेवले होते. पण' जिजाई' असेच ते संबोधत असत. 'मेहेरवीणा' हे नाव ' पूज्य अवतार मेहेरबाबांनी 'वीणेची तार छेडून ठेवले होते. त्यांच्या जन्माआधीपासूनच त्यांच्यावर अध्यात्माचे संस्कार झाले होते. अवतार मेहेरेबाबा, अब्दुल रजाक साहेब, शंकर महाराज, नारायण महाराज, अशा अनेक साधु संतांचा, सदगुरूंचा सहवास आणि आशीर्वाद त्यांना लाभलेला होता. आईचे आई-बाबा हे अत्यंत आध्यात्मिक ताकत असे असणारे होते.

त्यांच्या बाबांना 'सार्थ तुकारामगाथा ', 'पवित्र ज्ञानेश्वरी' मुखोद्गत होती. बाबांनी तीनदा जगप्रवास केला होता. आपल्या जीवनाची अनेक वर्षे त्यांनी हिमालयात व्यतित केली होती. आईचे बाबा १४ भाषांचे जाणकार होते. ते' छ. शाहू महाराजां' बरोबर कुस्ती खेळत असत. 'लोकसंत गाडगे बाबा' यांचे त्यांच्याकडे येणे होते. ते डफळे सरकारांचे अत्यंत विश्वासू होते. कुंभार गावच्या चौहाण घराण्याचा त्यांना वारसा लाभलेला होता. आईचे 'बाबा' खूप कडक होते. त्यांच्या समोर आईशिवाय कोणच उभे राहत नसत. अशा महान पित्याची कन्या होण्याचे भाग्य त्यांना लाभलेले होते. आमच्या मामांचे आईवर निरतिशय प्रेम होते. ते म्हणायचे, तू माझी बहिण असूनही माझ्या पाठिशी भावासरखी खंबीर उभी असते. त्यांना आपल्या बहिणीचा सार्थ अभिमान वाटायचा.

लहानपणापासूनच त्यांना संस्कृत विषयाची आवड होती. अत्यंत खडतर परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. संस्कृतच्या अभ्यासिका म्हणून त्या ४० वर्षे कार्यरत राहिल्या. जेव्हा एखादी बहूजन समाजातील व्यक्ती त्यातही स्त्री जर' संस्कृत सारख्या देवभाषेचे' ज्यावर काही विशिष्ट समाजाची मक्तेदारी काही काळापुरती प्रस्थापित झाली होती, त्या विषयाचे अध्ययन करते हे इतके सोपे मुळीच नव्हते. मात्र परिस्थितीवर मात करणे हा त्यांचा स्वभावच होता. त्यामुळेच त्यांनी 'विद्यावाचस्पती' (पीएच.डी.) पदवी संपादन केली. त्यावेळच्या काळातील ही फार मोठी गोष्ट आहे. यामागे त्यांचे पिताश्री कै. दादासो। हिंमत बहादूर चौहाण आणि श्वशूर श्रीमंत कै. दादासो। उर्फ शंकरराव यशवंतराव राजेभोंसले राजाज्ञे (होम-गार्ड ,सातारा जिल्हा) यांचे संस्कार आणि भक्कम पाठिंबा कारणीभूत होता. यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले.



" राजनरसिंह छत्रपती शिवाजी महाराजांचे " नाव उच्चारताच आपल्या तना-मनात एक तेज-उत्साह निर्माण होतो. धमन्यातील रक्त उसळायला लागते, छाती गर्वाने फुलून जाते. त्या पवित्र छत्रपतींच्या घराण्याला साजेसे कर्तृत्त्व 'राजस्नुषा' म्हणून त्यांच्या हातून झाले. **'संस्कृत साहित्यातील राजा शिवछत्रपती यांचे चरित्र'** या विषयांवर त्यांनी संशोधन केले. विलिंग्टन कॉलेज सांगली येथील 'गुरूवर्य डॉ. इनामदार' सरांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन आईनी पूर्ण केले. इनामदार सर खूप प्रेमळ होते ,असे आई नेहमी सांगायच्या. पुणे विद्यापीठात त्यांना मराठा म्हणून एका व्यक्तीने मार्गदर्शन करण्यास नकार दिल्यानंतर शिवाजी विद्यापीठाने सुचविल्यानुसार आईना डॉ. इनामदार सरांचे मार्गदर्शन लाभले. वाईटातूनही चांगलेच घडते असे आई म्हणायच्या.आपल्या मुलीप्रमाणे सरांचा व्यवहार आईप्रती होता. आई प्रथम-भेटिचा प्रसंग सांगताना भारावून जात. पूर्वानुभवामुळे मनात एक धाकधूक होती. ते पावसाचे दिवस होते. लहानग्या राजदिपना घेऊन एस. टि. ने आई सरांच्या घरी पोहचल्या. त्या चिंब भिजल्या होत्या. बाळ कडेवर होते. सरांनी दार उघडल्यावर पहिल्या प्रथम अंग पुसून स्वयंपाक घरातून गरम दूधबाळाला दयायला सांगितले. मग आपण विषयावर चर्चा करू म्हणाले.. असे मातृहृयीसर होते. असे गुरू होणे नाही.. अशा गुरूंना विनम्र अभिवादन !

विशेष म्हणजे शिवाजी विद्यापीठातील संस्कृतमधील पहिल्या पीएच. डी. करण्या-या आई मानकरी ठरल्या. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील अभ्यास मंडळावर अनेक वर्षे अनेक पदावर काम केले. त्यांच्या हाताखाली ४ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी व ७ विद्यार्थ्यांनी एम. फिल. पदवी संपादन केली आणि ५ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. साठी प्रवेश घेतलेला होता. शिवाय त्या इतर शासकीय आणि अशासकीय संस्कृत-संवर्धन-प्रसार व प्रचार समितींवर कार्यरत होत्या. महिलांच्या शोषणाविरूद्ध सातारा जिल्हा पोलिसासह' महिला दक्षता समितीवर' माननीय सदस्य म्हणून नियुक्त होत्या. अनेक वर्षे त्यासाठी त्यांनी कार्य केले.

आमच्या मातोश्रींनी स्वतःची आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करून" संस्कृत स्कॉलर-विदुषी" म्हणून जगप्रसिद्ध होण्याचा नावलौकिक मिळवला. यु.जी.सी. नवी दिल्लीमार्फत' सरल-संस्कृत-संभाषण-वर्ग आपल्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात प्रथमत: चालविण्याचा बहुमान महाविद्यालयांस मिळवून देण्या-या त्या पहिल्या व्यक्ती ठरल्या. त्या अत्यंत क्रांतीकारी विचारांच्या होत्या. पण पडदयामागे काम करणा-या होत्या. प्रसिध्दिविमुख म्हटले तरी चालेल.

'गुणविशेष' हे त्यांचे दागिने होते. 'सुंदर, स्वच्छ टपोरे अक्षर त्यांच्या निर्मळ व अत्यंत 'सात्विक चारित्र्याचे प्रतिकच होते. त्यांच्या साधेपणात, साधनेत, गीतेच्या कर्मयोगातच त्यांचे एक विशिष्ट तेज होते. टापटिपपणा, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, मनमोकळेपणा हे त्यांच्या



व्यक्तिमत्त्वाचे पैलू होते. आपले काम नेटाने प्रामाणिकपणे करताना त्यांना आम्ही पाहिले आहे. करायचे म्हणून त्यांनी कधी काम केले नाही. जे केले ते कलात्मकतेने स्वच्छ आणि म्हणूनच उत्कृष्ट असेच केले. ओळखी-अनोळखी व्यक्तींशी संवाद साधणे हे त्यांना लीलया जमत असे. त्यांना त्यांचे वरिष्ठ सहकारी चालता-बोलता 'शब्दकोश' संबोधत.

सातारा नगरवाचनालयातील एकही पुस्तक त्यांच्या वाचनातून सुटले नाही. खास गोष्ट म्हणजे त्या एकपाठी होत्या. 'तल्लख स्मरणशक्ती' हा आणखी एक गुण वाखाणण्याजोगा होता. हुबेहुब प्रसंगांचे वर्णन करून प्रसंग डोळयांसमोर उभा करणे हा त्यांच्या वाक्चातुर्याचा' महत्त्वाचा गुणविशेष होता. त्यामुळे त्यांनी शिकवलेल्या सांगितलेल्या गोष्टी सहज लक्षात राहत. अवगत होत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अथिक परिश्रम करण्याची आवश्यकता पडत नसे. 'सुंदर रांगोळी' काढणे हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांच्या बोटांमध्ये जादू होती. ज्या वस्तूला त्या हात लावत ती एक 'विशेष नमुनाच' होत. त्यांचा आवाजही खुप गोड होता. कधी कधी त्या भजन, एखादं गाणं गुणगुणत असत. चविष्ट स्वंयपाक हाही गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आईपणाला परिपूर्ण करतो.

एका मोठया घराण्याची स्नुषा जरी त्या असल्या तरी खूप साधेपणाने मनमिळावू वृत्तीने त्या सर्वांशी वागत असत. त्यांच्या वृषभ राशीला अनुसरून त्या कष्टाळू होत्या. अत्यंत कष्टाची - प्रयत्नांची सवय त्यांनी स्वतःला लावलेली होती. सहजता-सुरेखता-सुंदरता-रसिकता या गुणांनी त्या परिपूर्ण होत्या. 'अजातशत्रु' असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कधी कुणाशी वाद-भांडणतंटा केलेला मी पाहिलेले नाही. त्यांनी कधी कुणाची तक्रार आपल्या वरिष्ठांकडे केली नाही. तक्रार करणे हा मुळी त्यांचा स्वभावच नव्हता. असे नव्हते की, त्यांना त्रास होत नव्हता पण त्याचा उच्चार करणे त्यांना कधी योग्य वाटले नाही. विद्वत्तेचे, मोठेपणाचे, समंजसपणाचे हेच लक्षण असते.

'भूमिजा त्यागमूर्ती पवित्र सीतामाई' प्रमाणे त्यांनी आपले आयुष्य समर्पणाने व्यतीत केले. 'स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ' प्रमाणे त्यांच्याकडे कणखरता, प्रामाणिकपणा, दृढता, सत्याग्रहीवृत्ती आणि महत्त्वाचे म्हणजे दूरदृष्टिपणा हे गुण त्यांच्या ठिकाणी ओतप्रोत भरलेले होते. श्रीमद्भगवद्गीता, उपनिषद, वेदांत, ज्ञानेश्वरी आणि स्वामी विवेकानंद इ. विषयांवर त्यांनी हजारो व्याख्याने दिली. त्यांनी कधीच चालत आलेल्या चुकीच्या रूढींना जुमानले नाही. त्या मोडीत काढल्या. वेगळेपणाने काम करण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. लहान मुलांसाठी संस्कार शिबीरे, एन. एस. एस. शिबीरांमध्ये वेगवेगळे उपकम, सायकल रॅली, हायकिंग, ट्रेकिंग सारख्या उपक्रमांमध्ये त्या नावीन्यपूर्ण सहभाग घेत असत. मी माझ्या आईना कधीच रडताना पाहिले नाही. त्या अत्यंत मृदु अंत:करणाच्या होत्या.



एक धागा सुखाचा, शंभर धागे दु :खाचे...

असे जरतारी वस्त्र माझ्या आईच्या आयुष्याचे होते. आमचे वडील आम्हांला खूप लवकर सोडून गेले पण त्यांच्या कमतरतेची जाणीव आईंनी कधीच भासवून दिली नाही. अत्यंत सन्मानाने जगण्याचे 'बाळकडू त्यांनी आम्हांला पाजले. त्यांनी नेहमी स्वतःच्या कृतीतून आम्हांला' संस्कारित 'केले.' आधी केले मग सांगितले ' हे त्यांच्या बाबतीत खरे होते.

सावकाश आणि हळूवारपणे पण व्यवस्थितपणे काम करणे ही त्यांची खासियत होती. त्यामुळे **'संथ वाहते कृष्णामाई'**असे त्यांचे वर्णन अनेकजण करत. शांतपणा, सौम्यता हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. म्हणतात ना ' उथळ पाण्याला खळखळाट फार 'परंतु **पूर्ण ज्ञानाने संपृक्त घागर कधीच आवाज करत नाही,** हे आईच्या बाबतीत सत्य होते.

कर्मसु कौशल्यम्.. याच मार्गाने त्यांनी **हा कर्मयोग** स्वत: साधला आम्हांला शिकविला. वडिलांच्या माघारी कसलेही पाठवळ नसताना त्यांनी आम्हांला फार चांगल्या पद्धतीने वाढवले. सक्षम केले. आम्हांला स्वर्गासमान घर दिले. 'स्वर्गसुख' दिले असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

दया, क्षमा, शांती तिथे भगवंताची वस्ती असेच आमचे घर त्यांनी बनविले. त्या स्वत: खूप साध्या राहत पण आम्ही अव्यवस्थित राहिलेले त्यांना आवडत नसे. मोजून-मापून वागणे, करणे त्यांना जमलेच नाही. त्या स्वत: कपडयांच्या दोन जोडयावर राहत पण आमच्यासाठी सर्वच सुविधांची रेलचेल असायची.

आईनी आम्हांला सेवाभाव शिकविला. नियमाने केली जाते ती नोकरी पण नियमांच्या पलिकडे जाऊन केली जाते ती सेवा, असे त्या म्हणायच्या. तीच भक्ति हाच संस्कार त्यांनी आमच्यात रूजविला. आपण पाळतो त्यापेक्षा परमेश्वर ठरवितो ती वेळ योग्य. एक मात्र खरं त्यांच्या आयुष्यात वेळेच्या आधीच सर्व हिरावून नेले .त्यामुळचे त्यांनी आयुष्यभर घडयाळ वापरले नाही आणि वेळही पाळली नाही. ही काही कारणे त्यामागे होती. माझ्या भावावर आईचे खूप प्रेम होते. त्यांनी आईची श्रावण बाळासारखी सेवा केली. आईंनी आमच्यासाठी जे काही केले त्या बाबतीत मला आनंदघनांच्या ओळी याठिकाणी आठवतात.....

कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला.. याल का हो बघायाला....

अशा कल्पवृक्ष.. माझ्या आई... सौख्याचा सागर... माझ्या आई.. अत्यंत उदार, प्रेमळ गुणी व्यक्तिमत्त्व माझ्या आईना लाभलेले होते. माझ्या आई - माझ्या गुरू - माझ्या सद्‌गुरू –

माझ्या वरिष्ठ- विभाग प्रमुख अशा अनेक नात्यांनी त्या मला लाभल्या.

त्वमेव माता | पिता त्वमेव | त्वमेव बंधु | सखा त्वमेव। त्वमेव विद्या |
द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देव देव ||

हे आम्हां मुलांचे भाग्यचं ! पूर्व जन्माची पुण्याईचं की त्यांच्या पवित्र उदरी आम्हांस जन्म लाभला !!

परमेश्वरालाही त्या प्रिय होत्या म्हणूनच की,काय त्याने त्यांना खूप दु :ख दिले, की जेणे करून 'त्याची आठवण सतत करावी. अत्यंत संघर्षमयी, वेदनादायी पण समाधानपूर्ण असा त्यांचा जीवनप्रवास होता. मला वाटते की, आमच्यापेक्षा त्या 'विधात्यालाच' आईची अधिक गरज होती. म्हणूनच आम्हांला वासरांना सोडून त्या" वसुबारस गुरूद्वादशी" दिवशी आम्हांला पोरक करून इहलोकातून गोलोकात गेल्या... त्यांच्या जाण्याने आम्ही अनाथ झालो...दैव इतके निष्ठुर का असते ??

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच कशानेच भरून निघणारी नाही. आईच्या छत्राखाली एक दिलासा असतो. मायेची ऊब मनाला विसावा देते.. हे आता नाही.. माझ्या जीवनाचा एक- एक क्षण आणि एक- एक कण त्यांनीच व्यापलेला आहे. "३३ कोटि देवांमध्ये श्रेष्ठ मला माझी आई !"

आज आई 'देहाने' नसतील पण त्यांच्या संस्कारांनी, विचारांनी त्या आमच्या हृदयात, मनात 'जिवंत' आहेत. आमच्या सतत त्या बरोबर आहेत.

"स्मारं स्मारं तद् वच: ध्यायं ध्यायं तद् पादौ ||"या उक्तिला अनुसरून आयुष्य यापन करायचे आहे.

सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्,
सुखदां वरदां |
सस्य शान्तश्यामलां मातरम्,
वंदे मातरम् ||

या ओळी त्यांना तंतोतंत लागू होतात. पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला तर त्यांच्या पोटी मिळावा हेच परमेश्वराला मागते..



म्हणूनच पवित्र **ॐ** इतक्या परिपूर्ण शब्दामध्ये **माँ** आणि **साई** इतक्या अर्थपूर्ण शब्दांमध्ये मला माझ्या **आई** दिसतात .

पूर्णमिदं पूर्णमदः पूर्णात्पूर्णमुदच्यते |
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ||

जेथे भावनांचा प्रवास सुरू होतो तिथून शब्दांचा प्रवास थांबतो.....



माझ्या आई

छत्रपती शिवरायांच्या दैदिप्यमान
चरित्राला
संस्कृत भाषेत संशोधित करणाऱ्या
अभ्यासु संशोधिका
शारदाई
माझ्या आई ! १
राजघराण्याला साजेसे सालस
शांत संयमी व्यक्तिमत्त्व
राजाई
माझ्या आई ! २
सासु -सास-यांचा मान-सन्मान
नावलौकिक वाढवणा-या
शांताई
माझ्या आई ! ३
आई-वडिलांच्या संस्कारांच्या
संपत्तीने ज्ञानाग्नी अखंड
तेवत ठेवणा-या
ज्ञानाई
माझ्या आई ! ४

निश्चयी निराग्रही
कर्मयोगिनी शहाजीराजांच्या
जिजाई
माझ्या आई ! ५
पतिसाठी सर्वस्व
देणाऱ्या निष्कलंक
निष्ठावती
माझ्या आई ! ६
मुलांसाठी आयुष्य वेचणा-या
निस्सीम प्रेमाचं
चांदणं
माझ्या आई ! ७
संकटांच्या सतत कोसळणा-या
अतिवृष्टिला
निश्चयाच्या गोवर्धनाने
करंगळीवर थोपविणारी
कृष्णाई
माझ्या आई ! ८



सर्वसंगपरित्याग करणारी
मुक्ताई
माझ्या आई ! ९
शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या
राजयोगी
शिवाई
माझ्या आई ! १०
स्वतः कमावलेल्या संपत्तीचा
उपभोग न घेणाऱ्या निरपेक्ष
निर्मोही
माझ्या आई ! ११
मान सन्मान, अपमान सत्ता
संपत्ती हक्क यांबद्दल
निरासक्त
निर्मळ
माझ्या आई ! १२
सुंदर हास्य असणाऱ्या
सुहासिनी
माझ्या आई ! १३
आत्मसन्मानाचा डोक्यावरचा पदर
ढळू न देणाऱ्या
समतोल सांभाळणा-या
स्वाभिमानी
माझ्या आई ! १४
कलह भांडणे कटकट
वाद -विवाद न करणाऱ्या
निर्विवादिता
माझ्या आई ! १५

आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण
करणाऱ्या
पण "मी " पणाचा डंका न
पिटणा-या नीतीमान
जगदाई
माझ्या आई ! १६
निश्चयाचा महामेरु आनंदाचे
झाड
अमृताची गोड फळ देणाऱ्या
अमराई
माझ्या आई ! १७
वाक्-देवतेच्या करकमलातील
वागेश्वरी
वीणाई
माझ्या आई ! १८
कोणालाही शब्दानेही न
दुखवणा-या
निरासक्त
माझ्या आई ! १९
आपल्या ध्येयापर्यंत
पोहचण्याकरिता
कोणालाही न फसवणा-या
निष्पाप
माझ्या आई ! २०


अत्यंत साधेपणाने जीवन
जगणाऱ्या निर्लेप
निरिच्छ
माझ्या आई ! २१
त्यागाची वात्सल्याची
अपारकष्टाची
सीताई
माझ्या आई ! २२
अनाथांवर मातृवत् प्रेम करणारी
धन्य ती माऊली
विठाई
माझ्या आई ! २३
संथ वाहणारी
कृष्णा माई
लुप्त झाली आणि
आमच्या हृदयी प्रगटली.........
वरदाई
माझ्या आई ! माझ्या आई ! माझ्या आई ! २४

--मयूरासुहासिनी

सचित्र स्मृतिपट

छायाचित्र संकलन

श्री राजदीपराजे भोंसले- राजाज्ञे,
श्री सुभाष घाटगे (सरकार)



अवतार मेहेरबाबांशेजारी कु. मेहेरवीणा,
बसलेले कै. दादासाहेब चौहाण, श्रीमती
चतुरादेवी चौहाण मांडीवर कु. पुष्पा उभे
असलेले श्री. विजय चौहाण,
श्री आनंदमामा भोपते - पाटील.



कै. दादासाहेब चौहाण, श्रीमती चतुरादेवी चौहाण



कै. दादासाहेब चौहाण



कै. दादासाहेब चौहाण अवलिया
अब्दुल रज़ाक साहेबांसोबत



श्री. विष्णूपंत खोपडे आजोबा



कु. वीणा आपल्या मातोश्री, कु. पुष्पा यांच्या सोबत



कु. वीणा आपल्या मातोश्री यांच्या सोबत



महाविद्यालयामध्ये असताना कु. वीणा मैत्रीणींसह



थोरले बंधु विजय आणि वीणा



वाढदिवसाच्या वेळी कु. वीणा सोबत धाकटया बहिण कु. पुष्पा



श्री. दादासाहेब चौहाण, श्रीमती. चतुरादेवी चौहाण, श्री. विजय चौहाण आणि कु. वीणा चौहाण



कै. श्रीमंत दादासाहेब राजेभोंसले राजाज्ञे



रयत शिक्षणसंस्थेचे संस्थापक आदरणीय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सोबत कै. श्रीमंत यशवंतराव (आबासाहेब) राजेभोंसले राजाज्ञे आणि इतर सदस्य



कै. श्रीमंत छत्रपती थोरलेप्रतापसिंहराजे भोंसले दादामहाराज साहेब यांच्या सोबत कै. श्रीमंत शंकरराव सोबत धाकटे बंधू कै भिमराव (धाकटेआबा) आणि चिरंजीव कै. शहाजीराव राजेभोंसले - राजाज्ञे



कै. श्रीमंत दादासाहेब राजाज्ञे श्रीमती विजयादेवी राजाज्ञे सोबत कै. भीमराव राजाज्ञे श्रीमती भानुमतीदेवी राजाज्ञे सर्व मुलांसोबता



राजेभोंसले राजाज्ञे परिवार



विवाहप्रसंगी मैत्रीणीसोबत सौ.
सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



श्रीमंत दादासाहेब उर्फ शंकरराव य. राजेभोंसले राजाज्ञे,
कै. श्रीमती विजयादेवी शं. राजेभोंसले राजाज्ञे संपूर्ण
परिवारासह



राजाज्ञे वाड्यात हळदी समारंभ प्रसंगी
श्री शहाजीराजे आणि परिवार



शहाजीराजे आणि वीणादेवी विवाह प्रसंगी जावयांचा
सन्मान करताना श्री आबासाहेब आणि माँसाहेब



श्री. शहाजीराजे आणि
चि. सौ. कां. वीणादेवी राजेभोंसले राजाज्ञे



आजेसासूबाई श्रीमती तानीबाई जगताप (इनामदार)
यांच्यासोबत संपूर्ण राजेभोंसले राजाज्ञे परिवार



शुभविवाह प्रसंगी शहाजीराजे वरमाला प्रसंगी
वाकले म्हणून एकच हशा



श्री. शहाजीराजे आणि
चि. सौ. कां. वीणादेवी राजेभोंसले राजाज्ञे
परिवारासह




कै. श्रीमंत दादासाहेब राजाज्ञे
श्रीमती विजयादेवी राजाज्ञे



कु. रेशमा श. राजेभोंसले नामकरण प्रसंगी माँसाहेब
विजयादेवीसह सौ. सुहासिनीदेवी सौ. जयश्रीदेवी,
सौ. रजनी वि. चौहाण



औक्षण करताना श्रीमती सुहासिनीदेवी
कन्या कु. रेशमा , पुतणी कु. शर्मिष्ठा



सौ. सुहासिनीदेवी कु. रेशमा,
कु. मयूरा.चि. राजदीपराजे



विवाहबद्ध श्री. शहाजीराजे आणि सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



एका निवांत क्षणी श्री. शहाजीराजे आणि श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



श्री. शहाजीराजे आणि सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



ज्येष्ठ कन्या रेशमादेवींना शुभविवाह प्रसंगी शुभाशीर्वाद देताना मातोश्री सुहासिनीदेवी



कन्या मयूरांना शुभविवाह प्रसंगी शुभाशीर्वाद देताना मातोश्री सुहासिनीदेवी



विवाहप्रसंगी चिरंजीव राजदीपराजेंचे कौतुक करताना वात्सल्यमूर्ती आऊसाहेब सुहासिनीदेवी

श्रीमती सुहासिनीदेवींच्या भावमुद्रा















थोरले नातू चि. अर्णव दानी नामकरण सोहळा क्षणी आजीसाहेब श्रीमती सुहासिनीदेवी



थोरले नातू चि. अर्णव दानी सोबत श्रीमती सुहासिनीदेवी



जन्मदिनी श्रीमती सुहासिनीदेवी, नातवंडे अर्णव, अद्वय, शाहूराज, राजवीर आणि कुटुंबासह



अंतिम काळात (शेवटचा ठरला) जन्मदिन साजरा करताना परिवारासह श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



श्रीमती सुहासिनीदेवींची नातवंडे चि. अर्णव, चि. अद्वय दानी आणि कु. जिजाईशिवराज्ञी राजेभोंसले



श्रीमती सुहासिनीदेवींची नात कु. जिजाईशिवराज्ञी राजेभोंसले



श्री. निलेश चि.सौ. कां. रेशमा शुभविवाह प्रसंगी मामा कै. विजय चौहाण ,श्रीमती रजनी चौहाण सोबत सुहासिनीदेवी



श्री. निलेशकुमार आणि चि.सौ. कां. रेशमादेवी, श्रीमती सुहासिनीदेवी आपल्या श्री. आनंद मामां सोबत



श्री. निलेश कुमार आणि चि.सौ. कां. रेशमादेवी शुभविवाह प्रसंगी दानी आणि राजेभोंसले राजाज्ञे परिवार



कन्या मयूरा मातोश्री सुहासिनीदेवी सोबत



राजदीपराजे आणि धनश्री यांच्या शुभविवाह प्रसंगी शुभाशीर्वाद देताना आईसाहेब सुहासिनीदेवी



कै. दादासाहेब राजाज्ञे आणि श्रीमती विजयादेवी राजाज्ञे 61 कार्यक्रम प्रसंगी



सुहासिनीदेवींचे धाकटे सासू सासरे आणि त्यांच्या कन्या आणि नातवंडे कै. श्रीमंत भिमराव राजेभोंसले, कै. श्रीमती भानुमतीदेवी आणि कन्या श्रीमती उज्ज्वलादेवी तावडे, श्रीमती राजनंदादेवी जाधव



दादासाहेबांचे मोठे जावई श्री कृष्णराव सौ प्रमिलादेवी परिवार मगर



कै. दादासो। चे जावई आणि कै. शहाजीराजेंचे व्याही कै. चंद्रकांत दानी आणि श्रीमती रत्नप्रभा दानी(रायपूर)



श्री व सौ. अनंतराव व अमरजा हलगेकर परिवार



दादासाहेबांचे जावई खा. चंद्रशेखर कदम (देवळाली)श्रीमती प्रियतमा कदम, चि. सत्यजित (सध्या नगराध्यक्ष-देवळाली)



दादासो। जावई श्री.प्रशांत व पद्मजा ढमाले-देशमुख आणि परिवार

श्रीमती सुहासिनीदेवी ..सुहासिनीं सुमधुरभाषिणीं सुखदां वरदाम्..













कै. जयवंतराव शंकरराव राजेभोंसले राजाज्ञे



कै.शहाजीराव शंकरराव राजेभोंसले राजाज्ञे



सौ. प्रमिलादेवी मगर, रत्नप्रभादेवी दानी, अमरजादेवी हलगेकर मागे पद्मजादेवी देशमुख, जयश्रीदेवी आणि सुहासिनीदेवी राजेभोंसले - राजाज्ञे



कै. जयवंतराव राजेभोंसले राजाज्ञे (काकासाहेब) श्रीमती जयश्रीदेवी, त्यांच्या कन्या शर्मिष्ठा, श्वेता, सोबत रेशमा, मयूरा आणि थोरला नातू अर्णव दानी



थोरल्या जाऊबाई आक्कासाहेब सौ. जयश्रीदेवी राजेभोंसले सोबत सुहासिनीदेवी राजेभोंसले





थोरले जावई निलेश दानी यांचे कोड
कौतुक करताना सुहासिनीदेवी



श्री राजदीपराजे बहिणीसह सौ. रेशमा ,
सौ. मयूरा , सौ. शर्मिष्ठा



शहाजीराजेंचे थोरले जावई श्री. निलेश
दानी, सौ रेशमा दानी आणि परिवार



श्री. रामचंद्र घाटगे, सौ. यशोदा घाटगे,
सौ मयूरा घाटगे, श्री. सुभाष घाटगे



सुभाष, रेशमा, मयूरा, राजदीप,
राजेश्वरी, अर्णव आणि अद्वय



श्री. राजदीपराजे सौ. राजेश्वरी आणि
जिजाशिवराज्ञीराजे भोंसले राजाज्ञे





श्री. संजीव , सौ. हिमगौरी
आणि चि. श्रेयस कदम



61 कार्यक्रम प्रसंगी बंधु श्री. विजय चौहाण सौ.रजनी
चौहाण, शुभेच्छा देताना श्रीमती सुहासिनीदेवी



श्री. रविंद्र , सौ. रुपाली आणि चि. वल्लभ येवले



श्रीमती ज्योत्स्ना निगडे



श्री दिपक, सौ. प्राजक्ता आणि
चि. राजवीर चव्हाण





शहाजीराजेंचे थोरले जावई श्री. व सौ.
निलेश, रेशमा दानी



श्री. व सौ. ऋषीकेश ,शर्मिष्ठा राजेनिंबाळकर



श्री. व सौ. सुभाष , मयूरा घाटगे




श्री. व सौ. विक्रमादित्य ,श्वेता साळुंखे,
शाहुराज साळुंखे



सुहासिनीदेवी यांचे जावई
श्री निलेश दानी,
श्री ऋषीकेश राजेनिंबाळकर
श्री. सुभाष घाटगे,
श्री विक्रमादित्य साळुंखे







श्रीमती सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे यांना शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर तर्फे विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त झाली त्याप्रसंगी सातारा नागरी सत्कार आयोजित प्रसंगी मा.मार्गदर्शक. गुरूवर्य डॉ. इनामदार सर,मा. आम. श्रीमंत अभयसिंहराजे भोंसले मा. माधव गडकरी (संपादक लोकसत्ता)





आतंरराष्ट्रीय ओळख असणाऱ्या श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाझे

Dr. Suhasinidevi Rajebhonsale

- Selection for the 'Asia's' who's who of men & women of achievement in 'Reference Asia' - Who's who vol. 6th, **page no. 608-1991**
- Selection for the 'The International Directory of Distinguished Leadership' 4th Edition, by American Biographical Institute. **page no. 292**
- Selection for the 'The International who's who Intellectuals, 10th edition, by International Biographical Center' Cambridge, England. **page no. 389**
- Member of board of advisers, selected by ' The American Biographical Institute'
- Member of ABI Research Association, USA.







महाकविकालिदास संस्कृतसाधना पुरस्कारा प्रित्यर्थसंपन्न सत्कार प्रसंगी श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर



श्रीमती प्रा. डॉ. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले राजाज्ञे यांचा महाराष्ट्र शासन पुरस्कृत महाकविकालिदास संस्कृतसाधना पुरस्कार प्रित्यर्थ सत्कार करताना माननीय श्री. आ. जयंत पाटील, कोल्हापूर महापौर, मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे, प्राचार्य ऐनापूरे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर येथे



डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले महाराष्ट्र शासन पुरस्कृत महाकविकालिदास संस्कृतसाधना पुरस्कार प्रित्यर्थ शासन प्रतिनिधी मा. केचे साहेब, मा. प्राचार्य सुहास साळुंखे, मा जगन्नाथ पंडित (अशासकीय मानद सदस्य)



राज्यस्तरीय परिषदेत सत्कार
स्वीकारताना विनम्र
प्रा. डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



महाराष्ट्र आयोजित राज्यस्तरीय
संस्कृतपरिषद मध्ये बोलताना श्रीमती
डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले

श्री क्षेत्र नारायणपूर येथे बाल संस्कार
शिबीरात मार्गदर्शन करताना श्रीमती
डॉ. सुहासिनीदेवी, व्यासपीठावर
अधिष्ठित परमपूज्य सद्गुरू नारायण
महाराज, प्राचार्य अमरसिंह राणे







सेवागौरव प्रसंगी सत्कार करताना मा.कार्याध्यक्ष अभयकुमारजी साळुंखे ,मा डॉ. शरद साळुंखे, मा.प्राचार्य राजेंद्र शेजवळ



महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांच्यासाठी सासरे व वडिलांच्या नावाने बक्षिस देण्यासाठी देणगी धनादेश देताना श्रीमती डॉ. राजेभोंसले



मनोगत व्यक्त करताना मा. कार्याध्यक्ष अभयकुमारजी साळुंखे



सत्कारमूर्ती डॉ .राजेभोंसले मनोगत व्यक्त करताना



सेवा गौरव प्रसंगी सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करताना भारूड सम्राट ह.भ.प.लक्ष्मण राजगुरू आणि साथीदार



शुभेच्छा देताना वहिनीसाहेब श्रीमती रजनी चौहाण





शुभेच्छुक थोरल्या जाऊबाईसाहेब श्रीमती जयश्रीदेवी, पुतण्या सौ. शर्मिष्ठा राजेनिंबाळकर , सौ. श्वेता साळुंखे , दिवाणसाहेब सौ.अमरजा हलगेकर श्री. आशिष हलगेकर



शुभेच्छुक दिवाणसाहेब सौ. प्रमिलादेवी मगर, श्री.चंद्रशेखर मगर, सौ. राजवी हलगेकर



मा. प्राचार्य आर. ए. कदम सर शुभेच्छा स्वीकारताना श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



सेवागौरव प्रसंगी उपस्थित जनसमुदाय





युजीसी मार्फत सरल संस्कृत संभाषण
वर्ग आयोजित कार्यक्रम प्रसंगी
डॉ. राजेभोंसले व मान्यवर



महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात व्यक्त
होताना श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



शिवाजी विद्यापीठ व पंतगराव कदम महाविद्यालय
संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेत
प्रमुख व्याख्यात्या म्हणून संबोधताना
डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



साखोळकर पतसंस्थेतर्फे सत्कार
स्वीकारताना मा. नागरिक सातारा जिल्हा
प्रा. डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



श्री क्षेत्र नारायणपूर शिष्य- शिबीर प्रसंगी श्रीमती वीणाताई



निलेश जोशी यांच्या पीएच.डी. मौखिक परीक्षा प्रसंगी डॉ. राजेभोंसले, डॉ. मल्हार कुलकर्णी, प्राचार्य साळुंखे



युजीसी मार्फत सरल संस्कृत संभाषण वर्ग आयोजित कार्यक्रम प्रसंगी डॉ. राजेभोंसले व मान्यवर



महाविद्यालयात भित्तिपत्रिकेचे उद्घाटन करताना डॉ. राजेभोंसले, प्राचार्य डॉ. शेजवळ

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात आयोजित पीएच. डी. मौखिक परीक्षा मार्गदर्शिका डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे

















प्रमुख व्याख्यात्या म्हणून संबोधताना श्रीमती डॉ.सुहासिनीदेवी राजेभोंसले, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे



महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात व्यक्त होताना श्रीमती डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले



महाविद्यालयात संस्कृत विभाग आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर, कमिन्स महाविद्यालय, पुणे उपस्थित प्राचार्य सुहास साळुंखे, श्रीमती प्रा. डॉ. सुहासिनीदेवी राजेभोंसले राजाज्ञे



प्रमुख व्याख्यात्या डॉ. राजेभोंसले राजाज्ञे



प्रमुख व्याख्यात्या डॉ. राजेभोंसले राजाज्ञे



सौ. आनंदीबाई यशवंतराव राजेभोंसले राजाज्ञे



कै.श्रीमंत यशवंतराव (आबासाहेब)
शहाजीराव राजेभोंसले राजाज्ञे





-परिचय-

नाव: प्रा. डॉ. श्रीमती सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले – राजाज्ञे

जन्म: ०२/११/१९५५ पुणे

मृत्यु: १६/१०/२०१७ सातारा

शिक्षण: M.A.(Sanskrit), M.A.(Marathi), B.Ed., Ph.D.

नोकरी: Associate professor (लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,सातारा.)

शिक्षण संस्था: श्री. स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर

संशोधन क्षेत्र: Veda वेद, Vedanta वेदान्त,Philosophy तत्त्वज्ञान, Historical Sanskrit ऐतिहासिक संस्कृत Modern Sanskrit अर्वाचीन संस्कृत

पुरस्कार:

1. Ph.D. in Sanskrit: Shivaji University, Kolhapur 21/06/1986. A Critical Study of the Life of Chh. Shivaji Maharaj as recorded in Sanskrit literature.
2. Awarded by 'The Higher and Technical Education, Maharashtra State 'Mahakavi Kalidas Sanskrit Sadhana Puraskar – 2006' awarded by Maharashtra state – citation & cash prize – Rs. 25000/- the auspicious hands of honorable Mr. Jayant Patil at Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur in Dr. Bapuji Salunkhe – 19th Smrutidin and Dr. Keche – Joint Director, Higher Education, Region – Kolhapur at L.B.S. College, Satara



3. Selection for the 'Asia's who's who for men and women of achievement in Reference Asia who's who – Volume 6th page no. 608 – 1991
4. Selection for the International Directory of Distinguished Leadership fourth Edition by American Biographical Institute page no.292.
5. Selection for the International who's who Intellectuals –10th edition by International Biographical Center, Cambridge England – Page no.389.

संस्था सभासदत्व:

1. Member of Board of study – Sanskrit Shivaji University, Kolhapur Elected unopposed total four times
2. Member of faculty of Arts & fine Arts – Three times
3. Non- Governmental Member of Sanskrit standing committee, Maharashtra State.
4. Non – Governmental member checked various Sanskrit Pathashalas Mahavidyalayas.
5. Non – Governmental Member of Maharashtra State Mahakavi Kalidas Sanskrit Sadhana Puraskar committee from 21-07-2007 & from 15-02-2011
6. Appointed as a member on Non- Governmental organization of Maharashtra Government, which promotes the name for 'Puraskar of Sanskrit Scholarships' their names & bio-data is scrutinized by this committee.
7. Co-Ordinator of simple Sanskrit speaking courses at center L.B.S. College, Satara conducted by University grant committee New Delhi – Grant by U.G.C. 10000=00 Rs. For ten courses – organized From 2001 to 2004
8. Life member of Bhandarkar oriental Reasearch Institute, Pune.
9. Member of Maharshi Karve Stree Shikshan Sanstha Hingane, Pune.
10. Member of SUTA, TDF
11. Member of Vishwa Sanskrit Committee, M.S.
12. I worked as a member of scrutiny committee for suggestion & M. Phil. & Ph. D. students.

Contribution to various fields at university working as member of:

1. Board of Study – Sanskrit
2. Faculty of arts and fine Arts
3. Syllabus Committee
4. Scrutiny Committee



5. Interviews Camp
6. Subject Expert Camp
7. Paper Setting Camp
8. Paper Examiner and moderator
9. Open defense for Ph.D.
10. Viva-voce and Entrance exam. For M.Phil.
11. Write textbook units
12. Archival cell

Member of Editing Board and Write units for Text book (Sanskrit Sarika) For class XI Published by Maharashtra State Text book Mandal, Pune 2006

Member of Editing Board and Write units for Text books Published by Shivaji University

1 B.A. Part III Paper No. –VII Sanskrit Vividha 1992

2 B.A. Part II Paper No.- III Sanskrt Sahitya Shatra & Vyakran Parichay 2005

3 B.A. Part I Paper No. – I Bhas Ekankika Urubhang & Karnabhar 2007

4 B.A. Part III Paper No. – IV Vedasourabham 2010

5 B.A. Part III Paper No.- IV Bramhanopnishadamurtam 2010

6 B.A. Part III Paper No. – VIII Vyakaranprabhodh 2010

7 B.A. Part III Paper No. – VIII Bharatiya Puravidhya Parichay 2010

Member of Editing Board and Write units Fir SIM – Self Instructional Material-Published By Shivaji University, Kolhapur For Distance Education.

1 B.A. Part I Paper No. I Bhas Ekankika Urubhang 2007

2 B.A. Part II Paper No. II Nitishatak 2008

3 B.A. Part II Paper No III Shreemadbhagvatgeeta 2008

4 B.A. Part III Paper No IV Vedasourabham, Rugveda, Yajurveda Skukta 2009

5 B.A. Part III Paper No IV Brahmanopnishadamurtam Brahman – Upanishad 2009

6 B.A. Part III Paper No VI Tarkasngraha 2009

7 B.A. Part III Paper No VII Kayaprakasha 2009



8 B.A. Part III Paper No VIII Shilalekha 2009

Delivered Lectures:

1. Delivered a number of lectures on history, Philosophy, Culture, Religion in satara District, Pune and Jodhpur (Rajasthan) in school, Sansthas, Social Working Sansthas.
2. Delivered couple lectures on 'Sanskrit Sources on Chhtrapati Shivaji' at Department of History – Shivaji University, Kolhapur. Under Guest Leacture series on 28-08-2004
3. Delivered a lecture on Chh. Shivaji Maharaj recorded in Sanskrit literature at Dr. Patangrao Kadam College, sangali Organized by Shivaji University, Kolhapur and Dr. Patangrao Kadam College Sangli under Chh. Shivaji Maharaj Lecturer Series as Chief Guest lecture on – 18- 01-2006
4. Delivered a leacture at Shivpratima in Sanskrit literature at Shivai University Kolhapur organized by Chh. Shahu Maharaj Maratha Itihas Adhyayan kendre and Department of History, Shivaji University, Kolhapur under Dr. Appasaheb Power Smruti lecture series on 18- 01-2007 as a Chief Guest lecturer.
5. Delivered a leacture at all India Radio on Gita Chapter - 8 From 01-05-2008 to 31-05-2008 –one Month Series Satara.

Research Guidance and Experience 23 Years from 1988 to 2017
Organized viva – voce For M.Phil as a Guide and member

1) श्रीमती अराणके यु. व्ही
2) श्रीमती मोटे पी.सी.
3) श्रीमती जोशी वाय. वाय
4) श्रीमती हुक्केरी एस. व्ही
5) श्रीमती काळे एस. के
6) श्रीमती व्यास
7) श्रीमती खांडेकर एस.एस.
8) श्रीमती सुतार एस.बी.

Ph. D. (Awarded under guidance)

1) डॉ. .उर्मिला अराणके
2) डॉ. निलेश जोशी

3) डॉ. रोहन वेंगुर्लेकर
4) डॉ. माधवी जोशी

Chairperson Open viva - voce for Ph.D. open defense Shivaji University, Kolhapur Viva Voce at L.B.S. College Satara

1) Mr. Kharade B.S.
2) Mr. Joshi R.R.
3) Mr. Kulkarni C.B.

Chairperson Viva –Voce for M. Phil at Shivaji University, Kolhapur.

1) Smt. kulkarni P.D.
2) Smt. Kanase S.R.

Organized open viva – voce for Ph.D.at L.B.S. College Satara

1) Smt. Pravate A.M.
2) Smt. Aranke U.V.
3) Smt. Mote P.C.

सामाजिक कार्य:

A] The member of social security and vigilance committee appointed by D.S.P. of Satara from 1988, 1992to up to date working for solving women's problems

B] Conducted Spiritual work – Shop and Sanskar Shivira's since seven years under guidance of Sadguru Narayan Maharaj at Shree Kshetra Narayanpur and under his guidance worked for without dowry marriages.

प्रकाशित लेखन-

1. 'Shivdarshan in Sanskrit Literature' published in 'Daily Aikya' – Satara – above hundred articles Oneyear Series – 1987 to 1988.
2. Published various articles in history, Social Values, Culture, Religion and Philosophy such as
3. various subject – for example –Chh. Shivaji Maharaj, Datta kshetra- Shree Kshetra Narayanpur, Shiv Devata, without Dowry marriages, Spiritual and Sanskar Shivira's, Gita, Lok. Tilak, Kalidas, Meghadut, Upanishada's and their philosophy etc. In Daily



Aikya, Pudhari, Lokmat, Tarun Bharat, Sakal, Loksatta, mahasatta, Punyanagari, Gromodhar, etc. various newspapers.

4. Chief Editor of 'Bahaduriya' Annual magazine of L.B.S. College, Satara – 1993-94, 2000-01 and 2001-02.
5. Member of Editing Board of Bahaduriya of Annual magazine of L.B.S.College, Satara for Sanskrit section since 23 years.
6. Worked as Chairperson of Publishing Committee of L.B.S. College, Satara since 20 ears.
7. Member of Editing Board of ' Ropyamahosavi Smaranika' of L. B. S. College, Satara – 1993
8. Published various articles in various magazines for Examples:

A] Prasannagad gourav magazine of principal Rane.

B] Samarpan gourav magazine of Principal N.G. Gaikwad.

C] Satara Zilla Pariashad gourav gatha special magazine 1987

D] Satara Zilla Prarthamik Shikshak Sahakari Bank Ltd., Satara – Amrut Mahotsavi Varsha.

E] Lalatrekha Diwali Magazine – 1991 Sasane Nagar Hadapsar, Pune – 28

F] Daily Jivhala Divali Magazine – 1997

G] Daily Sahyadri - Shree Datta Visheshank – 1989

H] Shree Datta Jayanti Visheshank – 1991-92

9. Member of Publicity Committee and Editing Board for Shri Datta Sevekari Mandal, Kshetra Narayanpur Published books:

A] Shree Kshetra Narayanpur Mahatmya – 261 ovya 6-11-1988

B] Shree Narayandnyanbodha – 18 Adyay – Ovibadha 27-12-1993

C] Shree Narayan Dnyanganga – Pravachane – Pratham Dhara 23-12-1996

D] Shree Narayan Dnyanganga – Pravachane - Dwetiya Dhara 19-07-1997

E] Shree Narayan Dnyanganga – Pravachane – Trutiya Dhara 12-12-1997

F] Shree Narayan Dyanganga – 'Aaher maherach' Mahilankarita dnyan pravchane 09-07-1998





माझ्या आई

☬ छत्रपती शिवरायांच्या दैदिप्यमान
चरित्राला संस्कृत भाषेत संशोधित
करणाऱ्या अभ्यासु संशोधिका
शारदाई

☬ आई- वडिलांच्या संस्कारांच्या संपत्तीने
ज्ञानाग्नी अखंड तेवत ठेवणा-या
ज्ञानाई

☬ निश्चयी निराग्रही कर्मयोगिनी
शहाजीराजांच्या
जिजाई

☬ शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या
राजयोगी
शिवाई

☬ स्वतः कमावलेल्या संपत्तीचा उपभोग
न घेणाऱ्या निरपेक्ष
निर्मोही

☬ वाक्-देवतेच्या करकमलातील वागेश्वरी
वीणाई

☬ आंतरराष्ट्रीय ओळख निर्माण करणाऱ्या
पण "मी " पणाचा डंका न पिटणा-या नीतीमान
जगदाई

☬ संकटांच्या सतत कोसळणा-या अतिवृष्टिला
निश्चयाच्या गोवर्धनाने करंगळी वर थोपविणारी
कृष्णाई

☬ सर्वसंगपरित्याग करणारी
मुक्ताई

☬ आत्मसन्मानाचा डोक्यावरचा पदर ढळू न
देणाऱ्या समतोल सांभाळणा-या
स्वाभिमानी

☬ सुंदर हास्य असणाऱ्या
सुहासिनी

eBook Publication Pvt. Ltd.®